भ्रमविलास नाटक.



विजया—पण ती आपल्यावर प्रेम करूं शकत नसली तर ?

[अं० २ प्र. ४ पान ५०.

॥ श्री ॥

भ्रमविलास नाटक.

(शेक्सपियरच्या ' ट्वेल्थनाइट ' या नाटकाच्या आधारें)

हें पुस्तक

बळवंत हरि पंडित,

बी. ए. एल्. एल्. बी.

यांनीं लिहिलें.

तें

रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं

पुणें येथें ८१८ सदाशिव पेठ

' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

(आवृत्ति पहिली)

सन १९१२.

किंमत १२ आणे.

अर्पणपत्रिका.

ती. कै० हरि माधव पंडित.

जन्म २१।१२।१८४९. मृत्यु १५।३।१८९९



पितृदेवो भव.

ज्यांच्या पोटीं मला जन्म लाभला, ज्यांच्या कृपेनें मी लहानाचा मोठा झालों व ज्यांच्या हातून मला शिक्षण मिळालें त्या माझ्या परमपूज्य व प्रियतम पितृ—मातृचरणीं ही माझी अल्पकृती त्यांच्याबद्दल माझ्या मनांत असलेल्या प्रेमाची व आदराची खूण म्हणून अर्पण करीत आहें, ती त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यांस मान्य होवो.

कै० मातुश्री सत्यभामाबाई पंडित.

जन्म १८५२ मृत्यु ३१।१।१९१२



मातृदेवो भव.

ब. ह. पंडित.

प्रस्तावना.

शेक्सपियर कवीची या पूर्वींच महाराष्ट्र वाचकांस चांगली ओळख झालेली असल्यामुळें आज मला त्याची नवीन माहिती देण्याची गरज उरली नाहीं. याच कवीचें प्रस्तुत नाटक ही एक कृती आहे. हें नाटक आनंदपर्यवसायी असून हास्यरसपूर्ण आहे. अर्थात् त्यांत उदात्त कथानक किंवा विचार फारसे नाहींत हें निराळें सांगणें नकोच.

अंतर्गत व बाह्य प्रमाणांवरून या नाटकाच्या रचनेचा काल इ. स. १६०० असावा असें ऱ्याच आंग्लविद्वानांचें मत आहे. या कवीच्या नाटकांचा काल निश्चित असा ठरविण्यास खात्रीलायक असा पुरावा नसल्यामुळें असलेल्या पुराव्यावरून तो ठरवावा लागतो. यामुळें सर्व विद्वानांचें याबद्दल एकमत असत नाहीं. तरी एकंदर गोष्टींकडे लक्ष देऊन प्रस्तुत नाटकाचा रचनाकाल इ. स. १६०० असावा असें ठरविण्यांत आलें आहे.

या नाटकाचें मूळ नांव " ट्वेल्थ नाईट " ऑर ' व्हाट् यू विल् ' असें आहे. हें नांव नाटकांतील कोणा पात्रावरून, किंवा कथानकास अनुसरून नाहीं. तर केवळ ज्या प्रसंगाकरतां प्रस्तुत नाटक लिहिलें गेलें त्याला अनुलक्षून कवीनें या नाटकास वरील नांव ठेविलें आहे. ख्रिस्तमसनंतर बारावे रात्रीं ' इपिफनी ' किंवा ' जंटाईल लोकांस ख्रिस्तदर्शन ' म्हणून ख्रिस्ती लोकांत एक उत्सव करीत असत. त्या प्रसंगीं करमणुकीकरतां प्रस्तुत नाटक लिहिलें असल्यामुळें त्यास पहिलें नांव ठेविलें. परंतु कित्येकांस तें बरें न वाटून त्यांनीं दुसरीं अनेक नांवें सुचविलीं. तेव्हां त्या सर्वांस खुष करण्याकरतां शेक्सपियर यास दुसरें ' व्हाट यू विल् ' म्हणजे ' तुम्हांस वाटेल तें ' असें नांव दिलें. कित्येक टीकाकार याची दुसरी एक उपपत्ति सांगतात. ते म्हणतात, यांत विनोद किंवा हास्य जें आहे तें निर-

निराळ्या प्रकारचें असून त्यांत उत्तम प्रसंग कोणता याबद्दल मतभेद झाल्यामुळें प्रत्येकानें तें आपल्या मतानें ठरवावें म्हणून हें दुसरें नांव आहे.

हें नाटक प्रस्तुत लेखकास बी. ए. च्या परीक्षेस नेमलेलें असल्यामुळें त्याचा अभ्यास करण्याची संधी आली व याचें मराठींत अजून भाषांतर झालेलें नसल्यामुळें त्यानें हा प्रयत्न केला, व तो मित्र मंडळीस दाखवितां त्यांस पसंत पडल्यावरून महाराष्ट्र वाचकवर्गापुढें आज ठेवीत आहें, तो त्यांसही पसंत पडो हीं जगदीशाजवळ प्रार्थना आहे.

इ. स. १९१० सालीं माजी '**सामाजिक नाटक मंडळी**' नें या नाटकाचे प्रयोग करून त्यास मराठी रंगभूमीवर आणलें याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

तसेंच '**चित्रशाळा**' छापखान्याच्या मालकांनीं हें नाटक छापून प्रसिद्ध केलें याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

तसेंच ज्या माझ्या कित्येक मित्रांनीं अनेक प्रकारें मला या कामीं मदत केली आहे त्यांच्या, व विशेषतः माझे मित्र रा. विश्वनाथ एकनाथ अष्टपुत्रे, बी. ए. यांनीं या नाटकांतील कविता करण्यांत मला जी मदत केली तीबद्दल त्यांचेही आभार मानणें अवश्य आहे.

या माझ्या मानलेल्या आभारांचा सर्वजण स्वीकार करोत अशी त्यांस प्रार्थना आहे.

शेवटीं जगच्चालक प्रभुचरणीं लीन होऊन ही प्रस्तावना पुरी करतों.

नागपूर.
ता. २०।६।१३.

बळवंत हरि पंडित.

भ्रमविलास नाटकांतील पात्रें.

प्रेमानंद—इंद्रभुवनचा राजा.

सत्यव्रत—विजयेचा भाऊ.

अनंतसेन—नौकापति व सत्यव्रताचा मित्र.

दुसरा एक नौकापति—विजयेचा मित्र.

वसंत व केशव—प्रेमानंदाचे सहचारी.

वंचकराज—आनंदीचा चुलता.

सदानंद—वंचकराजाचा मित्र.

मदनसेन—आनंदीचा कारभारी.

फजीत्या व विनोद—आनंदीचे नोकर.

आनंदी—एक सरदार कन्या.

विजया—सत्यव्रताची बहीण.

मालती—(आनंदीची सहचरी.)

सरदार, भट, नाविक, अधिकारी, गवई वगैरे.

स्थल—इंद्रभुवन शहर व त्या नजीकचा समुद्राकिनारा.

॥ श्री ॥

भ्रमविलास नाटक.

अंक पहिला.

प्रवेश जादा पहिला.

स्थळ--समुद्र.

नावेंत सत्यव्रत व विजया बसलीं आहेत.

विजया:—(सत्यव्रतास) दादा ! आपला गांव सोडून तूं मला घेऊन इंद्रभुवनास जात आहेस तें कशाकरतां तें कांहीं मला अजून सांगितलें नाहींस. आतां तरी तें मला कळूं देशील का ?

सत्यव्रत:—ताई ! इतकें का तुला कळूं नये ? अग, विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर चारचौघे ज्या उद्देशानें बाहेर पडतात त्याच उद्देशानें मीही इंद्रभुवनास जात आहें.

विजया:—अरे पण हें जर मला कळतें तर मीं तुला असें वरचेवर विचारलेंच नसतें. पण असें मोघम बोलण्यापेक्षां मला स्पष्टच कां सांगत नाहींस.

सत्य०:—अग ! विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर आपलें नशीब पाहण्याकरतां मी या प्रवासास निघालों आहें. आणखी बाबांनीं मरतांना तुला

माझ्या हवालीं केलें असल्यामुळें तुला एकटीला सोडून जाण्यापेक्षां आपल्या बरोबर तुला नेणें बरें म्हणून तुलाही बरोबर घेतली आहे समजलीस.

विजया:—बरें पण दादा ! तुझ्या गुणांचें चीज आपल्या राज्यांत झालें नसतें का ? गुणांना मान सर्वत्र मिळतो, मग तूं इंद्रभुवनास जायला कशाला निघालास ?

सत्य०:—आपल्या इथल्यापेक्षां इंद्रभुवनांत आपलें नशीब उघडण्याला जास्त सवलत आहे म्हणून चारचौघांचा सल्ला घेऊनच मग मीं हा बेत केला आहे. आपल्या राज्यापेक्षां इंद्रभुवनचें राज्य मोठें असून तेथले राजे महाराज स्वत: विद्वान् व शूर असून गुणग्राही आहेत असा त्यांचा लौकिक आहे. तेव्हां माझा विचार योग्य आहे कीं नाहीं हें तूंच सांग बरें ?

विजया:—आतां मला सर्व समजलें.

सत्य०:—शिवाय सध्यां तुला मी व मला तूं अशीं आपण दोघेंच परस्परांना जिव्हाळ्याचीं माणसें आहोंत. तेव्हां माझ्या कल्याणाबरोबरच तुझेंही कल्याण मला पाहिलें पाहिजे. तुला एकटीला घरीं ठेऊन मी परदेशांत गेलों तर आपल्याला एकमेकांबद्दल काळजी लागणार. म्हणून तुलाही चल म्हटलें. माझ्या बरोबरच इंद्रभुवनांत कदाचित् तुझेंही नशीब उघडेल.

विजया:—तें रे कसें ?

सत्य०:—अग ! तुझ्या रूपगुणांना योग्य असा तुला पति मिळेल. असें झालें तर मग माझी तुझ्याबद्दलची काळजीही पण दूर होईल, व तुला सुखांत पडलेली पाहून आईला आणि बाबांना स्वर्गांत देखील किती तरी आनंद होईल.



विजया—आहो ! पण हें वादळ जोरानें सुरू झालें. [अं.१ प्र. ५ वा. पृ. ३.]

विजया:—(घाबरून) पण दादा ! वर पाहिलेंस का ? इतका वेळ निरभ्र असलेलें आकाश मेघांनीं कसें एकदम भरून गेलें तें ! त्यांनीं सूर्याला देखील झांकला ! देवा ! आम्हीं किनाऱ्यावर पोंचेपर्यंत——

सत्य०:——अग ! यांत इतकें भिण्यासारखें काय आहे ? बायकांची जात–म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं–कितीही शिकली सवरली तरी भित्री ती भित्रीच.

विजया:—(जास्त घाबरून) बरें, पुरेत तुझ्या शौर्याच्या गोष्टी. हा पहा वारा देखील जोरानें वाहूं लागला ! देवा ! या मेघमारुतांच्या लढाईंत आमचें रक्षण कर. दादा ! नावाड्यांना किनाऱ्याकडे लवकर चला म्हणावें. आतां वादळ होणार. लक्षणें कांहीं नीट नाहींत. आई अंबाबाई ! माझ्या दादाला सुखी राख.

सत्य०:——(वादळ सुरू झालेलें पाहून) खरेंच वादळ सुरू झालें ! ताई ! घाबरूं नकोस. आपण लवकरच किनाऱ्यावर पोंचूं. (तांडेलास) अहो तांडेल ! वादळ सुरू झालें. नाव किनाऱ्यावर नेण्याची व्यवस्था करा. उगीच विषाची परीक्षा नको. (विमलेस) ताई ! धीर धर, देवाला सर्वांची काळजी आहे.

तांडेल:——माझें वादळाकडे लक्ष आहे सरदारसाहेब. नाव किनाऱ्या-कडेच जात आहे. काळजी करूं नका. आपण लवकरच किनारा गांठूं. भिण्याचें कांहीं काम नाहीं.

विजया:——देव करो आणि तुमच्या तोंडांत साखर पडो. अहो ! पण हें वादळ जोरानें सुरू झालें. (हात जोडून व डोळे मिटून नावेंत उभी राहते. वादळ जोरानें सुरू होऊन नाव उलटते. सर्वजण जीव वांचविण्याकरितां पाण्यांत धडपडतांना दिसतात.)

[पडदा पडतो.]

प्रवेश पहिला.

स्थळ--राजवाडा.

प्रेमानंद, केशव व इतर सरदार गवई व बजवय्ये यांसह प्रवेश करतात.

प्रेमानंदः---संगीत हें जर प्रेमाचें पोषक असेल तर चालूं द्या. ऐकून ऐकून मला त्याचा कंटाळा येईपर्यंत चालूं द्या. हं, मघाचाच अवरोह मला पुन्हां एकदां ऐकूं द्या. गुलाबवाटिकेवरून येणारा गंधवाह ज्याप्रमाणें घ्राणेंद्रियास तृप्त करतो, त्याप्रमाणेंच तुमचें तें संगीत माझ्या कर्णरंध्रांस सुखावह वाटलें. बस्स, पुरे. पूर्वीप्रमाणें हें मला आतां गोड वाटत नाहीं. समुद्रांत ज्याप्रमाणें सर्व गोष्टींचा समावेश होतो, व निमिषमात्रांत त्या स्वत्व सोडून तद्रूप होतात, त्याचप्रमाणें हे चंचल प्रणया ! तुझ्यापुढें कोणत्याही प्रकारचें संगीत असलें तरी तें त्वद्रूप होऊन जातें. त्याला स्वतःची स्वतंत्र किंमत मुळींच उरत नाहीं. प्रेमाप्रमाणें कल्पनेचीं चित्रें काढण्यांत पटाईत इतर कोणीही नाहीं.

केशवः—महाराजांची शिकारीला जाण्याची इच्छा आहे काय ?

प्रेमा०ः—काय ?

केशवः—मृगयेला चलण्याची महाराजांची इच्छा आहे काय ?

प्रेमा०ः—त्या मनोहारिणी आनंदीला पाहिल्यापासून मी हरीणच झालों आहें, आणि माझ्या इच्छा या क्रूर कुत्र्यांप्रमाणें त्या वेळेपासून माझ्यावर हल्ला करीत आहेत. मग पहा बरें सर्वोत्तम मृगाची इथेंच शिकार होते आहे कीं नाहीं ती.

(वसंत प्रवेश करतो त्यास)

हं, कसें काय ? तिच्याकडील कांहीं खबर !

वसंतः—महाराजांची कृपा असावी. माझा कांहीं तिच्यापर्यंत प्रवेश झाला नाहीं. आपल्या मृतभावाचें प्रेम सदैव जागृत ठेवण्याकरतां ती दिवसभर दु:खाश्रु ढाळीत असते. या अश्रु ढाळण्यानें तिचे डोळे बिघडण्याची देखील भीति वाटते. ती आपल्या तोंडावरील पदर देखील दूर करीत नाहीं, आणि सात वर्षेपर्यंत सहस्त्ररश्मी देखील तिचें मुखावलोकन करूं शकणार नाहीं, असा तिच्या दासीनें निरोप मात्र सांगितला.

प्रेमा०:—आपल्या भावाचें प्रेमऋण अशा रीतीनें फेडण्याइतकें जिचें मन उदार आहे, तिची बुद्धि आणि मन जर माझ्याच एका प्रेममूर्तीनें भरली. व इतर सर्व प्रेमाचा नाश करणाऱ्या मदनबाणांनीं ती विद्ध झाली म्हणजे मग ती मजवर किती बरें प्रेम करूं लागेल ! लताकुंजांत बसलें म्हणजे प्रेमविचारांना भरतें येतें तर चला आपण पुष्पवाटिकेंत जाऊं.

(जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—समुद्रकिनारा.

विजया, नौकापति व इतर खलाशी प्रवेश करतात.

विजया:—हा कोणता देश आहे ?

नौका०:—बाई ! याला इंद्रभुवन म्हणतात.

विजया०:—मी या इंद्रभुवनांत काय करूं ! माझा भाऊ तर खऱ्या

इंद्रभुवनांत म्हणजे स्वर्गांत आहे. पण कदाचित् तो बुडालाही नसेल, तुम्हांला कसें वाटतें ?

नौका०—तुम्ही स्वतां वांचला ही तरी एक अकल्पितच गोष्ट झाली म्हणावयाची.

विजयाः—आणि अशाच एखाद्या अकल्पित रीतीनें माझा भाऊही वांचला असेल.


नौका०:—खरेंच बाईसाहेब. संभाव्य गोष्टींनीं जर समाधान होत असेल तर मी आपल्यास खात्रीपूर्वक असें सांगतों कीं, ज्या वेळेस आपलें जहाज फुटलें, व आपण आणि आपल्या बरोबर वांचलेले लोक जेव्हां आमच्या जहाजावर आले, तेव्हां संकटांत न डगमगणारा आपला भाऊ धैर्य आणि आशा यांच्या शिकवणीनें आपल्याला समुद्रावर तरंगणाऱ्या एका मजबूत शिडाला बांधून घेतलेला माझ्या दृष्टीस पडला. त्या वेळेस समुद्रतरंगावर हेलकावे खात असलेला तो मला नक्रपृष्ठावर बसून डुलणाऱ्या गंगेप्रमाणें दिसला.

विजयाः—या सुवार्तेबद्दल हें घ्या तुम्हांला बक्षीस. माझ्या सुटकेमुळेंच त्याच्या सुटकेबद्दल माझ्या मनांत आशा उत्पन्न झाली, व तिला आपल्या भाषणानें दुजोरा आला. आपल्याला या देशाची माहिती आहे काय ?

नौका०:—होय, बाईसाहेब. येथून जायला एक घटका देखील लागत नाहीं इतक्या जवळच्या प्रांतांत माझा जन्म झाला, व माझें बालपणही तेथेंच गेलें असल्यामुळें मला येथील चांगली माहिती आहे.

विजयाः—येथील सत्ताधारी कोण आहे ?

नौका०:—येथील राजेसाहेब फार सुशील आणि उदार आहेत.



सदानंद—एवढेंचना ? हा घे, धर माझा हात. [अं. १ प्र. ३ पृ. ११.]

विजया:—त्यांचें नांव काय ?

नौका॰:—त्यांचें नांव प्रेमानंद महाराज.

विजया:—प्रेमानंद ! माझ्या बाबांच्या तोंडून मीं हें नांव ऐकलें आहे. त्या वेळेस त्यांचें लग्न देखील झालें नव्हतें.

नौका॰:—आणि अजून देखील ते अविवाहित आहेत, निदान थोड्या दिवसांपूर्वींपर्यंत तरी ते तसे होते. कारण एक महिनाच झाला असेल, मी जेव्हां हा देश सोडला, तेव्हां ते सुंदरी विमलेवर प्रेम करीत असून तिच्याशीं लग्न करण्याच्या खटपटींत होते अशी दाट वदंता होती. थोरांच्या गोष्टी सर्वांच्या तोंडीं होतात, त्याचप्रमाणें ही गोष्टही सगळी-कडे पसरली होती.

विजया:—ही विमला कोण ?

नौका॰:—ही एका सरदाराची मुलगी आहे. फार सद्गुणी आहे. हिचा बाप नुकताच एक वर्षापूर्वीं कैलासवासी झाला. तेव्हां हिचा सांभाळ करण्याचें काम हिच्या भावाकडे आलें. पण तोही मग थोड्याच दिवसांनीं परलोकीं गेला आणि अशी वदंता आहे कीं, या प्रेमळ भावाच्या विरह–दुःखामुळें ती मंडळींत मिसळत नाहीं, आणि कोणाच्या दृष्टीसही पडत नाहीं.

विजया:—या बाईची माझ्या हातून कांहीं सेवा होईल तर फार बरें होईल. माझा कार्यभाग होऊन योग्य वेळ येईपर्यंत माझी कोणालाच खरी माहिती कळूं नये, अशी माझी फार इच्छा आहे.

नौका॰:—ही बाई तर कोणाच्याच विनंतीला मान देत नाहीं. खुद्द राजेसाहेबांची देखील विनंति ती ऐकत नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें आपली इच्छा सफल होणें कठीणच दिसतें.

विजया:—महाराज, आपला स्वभाव फार चांगला दिसतो. आणि कित्येक प्रसंगीं सुंदर काया असून मन मात्र दुष्ट असलेलें आढळतें, तरी आपल्या ठिकाणीं मात्र सुंदर स्वरूपाप्रमाणेंच सुशील मनही असल्याबद्दल मला खात्री वाटते. म्हणून मी आपल्याला एक विनंति करतें कीं माझें सत्यस्वरूप आपण गुप्त ठेवा. आणि माझ्या कार्यसिद्धीकरतां लागणारा पोषाख मिळवून देण्यांत आपण मला साह्य करा. या आपल्या श्रमांचा मी आपल्याला योग्य मोबदला देईन. येथल्या राजेसाहेबांची सेवा करावी, असा माझा मानस आहे व त्याकरितां आपण माझा त्यांच्या येथें एक दास म्हणून परिचय करून द्या. हे आपले श्रम अगदींच व्यर्थ जाणार नाहींत. मला गातां येतें व थोडेंसें वाजवितांही येतें. या माझ्या गायन-वादनाच्या योगानें मी राजेसाहेबांची चित्तवृत्ति संतोषित करून त्यांच्या सेवेस मी योग्य असल्याबद्दल त्यांची खात्री करून देईन. पुढील गोष्टी कालाधीन आहेत. या सर्व गोष्टी आपण गुप्त राखा म्हणजे झालें.

[जातात.]

प्रवेश पहिला.

स्थल—आनंदीचें घर.

वंचकराज आणि मालती प्रवेश करतात.

वंचक०:—माझ्या पुतणीनें आपल्या भावाच्या मरणाबद्दल इतकें दु:ख करीत बसण्याचें हें काय वेड घेतलें आहेन्‌ ? दु:ख करीत बसल्यानें जीवितनाश मात्र होईल.

मालती:—वंचकराज, मी शपथपूर्वक सांगतें कीं आपल्या या वेळीं

अवेळीं येण्यानें बाईसाहेबांना फार राग येतो. तर आपण रात्रीचे लवकर परत येत जा.

वंचक०:—अं: वाईट गोष्टीबद्दल राग येणें साइजिक आहे.

मालती:—हो, पण आपण मात्र आज्ञाधारकत्व धारण केलें पाहिजे.

वंचक०:—धारण केलें पाहिजे ! माझ्या आतांच्या पोषाखापेक्षां कांहीं उंची पोषाख मी धारण करणार नाहीं. हा माझा पोषाख मंडळींत जावयाला उत्तम आहे; आणि हे माझे जोडेही तसेच आहेत जर ते तसे नसतील तर त्यांना फांशी लावून टांगून ठेवीन.

मालती:—हें अशा प्रकारचें दारू पिऊन धुंद असणें आपल्या नाशाला कारण होईल. आपल्या दारू पिण्याबद्दल व बाईसाहेबांची प्रणय-याचना करण्याकरतां आपण आणलेल्या त्या नंदीबैलाबद्दल कालच बाई-साहेब बोलत होत्या.

वंचक०:—कोणाबद्दल ? सदानंद सरदाराबद्दल ?

मालती:—होय, त्याच्याच बद्दल.

वंचक०:—तो तर या इंद्रभुवनांतल्या सुंदर पुरुषांत गणला जाण्या-सारखा आहे.

मालती:—मग त्याचा काय उपयोग ?

वंचक०:—कां बरें ? शिवाय त्याचें तीन हजार रुपयांचें वार्षिक उत्पन्न आहे.

मालती:—हो, पण तें त्याला एक वर्षभर तरी मिळेल का ? तो तर उधळ्या आणि मूर्ख आहे.

वंचक०:—छत् ! तूंच असें म्हण पाहिजे तर. त्याला तर सारंगी

वाजवितां येते. पुस्तकांशिवाय त्याला तीन चार भाषांत पुस्तकाप्रमाणें शब्दशः बोलतां येतें. त्याच्यावर सृष्टिदेवीचा वरद हस्तच आहे म्हण.

मालती:—अगदीं खरेंच. दुर्गुणांचा नुसता पुतळाच जणूं काय ? मूर्ख तर मूर्ख आणि वर भांडखोर. पण त्याचें भांडण विकोपास जाऊं नये म्हणूनच कीं काय त्याच्यांत भित्रेपणाही आहे. हा गुण जर त्याच्यांत नसता तर त्याची स्मशानयात्रा केव्हांच झाली असती असें चांगल्या शहाण्या लोकांचें म्हणणें आहे.

वंचक०:—जे असें म्हणतात ते लुच्चे आणि नसते धंदे करणारेच असले पाहिजेत. सांग पाहूं असें कोण म्हणतात ते.

मालती:—ते आणखी असेंही सांगतात कीं आपण आणि ते रोज रात्रीं यथेच्छ सुरासेवन करतां.

वंचक०:—सुरासेवन करण्यायोग्यच आहे. या इंद्रभुवनांत सुरादेवीचें अस्तित्व आहे, आणि माझ्यांत शक्ति आहे तोंपर्यंत मी ही सेवा अखंड चालू ठेवणार. एखाद्या उंच शिखरावरील हेलकावणाऱ्या पताकेप्रमाणें मन भ्रमण करीपर्यंत जो सुरासेवन करणार नाहीं त्याला मी भित्रा आणि लुच्चा समजतों. कां मृगनयने ! असेंच कीं नाहीं ? हा पहा सरदार सदानंदच इकडे येत आहे, तर आतां—गांभीर्य अवलंबस्व.

(सदानंद येतो.)

सदा०:—कसें काय वंचकराज महाराज ?

वंचक०:—आनंदीआनंद आहे सरदारसाहेब.

सदा०:—कसें काय ? ठीक आहे ना त्राटिकाबाई ?

मालती: आणि आपण कोण महाराज ?

वंचकः—सरदारसाहेब ! प्रीणय.

सदा०:—म्हणजे ?

वंचक०:—म्हणजे ही माझ्या आनंदीची सहचरी.

सदा०:—बरें आहे. प्रीणयबाईसाहेब, आपल्याबद्दल आणखी कांहीं माहिती ?

मालती०:—माझें नांव मालती.

सदा०:— ठीक. मालती प्रीणयबाईसाहेब—

वंचक०:—आपण चुकतां सरदारसाहेब. प्रीणय म्हणजे तिची क्षमा मागा, तिचें मन प्रसन्न करा, तिच्यापुढें हात जोडा.

सदा०:—नाहीं रे बाबा. आपल्या सर्वांच्या देखत कांहीं मी हिच्या विरुद्ध हातांत जोडा घेणार नाहीं. प्रीणय याचा हाच का अर्थ ?

मालतीः—बरें, आतां मी जातें तर.

वंचक०:—अहो सरदारसाहेब ! ही जर आतां गेली तर मला वाटतें तुम्हांला हातांत तरवार धरण्याचें कांहीं कारण उरणार नाहीं.

सदा०:—खरोखर, बाईसाहेब ! मला देखील वाटतें कीं आपण गेल्यावर मला तरवार हातीं घेण्यास उत्साह आणणारें कांहीं साधन राहणार नाहीं. आपल्या हातीं मूर्ख सांपडले आहेत असें का आपल्यास वाटतें ?

मालतीः—महाराज, मीं कांहीं आपल्याला धरलें नाहीं आहे.

सदा०:—एवढेंच ना ? हा घे धर माझा हात. (धरते.)

मालतीः—आपला हात जरी मीं धरला आहे तरी पण महाराज प्रणयदायी मन हें स्वतंत्र आहे.

सदा०:—काय ? याचा अर्थ तरी काय ?

मालती:—अं:, तो रुक्ष आहे.

सदा०:—हो, मला देखील असेंच वाटतें. बरें पण आपली कोटी तरी काय ?

मालती:—ती एक आपली रुक्ष कोटी होती.

सदा०:—आपल्याजवळ असल्या रुक्ष गोष्टींचा बराच भरणा आहे वाटतें ?

मालती:—होय महाराज. या माझ्या हाताच्या बोटावरच आहेत. पण हा पहा मीं तुमचा हात सोडला. आतां मात्र मजजवळचा रुक्ष गोष्टींचा सांठा संपला. (जाते.)

वंचक०:—सरदारसाहेब, आपण एक पेलाभर दारू प्या म्हणजे जरा उत्साह येईल. आपला असा पाडाव झालेला तर मीं कधींच पाहिला नव्हता.

सदा०:—दारू पिऊन पडलों तरच. त्याशिवाय माझा पाडाव झालेला आपण जन्मांत कांहीं पाहिला नसेल. एखाद्या साधारण मनुष्याइतकी देखील मला बुद्धि नसावी असें मला एखादे वेळेस वाटतें. मद्यमांसासारख्या जडान्नाचा मी भोक्ता असल्यामुळें कदाचित् त्याचा परिणाम होऊन माझी बुद्धीही जड झाली असावी असें मला वाटतें.

वंचक०:—नि:संशय असेंच.

सदा०:—मला जर हें पूर्वीच कळतें, तर मीं जडान्नाचा कधींच त्याग केला असता. बरें पण वंचकराज, उद्यां घरीं परत जावें असें मला वाटतं.

वंचक०:—किमर्थम् सरदारसाहेब ?

सदा०:—किमर्थम् म्हणजे काय ? जाऊं कीं नको. मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं तरवार फेरण्यांत, नाच शिकण्यांत किंवा शिकारी करण्यांत मीं जो वेळ दवडला, तोच जर भाषा शिकण्यांत घालविला असता तर फार बरें झालें असतें. ही कला मिळविली असती तर किती बरें उत्तम झालें असतें ?

वंचक०:—आपण जर कलाभिज्ञ असतेत, तर मग आपण आपले केस कसे उत्तम ठेवले असतेत !

सदा०:—कां त्यानें माझे केस सुंदर झाले असते ?

वंचक०:—निःसंशय; कारण तुम्ही पाहातांच आहां कीं, तुमचे केस निसर्गतः कांहीं कुरळे नाहींत. त्यांना कुरळे करण्याची तरी एक कलाच आहे कीं नाहीं ?

सदा०:—पण आतां आहेत हेच मला चांगले शोभतात; कां होय कीं नाहीं ?

वंचक०:—फारच सुरेख. तुमच्या मानेवर तें अंबाडीच्या वाकासारखे शोभतात. आपली बायको आपलें डोकें धरून त्याच्या दोऱ्या वळील असें मला वाटतें.

सदा०:—वंचकराज महाराज, उद्यां आम्ही आपले परत जाणार. आपल्या पुतणीचें दर्शन देखील होईना, आणि समजा झालें तरी हजार हिश्शांनीं ती कांहीं मला वळणार नाहीं. अहो, प्रत्यक्ष इथले राजेसाहेबच्च तिची मनधरणी करीत आहेत.

वंचक०:—ती कांहीं राजेसाहेबांचें म्हणणें ऐकत नाहीं. आपल्यापेक्षां ऐश्वर्यानें, वयानें अथवा विद्येनें श्रेष्ठ असणाराशीं कांहीं ती विवाह करणार

नाहीं. मीं तर तिला असें शपथेवर बोलतांना ऐकलें आहे, आणि यांत पुष्कळ तथ्य आहे सरदारसाहेब.

सदा०:—बरें तर मग मी आणखी एक महिनाभर राहतों. मी एक मोठा विचित्र स्वभावाचा मनुष्य आहें. कधीं कधीं मला नाटकें आणि नाच, तमाशे यांतच मजा मारीत रहावें असें वाटतें.

वंचक०:—सरदारसाहेब, या गोष्टींत आपण वाकबगार आहांत तर मग ?

सदा०:—माझ्यापेक्षां मोठे लोक सोडून या इंद्रभुवनांतील कोणाचीहि मी बरोबरी करूं शकेन म्हाताऱ्याशीं मात्र माझी तुलना करूं नका अं.

वंचक०:—आपल्याला कोणत्या प्रकारचा नाच उत्तम येतो ?

सदा०:—मला अजोड्डाण नांवाचा नाच उत्तम येतो.

वंचक०:—खरेंच कीं काय ?

सदा०:—या नाचांत माझें उलट जाण्याचें कौशल्य तर कांहीं विचारूंच नका.

वंचक०:—या गोष्टी आजपर्यंत आपण गुप्त कां ठेवल्यात ? या गोष्टी कांहीं झांकून ठेवण्याच्या नव्हत. तसबिरीवर धुरळा बसतो, त्याप्रमाणें या गोष्टीही मळतील अशी आपल्याला भीति वाटते कीं काय ? आपण फिरायला किंवा देवदर्शनाला जातां तेव्हां नाचतच कां जात येत नाहीं ? मला जर नाचतां येतें कीं नाहीं तर मीं आपले सर्व व्यवहार नाचतच केले असते. या जगांत गुण झांकून ठेवावेत असें का आपलें मत आहे ? आपल्या पायांची ठेवण, व पोटऱ्यांचा बांधा मीं पाहिला, तेव्हांच मला वाटलें कीं हे अवयव नाचण्याशिवाय कांहीं असे बनले नसावेत.

सदा०:—खरेंच हे फार चांगले बनले आहेत, आणि मी जेव्हां नारिंगी रंगाचे मोजे घालतों तेव्हां तर माझे पाय फारच सुरेख दिसतात. चला आपण थोडेसे नाचूं.

वंचक०:—आपण दुसरें काय करणार ? आपण वृषभराशीवरच तर जन्मलां आहां.

सदा०:—पण वृषभराशीची सत्ता बरगड्या आणि हृदय यांच्यावर असते.

वंचक०:—छे ! छे ! ! तिची सत्ता पायांवरच असते, आणि म्हणून या राशीवर जन्मलें असतां चांगलें नाचतां येतें. मला एकदां आपलें नाचणें पाहूं द्या सरदारसाहेब. (सदानंद नाचतो) वाहवा ! उत्तम ! ! बहोत खाशी ! ! ! (जातात.)

प्रवेश पांचवा.

स्थल—राजवाडा.

वसंत आणि पुरुषवेषांत विजया प्रवेश करितात.

वसंत:—कुसुमसेन, राजेसाहेबांची जर आपल्यावर अशीच कृपा राहिली, तर आपली चांगलीच बढती होणार म्हणायची. त्यांची आणि तुमची तीन दिवसांची ओळख पण तुम्ही तर त्यांचे अगदीं विश्वासपात्र झालांत.

विजया:—ज्या अर्थी तुम्ही महाराजांच्या प्रेमाबद्दल संशय दाखवितां, त्या अर्थी त्यांच्या स्वभावाच्या लहरीपणामुळें म्हणा, किंवा माझ्या हातून होणाऱ्या हलगर्जीपणामुळें म्हणा पण तुम्हांला भय वाटतें आहे. कां महाराजांची कृपा अळवावरच्या पाण्याप्रमाणें चंचल आहे कीं काय ?

वसंत:—तसें कांहीं नाहीं याबद्दल विश्वास ठेवा.

विजया:—तथास्तु. पण ते पहा महाराजच इकडे येत आहेत.

[प्रेमानंद, केशव, व इतर नोकर प्रवेश करतात.]

प्रेमा०:—अरे! कुसुमसेनाला कोणीं पाहिला काय?

विजया:—हा आपला सेवक सेवेंत सादर आहे महाराज.

प्रेमा०:—अरे! तुम्ही सर्वजण जरा दूर उभे रहा. (ते जातात.) कुसुमसेन, तुला सर्व माहीत झालेंच आहे. मीं आपलें हृदयकपाट तुझ्या पुढें उघडें केलेंच आहे. तर आतां तूं तिच्याकडे जा. तिनें भेटत नाहीं म्हटलें तरी ऐकूं नको. तिच्या दारांत उभा रहा, आणि तिच्या इथल्या सर्व मंडळीला सांग कीं तिची भेट होईपर्यंत तूं तिथेंच खांबासारखा अचल उभा राहणार म्हणून.

विजया:—पण महाराज! लोक म्हणतात त्याप्रमाणें जर ती आपल्या दु:खांत चूर असेल, तर ती माझी कांहीं झालें तरी भेट घेणार नाहीं.

प्रेमा०:—आग्रह धर कीं काय पाहिजे तें कर, पण गेलास तसा हात हालवीत परत येऊं नकोस म्हणजे झालें.

विजया०:—बरें पण, महाराज, मी तिच्याशीं बोलूं तरी काय?

प्रेमा०:—मी तिच्यावर किती प्रेम करतों तें तिला सांग. माझ्या प्रेमाच्या कथा सांगून तिला गारीगार करून सोड. एखाद्या वृद्ध मध्यस्था-पेक्षां तुझ्या सारख्या सुंदर तरुण पुरुषाला माझ्या दु:खांची कहाणी सांग-ण्याचें काम फार चांगलें साधेल. ती तुझ्या तोंडून माझी हकीकत ऐकून तरी घेईल.

विजयाः—पण मला कांहीं असें वाटत नाहीं.

प्रेमा०:—अरे, माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेव. तुला जे मोठा मनुष्य समजतात, त्यांना तुझ्या वयाचा मुळींच अंदाज नाहीं असें म्हटलें पाहिजे. तुझे ओठ तरी किती नाजूक; रतीला लाजवितील. तुझा आवाज तरी किती गोड, आणि कोमल; कोकिलेच्या आवाजाशींच त्याची तुलना केली पाहिजे. आणि तुझे इतर अवयव तरी किती स्त्रियांच्या सारखे आहेत. तुझा जन्म मोठ्या चांगल्या ग्रहावर झाला असला पाहिजे.जारे, याच्या बरोबर दोघेचौघे जा. वाटेल तर सर्वजण देखील जा. मी जेव्हां एकटा असतों तेव्हां मला फार चांगलें वाटतें. जा, फत्ते मिळीव म्हणजे मग माझ्या सर्व संपत्तीचा माझ्याप्रमाणेंच तूंही धनी होशील.

विजयाः—आपल्या प्रेमपात्र आनंदीबाईचें मन वळविण्याकरतां मी आपली पराकाष्ठा करीन. (एकीकडे) माझ्या मनांत काय हें द्वंद्व सुरू झालें आहे ! यांच्याकरतां मी कोणाचीही मनधरणी केली तरी यांची पत्नी मीच होणार हाच माझा पण. [जाते.]

प्रवेश पांचवा.

स्थळ—आनंदीचें घर.

मालती आणि विनोद प्रवेश करतात.

मालतीः—तूं मला कोठें गेला होतास तें खरें सांग. नाहीं तर तुझ्या तर्फे मी एक शब्द देखील बोलणार नाहीं. तुझ्या गैर हजिरीबद्दल बाई-साहेब तुला चांगला लंब्बे करणार आहेत.

विनोदः—एवढेंच ना ? एकदां लंबा झालों म्हणजे मग मला कोणाचेंच भय उरणार नाहीं. मग ' अरिध्वजासी कोण घालितो भीक ? '

मालतीः—कसें सांग पाहूं ?

विनोदः—कारण मग मी कोणालाच बघूं शकणार नाहीं. मग भ्यायचें कोणाला ?

मालतीः—कांहीं तरी गांवढळासारखें बोललास झालें. ' अरिध्वजासी कोण घालितो भीक ? ' या म्हणीचा उगम कोठें झाला हें मी सांगूं का तुला ?

विनोदः—हं, सांग बरें.

मालतीः—अरे रणांगणांत. आपल्या मूर्खपणाच्या प्रदर्शनांत या माहितीचा तूं उपयोग कर.

विनोदः—असें तर आहेच. स्वाभाविक शहाणपण नसेल, तर मूर्खांनीं तें आपली बुद्धि खर्च करूनच प्राप्त करून घेतलें पाहिजे.

मालतीः—आपण जरी शहाणे असलां तरी पण इतका वेळ गैरहजर राहिल्याबद्दल आपल्याला चांगलें चौदावें रत्न बक्षीस मिळणार आहे. नाहीं तर अर्धचंद्र हा आपला ठरलेलाच. हेंही कांहीं लहान बक्षीस नाहीं.

विनोदः—मार खातां खातां मेलों तर संसारत्रासांतून सुटलों, आणि जर मला हांकलून दिलें तर मोलमजुरी तर कुठें गेली नाहीं.

मालतीः—तूं तरी पक्का बिलंदर आहेस.

विनोदः—अगदींच नाहीं. पण मी दोन खूणगांठी मात्र पक्क्या मारून ठेवल्या आहेत.

मालती:—एक सुटली, तर दुसरी; आणि दोन्ही सुटल्या तर मग—आपण दिगंबर व्हाल.

विनोद:—कसें छान बोललीस. अगदी बरोबर. बरें, तूं आपल्या वाटेनें जा कशी. वंचकराजांनीं दारूचें व्यसन सोडलें तर ते देखील तुझ्या विनोदी स्वभावाची साक्ष देतील.

मालती:—गप्प, खबरदार त्याबद्दल बोलशील तर. बाईसाहेब इकडेच येत आहेत, तर आपला पुरावा सज्ज करून तयार रहा. [जाते.]

विनोद:—हे बुद्धिदेवते, तुझी मजवर कृपा असेल तर या वेळेस मला विनोद करण्यांत साह्य कर. जे आपल्यावर तुझा वरदहस्त आहे असें समजतात, ते बहुतेकवेळां मूर्खच ठरतात. पण मी कांहीं तसें समजत नाहीं, तर माझी शहाण्यांत गणना होऊं दे. " मूर्ख कोटीबाजा-पेक्षां कोटीबाज मूर्ख बरा, " असें आनंदार्क स्वामी म्हणतात.

[मदनसेनासह आनंदी प्रवेश करते.]

मुजुरा करतों बाईसाहेब.

आनंदी:—घेऊन जा येथून मूर्खाला.

विनोद:—कारे ऐकूं येत नाहीं का ? बाईसाहेबांना घेऊन जा येथून.

आनंदी:—चल, मूर्ख नाहीं तर. मला तुझी मुळींच जरूर नाहीं, बेइमानी कुठला.

विनोद:—हे दोन्ही दोष सुधारतां येतील बाईसाहेब. मला दारू पाजा म्हणजे मी शहाणा होईन, आणि उपदेशानें इमानी होईन. सद्गुणाचा अतिरेक म्हणजेच दुर्गुण, आणि दुर्गुणाचा अभाव म्हणजे सद्गुण. या साध्या तर्कशानानें जर आपलें समाधान होईल तर ठीक, नाहीं तर मग

माझा काय उपाय ? संकटासारखा शिक्षक नाहीं, आणि सौंदर्यासारखें कांहीं चंचल नाहीं. अरे, अजून तुम्ही स्वस्थच. मूर्खाला घेऊन जा म्हणून बाईसाहेबांनीं हुकूम केला नां ? जा तर त्यांना घेऊन.

आनंदीः—मीं तुला घेऊन जा म्हणून सांगितलें.

विनोदः—केवढी तरी ही चूक. मी खुषमस्कऱ्या असलों तरी कांहीं मूर्ख नाहीं. वेषावरून मनुष्याची परीक्षा होऊं लागली तर माझ्या डोक्यांत वटाटेच भरले आहेत असें म्हणावें लागेल. पण आपली परवानगी असेल तर आपण मूर्ख असल्याचें मी सिद्ध करून देईन.

आनंदीः—करशील ?

विनोदः—अगदीं बेमालूम तऱ्हेनें.

आनंदीः—बरें, कर तर मग सिद्ध.

विनोदः—पण त्याकरतां मला आपल्याला कांहीं प्रश्न विचारले पाहिजेत. अहो सद्‌गुणकलिकाबाई ! उत्तर द्याल ना ?

आनंदीः—मलाही आतां कांहीं तरी करमणूक पाहिजेच आहे. तर पाहूं दे मला तुझें बुद्धिकौशल्य.

विनोदः—बाईसाहेब ! आपण अलिकडे शोक कशाबद्दल करीत असतां ?

आनंदीः—मूर्खा, भावाच्या मृत्यूबद्दल.

विनोदः—मग मला वाटतें आपला भाऊ नरकांत गेला असेल.

आनंदीः—नाहीं. माझी खात्री आहे कीं तो स्वर्गसुख अनुभवीत असेल.

विनोदः—मग तर आपण मूर्खपणाचा कळसच केलात. स्वर्गांत गेलेल्या भावाबद्दल का कोणी शोक करतें ? चलारे घेऊन जा येथून यांना.

आनंदीः— मदनसेन, या वेड्या खुषमस्कऱ्याबद्दल तुमचें काय मत आहे ? हा बराच हुषार झाला आहे असें नाहीं तुम्हांला वाटत ?

मदन०ः—होय, मलाही असेंच वाटतें. हा दिवसेंदिवस असाच हुषार होत जाणार. बुद्धिभ्रंशानें शहाण्याला वेडेपण येतें, आणि वेडेपणाला भर मिळते.

विनोदः—देव करो आणि आपल्या वेडेपणांत भर पडण्याकरतां बुद्धिभ्रंशाचा आपल्याला लवकरच लाभ होवो. मी लंबकर्ण नाहीं असें वंचकराज शपथपूर्वक सांगतील, पण आपण वेड्या नाहीं असें म्हणण्याला त्यांची जीभ हलणार देखील नाहीं.

आनंदीः—कां मदनसेन, यावर आपलें काय म्हणणें आहे ?

मदन०ः—असल्या निरस विनोदांत आपल्याला मजा वाटते हें मोठें आश्चर्य आहे. परवां एका गांवढळ मनुष्यानें देखील याची फजिती केली. हा पहा शुद्धीवर देखील नाहीं. आपण याच्या भाषणाला हंसून जर उत्तेजन देणार नाहीं, तर मग याला बोल देखील फुटणार नाहीं. ह्या असल्या पोटार्थी खुषमस्कऱ्यांच्या चेष्टा पाहून हंसून त्यांना उत्तेजन देतात, ते शहाणे असले तरी यांच्याच योग्यतेचे असतात असें मी खात्रीपूर्वक सांगतों.

विमलाः—मदनसेन, तुम्हांला कीं नाहीं मीपणानें फार पछाडलें आहे. आणि त्या मुळें तुमच्या आवडी देखील विलक्षण झाल्या आहेत. ह्या अशा गोष्टींचें तुम्हांला फार भय वाटतें, पण जरा उदार आणि मोकळ्या मनानें त्यांच्याकडे पहा, म्हणजे त्या अगदीं गोगलगाईप्रमाणें

निरुपद्रवी दिसतील. या पोटभरू मस्कऱ्यांनीं कोणाची कुचेष्टा केली तरी त्यांत कोणाची निंदा होत नाहीं, आणि शहाण्यानें जरी कोणाचा दोष दाखविला तरी त्यानें आपली निंदा केली असाच लोकांचा समज होतो.

विनोद:—हे म्हसोबा म्हाळसाई ! आमच्यासारख्या खुषमस्कऱ्यांचा बाईसाहेब असाच कैवार घेवोत. [मालती येते.]

मालती:—दाराशीं एक तरुण पुरुष आला असून त्याची आपल्याशीं बोलण्याची फार इच्छा आहे.

आनंदी:—प्रेमानंद महाराजांकडून आला असेल. होय नां ?

मालती:—तें कांहीं मला कळलें नाहीं बाई साहेब. तो स्वत: सुंदर असून तरुण आहे, आणि त्यांच्या बरोबर मंडळीही बरीच आहेत.

आनंदी:—त्याला दरवाजावर कोणीं आडविला आहे ?

मालती:—आपल्याच वंचकराजांनीं.

आनंदी:—जा, त्यांना दूर कर. ते बोलतात तरी काय वेड्यासारखें. (मालती जाते.) मदनसेन, तुम्ही ही जा, आणि जर तो तरुण प्रेमानंद महाराजांकडून आला असेल,तर माझी प्रकृति अस्वस्थ आहे, किंवा मी घरीं नाहीं, किंवा तुम्हांला काय वाटेल तें सांगून त्याला परत लावा. (मदनसेन जातो.) विनोद ! पहा तुझी मस्करी दिवसेंदिवस कशी नीरस होऊं लागली ती. लोकांना तिचा कंटाळा यायला लागला.

विनोद:—पण बाईसाहेब, आपण आमची अशी तरफदारी केलीत कीं जणूं काय आपला ज्येष्ठ पुत्र मस्कऱ्याच होणार आहे. असें झालें तर सरस्वती त्याच्या जिव्हाग्रीं बसो. हे पहा,काकासाहेब बिनबुद्धे इकडेच आले.

[वंजकराज प्रवेश करतात.]

आनंदी:—हे तर अर्धवट धुंदच दिसतात. काका, दरवाज्यावर कोण आलें आहे ?

वंचक:—एक गृहस्थ.

आनंदी:—एक गृहस्थ ! कोण तो ?

वंचक०:—तो एक आपला गृहस्थ आहे–(खोकतो) ह्या द्राक्षांचा सत्यानाश होऊन जावो, म्हणजे मग त्याचें आसवच होणार नाहीं. बरें मग तुझें काय म्हणणें ?

विनोद:—वंचकराज महाराज ! ठीक तर आहेना ?

आनंदी:—काका, अहो काका ! पण आज इतक्या सकाळींच तुम्ही इतके धुंदसे दिसतां ?

वंचक०:—मी धुंद ? धुंदीची मला अतीशय चीड आहे. बरें पण त्या दारावरच्या गृहस्थाबद्दल ?

आनंदी:—होय. पण तो कोण आहे ?

वंचक०:—तो कोणी कां असेना. मनुष्य असो नाहीं तर पिशाच्च असो, आपल्यास काय त्याचें. [जातो.]

आनंदी:—विनोद, दारू प्यालेल्या मनुष्याची स्थिति कोणासरखी असते ?

विनोद:—वेडा, पागल आणि बुडणाऱ्या मनुष्यासारखी. एक घोट-भर प्याल्यानें तो वेडा बनतो, दुसरा घोट घेतला तर पागल होतो,

आणि तिसऱ्या घोटास तो भोंवऱ्यांत सांपडलेल्या मनुष्याप्रमाणें बुडूं लागतो.

आनंदीः—जा तर लवकर. काकासाहेब सध्या तिसऱ्या स्थितींत आहेत. बुडतील एखादे. जा त्यांना संभाळ.

विनोदः—ते सध्यां दुसरींतच आहेत. मूर्ख मनुष्याला संभाळण्याला मस्कऱ्या विनोदच योग्य आहे. [जातो.]

[मदनसेन येतो.]

मदन०:—बाईसाहेब तो गृहस्थ तर आपल्याशीं बोलण्याचा हट्टच घेऊन बसला आहे. आपली प्रकृती अस्वस्थ आहे म्हणून सांगितलें, तर तो म्हणतो कीं, हें मला ठाऊक आहे. आपल्याला झोंप लागली आहे म्हणून सांगितलें तरी तो ऐकत नाहीं. तो आपल्याशीं बोलल्याशिवाय परत जाणार नाहीं असें म्हणतो. तर त्याला आतां काय सांगूं ? कांहीं सांगितलें तरी तो ऐकत नाहीं.

आनंदीः—त्याला सांगा कीं, मी त्याच्याशीं बोलूं इच्छित नाहीं.

मदन०:—हें तर मीं त्याला सांगितलें. पण तो म्हणतो कीं मी सावकाराच्या तगादेदारासारखा येथें उभा राहीन आणि आपल्याशीं बोलेन तेव्हांच जाईन.

आनंदीः—कशा प्रकारचा मनुष्य असेल बाई हा !

मदन०:—पुरुषासारखा,

आनंदीः—स्वभावानें कसाकाय आहे ?

मदन०:—फारच हेकट. तुमची मर्जी असो वा नसो तो आपल्याशीं बोलणारच म्हणतो.

आनंदीः—बरें स्वरूपानें आणि वयानें ?

मदन०:—पोक्त मनुष्यापेक्षां लहान आणि मुलापेक्षां मोठा आहे. त्याचें एक पाऊल बाल्यांत व दुसरें तारुण्यांत आहे स्वरूपानें सुंदर आणि बोलण्यांत हुशार. ओंठ पिळला तर दूध निघेल इतका कोमल.

आनंदीः—जा, त्याला येऊं द्या, आणि मालतीलाही इकडे धाडून द्या.

मदन०:—(जातां जातां) मालती, अग मालती, बाईसाहेब बोलावतात तुला. [जातो.]

[मालती येते.]

आनंदीः—मालती जा माझा शालू घेऊन ये पाहूं. (आणते, व आनंदी तोंडावरून बुरखा घेते) आणखीं एकदां प्रेमानंदाच्या वकिलाचें बोलणें ऐकूं.

[विजया व एक नोकर प्रवेश करतात.]

विजयाः—आनंदीबाईसाहेब कोणत्या ?

आनंदीः—हं. माझ्याशीं बोला. आपलें काय म्हणणें आहे ?

विजयाः—हे रतीला लाजविणारे सौंदर्य मूर्ति ! आपणच येथील गृह-स्वामिनी काय ? आपल्याला या पूर्वी पाहिलेलें नसल्यामुळें असें विचारावें लागत आहे. मीं आपलें भाषण काळजीपूर्वक तयार केलें असून तें मुखो-द्गत करण्याकरतांही मला फार श्रम पडले आहेत, तेव्हां तें अनाठायीं बोलून माझ्या श्रमांचें साफल्य कसें होणार ? अहो सुशील बायांनो, माझ्याकडे अशा तिरस्कारदृष्टीनें बघूं नका. कारण या अशा तिरस्कार-दृष्टीला मी अगदीं अनभ्यस्त आहें.

आनंदीः—आपण कोठून आलां ?

विजयाः—मीं जें पाठ केलें आहे त्यापेक्षां जास्त मला कांहींच सांगतां येत नाहीं. आपला हा प्रश्न माझ्या पाठाव्यतिरिक्त आहे. आपणच जर येथील स्वामिनी आनंदीबाई असाल, तर मी आपलें भाषण पुढें चालवितों.

आनंदीः—आपण नाटकी गृहस्थ तर नाहीं ?

विजयाः—नाहीं बाईसाहेब. बाकी आपल्याच पायांची शपथ घेऊन सांगतों कीं, मी जसा दिसतों तसा मात्र नाहीं. बरें पण आपणच का येथील स्वामिनी ?

आनंदीः—होय, दुसऱ्यांच्या हक्कास जर धक्का बसत नसेल तर तीच मी.

विजयाः—आपण आपल्या स्वामिनी होण्यांत दुसऱ्याचे हक्क बुडतात. जें दुसऱ्याकरतां देवानें निर्माण केलें आहे, त्यावर आपला हक्क कसा बरें असूं शकेल ? पण मी हें काय बोलतों आहें ? हें तर माझ्या पाठ केलेल्या भाषणाबाहेरील आहे. बरें तर मी भाषणास सुरुवात करतों, आणि मग माझ्या निरोपाचें ह्द्गत सांगेन.

आनंदीः—माझी स्तुति जरी गाळलीत तरी मी रागावणार नाहीं. आपल्या येण्याचा मुख्य उद्देश सांगा म्हणजे झालें.

विजयाः—अरेरे ! मग माझे श्रम व्यर्थच गेले म्हणायचे. मी आपली स्तुती रसभरित केली आहे.

आनंदीः—म्हणूनच त्यांत अतिशयोक्ति असेल, तर ती आपल्या जवळच राहूं द्या. तुम्हीं दारावरच कोडगेपणा केलात असें ऐकलें, तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें, आणि तुम्हांला बघावें म्हणून इथें येऊं दिलें. तुमचें

भाषण ऐकावें हा कांहीं माझा उद्देश नव्हता. तुम्हांला जर वेड लागलें असेल, तर येथून निघून जा; जर शुद्धीवर असाल, तर काय सांगावयाचें असेल तें थोडक्यांत सांगून टाका. तुमचें हें वेडगळ भाषण ऐकावयाला मला वेळ नाहीं, आणि वेडही पण लागलें नाहीं.

मालती:—अहो राव, आपण आपलें तारूं येथून आतां हांकलाल कां ? हा पहा तुमचा रस्ता.

विजया:—नाहीं, तांडेलसाहेब, मला येथें कांहीं वेळ मुक्काम करावयाचा आहे. आपल्यासारख्या मोठ्या लोकांची आमच्यावर कृपा असावी. (आनंदीस) मी एक आपला निरोप्या आहें. आपला मानस कसा काय आहे ?

आनंदी:—आपली प्रस्तावनाच जर एवढी भयंकर, तर निरोप किती भयंकर असेल ? बरें बोला काय तें लवकर.

विजया:—तें फक्त तुम्हांलाच सांगायचें आहे. मी कांहीं तुम्हांला युद्धाला बोलावीत नाहीं कीं कांहीं देणगी मागत नाहीं. मी प्रेमदूत आहें मी आणलेला निरोप गुप्त असला तरी पण साधा आहे.

आनंदी:—परंतु तुम्ही सुरुवात तर उद्धट रीतीनें केलीत. बरें पण तुम्ही कोण ? आणि तुम्हांला काय पाहिजे.

विजया:—आपल्या इथें माझी जी संभावना झाली त्यामुळेंच मल असा उद्धटपणा करावा लागला. मी कोण, आणि मला काय पाहिजे ह्या गोष्टी एखाद्या कुमारिकेच्या मुखकमलाप्रमाणेंच झांकून ठेवावयाच्या आहेत. आपण एकट्यानेंच ऐकल्या तर ह्या गोष्टी पवित्र राहतील, इतरांनीं ऐकल्या तर अपवित्र होतील.

आनंदी:—जारे तुम्ही सर्वजण दूर व्हा. मला ह्यांचें हें पुराण ऐकूं द्या. (मालती व इतर सर्व जातात.) हं चला, करा सुरू आपलें पुराण.

विजया:—अहो सर्वगुणसंपन्न बाईसाहेब—

आनंदी:—प्रारंभ तर फार चांगला केलात. पण तुमचा कथाभाग कुठें आहे ?

विजया:—प्रेमानंद महाराजांच्या हृदयपर्वांत.

आनंदी:—त्यांच्या हृदयपर्वांत ! त्या पर्वांतील कोणच्या अध्यायांत ?

विजया:—याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे प्रथमाध्यायांत असेंच म्हटलें पाहिजे.

आनंदी:—तो तर मीं वाचला आहे, सर्व पाखंड मतानें भरला आहे. यापेक्षां ज्यास्त तर तुम्हांला कांहीं सांगावयाचें नाहीं ना ?

विजया:—बाईसाहेब, आपलें एकदां मुखावलोकन व्हावें अशी इच्छा आहे.

आनंदी:—तुमच्या धनीसाहेबांचा माझ्या मुखाला कांहीं निरोप आहे कीं काय ? पण हें तुमच्या पुराणाबाहेरचें आहे. तथापि मी आपला बुरखा दूर करत्यें. हें पहा माझें चित्र. ही मी अशी आहें. कां चांगली आहें ना ? (बुरखा दूर करते.)

विजया:—वा ! हें काय विचारणें ? ईश्वरानिर्मित सृष्टींतील अमूल्य सौंदर्य.

आनंदी:—हा रंगही पण पक्का आहे. हा हवेनें विटायचा नाहीं, आणि पाण्यानें निघायचा नाहीं.



आनंदी—ते माझ्यावर प्रेम करतात म्हणजे कसें ? [अं. १ प्र. ५ पृ. २९]

विजया:—खरोखरच अवर्णनीय. या आपल्या गौरवर्णात गुलाबी रंगाची छटा देण्यांत विधात्यानें फारच कौशल्य दाखविलें आहे. आपण आपली प्रतिमा जगांत न ठेवतां जर इहलोकचा वास संपवाल, तर आपण फारच कठोर मनाच्या ठराल.

आनंदी:—इतकी कांहीं मी कठोर होणार नाहीं. मी आपल्या सौंदर्यवर्णनाच्या अनेक प्रती करून ठेवीन, आणि त्यांत प्रत्येक अवयवाची नोंद करीन. उदाहरणार्थ, नग पहिला, दोन लालभडक ओंठ, दुसरें दोन काळे भोर पापण्यासुद्धां डोळे, तिसरें एक मान, एक हनुवटी इ. इ. कां? तुमची योजना माझी स्तुति करण्याच्याच कामावर झाली आहे वाटतें?

विजया:—तुमचें खरें स्वरूप आलें आतां माझ्या ध्यानांत. तुम्हांला मीपणाचा फार गर्व आहे. परंतु एक फार वाईट गोष्ट झाली आहे, ती कोणती तर तुम्ही सुंदर आहां ही. माझे धनीसाहेब तुमच्यावर फार प्रेम करतात, आणि प्रत्यक्ष रतीला देखील अशा प्रेमाची फेड प्रेमानेंच केली पाहिजे.

आनंदी:—ते माझ्यावर प्रेम करतात म्हणजे कसें?

विजया:—रात्रंदिवस आपलें ध्यान करतात, आपली मूर्ति अंतरें-द्रियांपुढें आणून आपल्या नांवाचा जप करतात, बोलण्याला विषय देखील आपल्याशिवाय दुसरा कांहीं त्यांना सुचत नाहीं. जळीं, स्थळीं, उठतां-बसतां, काम करतां आपण त्यांच्यापुढें असतां. प्रल्हादाला जसा सर्वत्र नारायण दिसत होता, त्याप्रमाणें महाराजांना सर्वत्र आपण दिसतां.

आनंदी:—महाराजांवर मी प्रेम करूं शकत नाहीं हें तर त्यांना ठाऊकच आहे. ते सद्गुणी आहेत, धनवान् आहेत, अकलुषित तारुण्य

त्यांच्या अंगीं आहे, बोलण्यांत गोड आहेत, रूपानें सुंदर आहेत, सर्व कांहीं त्यांच्याजवळ आहे, तरी पण मी त्यांच्यावर प्रेम करूं शकत नाहीं. हें तर त्यांना पूर्वीच कळवायाला पाहिजे होतें.

विजयाः—महाराजांच्या सारखेंच जर माझें आपल्यावर प्रेम असतें, व त्यामुळें जर मला त्यांच्या प्रमाणेंच त्यापासून क्लेश झाले असते तर आपलें नकारार्थी उत्तर मीं कधींच ऐकलें नसतें.

आनंदीः—कां ? आपण काय केलें असतेंत ?

विजयाः—काय केलें असतें ? मी आपल्या देहाला पिंजरा समजून, त्यांत आपल्या आत्म्याला पोपट केलें असतें, व आपल्या दाराशीं त्याची स्थापना केली असती. प्रेमाचीं सुंदर गाणीं रचून रात्रंदिवस त्यांचा घोष केला असता. त्यांच्याच प्रतिध्वनीनें दाही दिशा भरून टाकल्या असत्या, व सर्वत्र ' आनंदी ' नांवाशिवाय कोणताच आवाज ऐकूं येऊं दिला नसता. एकंदरींत आपल्याला मनुष्य देहांत असून माझी करुणा आल्याशिवाय राहती ना असें केलें असतें.

आनंदीः—तुम्ही पुष्कळ करूं शकाल म्हणा, पण आपलें कुलशील काय ?

विजयाः—मी दिसतों त्यापेक्षां उच्च कुलांतला आहे. माझी स्थिति चांगल्यापैकीं आहे. मी एक सुखवस्तु सधन गृहस्थ—

आनंदीः—आतां आपण परत आपल्या धन्याकडे जा, आणि त्यांना सांगा कीं माझी कांहीं त्यांच्यावर प्रीति नाहीं. त्यांनीं पुनः माझ्याकडे मनुष्य पाठविण्याची तसदी घेऊं नये. आपली इच्छा असेल, तर या माझ्या निरोपाचा त्यांच्याकडून कसा काय स्वीकार होतो, हें कळविण्यास

आपण या. आपण येऊन मजवर फार उपकार केलेत याबद्दल मी आपली फार अभारी आहें. (कांहीं दागिना पुढें करून) याचा मजकरतां स्वीकार करावा.

विजया:—मी भाडोत्री जासूद नव्हे. आपलें बक्षिस आपणच ठेवा. जर कांहीं बक्षीस द्यावें अशी तुमची इच्छा असेल तर तें माझ्या धनीसाहेबांना द्या. मला कांहीं त्याची गरज नाहीं. आपण कोणावर तरी प्रेम करालच, तर देव करो आणि त्याचें मनही वज्राप्रमाणें कठोर होवो; आणि महाराजांच्या प्रेमाची जशी आपण तुच्छतेनें अवहेलना करतां, तद्वतच आपल्या प्रेमाची आपल्या प्रेमपात्राकडून अवहेलना होवो. हे निर्दयदेवते ! घेतों तर मी तुझी रजा. [जाते.]

आनंदी:—' आपलें कुलशील काय ? ' म्हणून विचारलें तर त्यांनीं काय उत्तर दिलें बरें ? काय म्हणे ' मी दिसतों त्यापेक्षां उच्च कुलांतला आहें, माझी स्थिति चांगल्यापैकीं आहे. मी एक सुखवस्तु सधन गृहस्थ आहें. ' हें त्याचें म्हणणें खरें असेल अशी मला देखील खात्री वाटते. त्यांचा आवाज, चेहरा, नीटस अवयब, विचार आणि आचार हे सर्व त्यांच्या म्हणण्याला दुजोरा देत होते. पण मना, असें उतावीळ होऊं नकोस, जरा धीर धर. प्रेमानंद महाराजांच्या जागीं हे असते तर ! त्यांच्या प्रमाणेंच हे माझ्यावर प्रेम करतील कां ? प्रेमामुळें लोक वेडे कसे होतात याचें मलाच थोड्या वेळांपूर्वी आश्चर्य वाटत होतें, पण आतां माझी तीच स्थिति झाली आहे. प्रेमाचा पगडा माझ्यावर इतक्यांत बसावा काय ? या तरुणांत कांहीं तरी मोहनी असली पाहिजे. बरें, पण याचा विचार करून काय होणार ? कोण आहे तिकडे ? मदनसेन !

[मदनसेन येतो.]

मदनः—काय आज्ञा आहे ?

आनंदीः—प्रेमानंद महाराजांच्या त्या विचित्र मनुष्याच्या पाठोपाठ जा, आणि ही त्यानें येथें ठेवलेली आंगठी त्याला देऊन, मला हिची कांहीं गरज नाहीं असें त्याला सांग. आपल्या धन्याला मजबद्दल आशा लावून त्याची मर्जी प्रसन्न करण्याची खटपट करूं नको, असेंही त्याला सांग. माझा जन्म कांहीं महाराजांकरतां नाहीं. जर हाच तरुण उद्यां मला येऊन भेटेल, तर मी त्याला याचें कारण सांगेन. जा तर मग लवकर.

मदनः—हा पहा चाललों बाईसाहेब. [जातो.]

आनंदीः—मी काय करतें आहे हेंच मला समजत नाहीं. माझे डोळे माझ्या मनाला आशा लावून फसवीत आहेत अशी मला भीति वाटते. बरें वाईट करणें आमच्या हातांत नाहीं. नशिबा, तूं करशील तसें होईल. जसें व्हावयाचें असेल तसें होईल. मात्र तें माझ्या इच्छेप्रमाणें झालें तर उत्तमच.

[जाते.]

अंक पहिला समाप्त.

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—समुद्रकिनारा.

अनंतसेन आणि सत्यव्रत प्रवेश करितात.

अनंत०:—तुम्ही आतां थांबत नाहीं ? किंवा मलाही बरोबर येऊं देत नाहीं म्हणतां ?

सत्य०:—हो. पण आपण याबद्दल राग मात्र मानूं नये. माझे ग्रह या वेळीं बऱ्यावर नाहींत, व कदाचित् माझ्या दुर्दैवाचा परिणाम आपल्यावरही होईल. म्हणून म्हणतों कीं, माझें दुर्दैव मलाच एकट्याला भोगूं द्या. त्यांत तुम्हांला भागीदार करणें हें आपलें माझ्यावर जें प्रेम आहे त्याचा उत्तम मोबदलाच होणार आहे !

अनंत०:—पण तुम्ही जाणार कोठें हें तरी कळूं द्या.

सत्य०:—तें सांगणें शक्य नाहीं. माझा प्रवास म्हणजे केवळ वाऱ्याबरोबर वाहत जाणें आहे. आपल्या विनयामुळें आपण माझ्या मनांतील गोष्ट काढून घेणार नाहीं अशी मला आशा आहे, पण आपल्या याच गुणामुळें मला आपलें सर्व आपल्याला सांगावें असेंच वाटतें. अनंतराव, माझें नांव सत्यव्रत. रंभाजी हें मीं धारण केलेलें नांव. मणिपूरचे सत्यशील यांचें नांव तुम्हीं ऐकलें असेलच, तेच माझे वडील. त्यांच्या पश्चात्

मी आणि माझी एक बहीण अशीं आम्ही दोघेंच राहिलों. आम्ही एकाच तासांत जन्मलेलीं जुळीं भावंडें होतों, आणि ईश्वराची इच्छा असती तर आमचा अंतही एकाच घटकेंत झाला असता. परंतु महाराज, आपण तसें घडूं दिलें नाहींत, कारण आपण मला समुद्रांतून बाहेर काढलेंत, त्यापूर्वीं घटकाभरच माझी बहीण बुडून गतायु झाली असावी.

अनंत०:—अरेरे !

सत्य०:—तिच्या माझ्यांत जरी पुष्कळ साम्य होतें, तरी ती माझ्यापेक्षां फार सुंदर होती, असें पुष्कळांचें मत होतें. जरी माझा यावर पूर्ण विश्वास नाहीं, तरी शत्रूदेखील चांगला म्हणेल असा तिचा स्वभाव होता, हें मी देखील प्रांजलपणें सांगतों. ती समुद्राच्या क्षारोदकांत केव्हांच बुडाली, परंतु अजूनही मी तिची आठवण अश्रुसेचनानें बुझविण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत आहें.

अनंत०:—तुमचें आदरातिथ्य तुमच्या योग्यतेप्रमाणें माझ्या हातून झालें नाहीं याबद्दल माफ करा.

सत्य०:—माझ्याबद्दल तुम्हांला जे श्रम पडले त्याबद्दल तुम्हींच मला क्षमा केली पाहिजे, अनंतसेन.

अनंत०:—मीं जगावें अशी आपली इच्छा असेल तर माझ्या हातून आपली सेवा घडूं द्या.

सत्य०:—तुम्हीं मला वांचविलें आहे, व पुढेंही मीं आणखी जगावें अशी जर आपली इच्छा असेल, तर असें कांहीं मागूं नका. माझें अंतःकरण अजून देखील माझ्या आईप्रमाणेंच फार कोमल आहे, व क्षुल्लक कारणावरून देखील या डोळ्यांतून गळणारे अश्रु माझें अंतःकरण

किती कोमल आहे तें दाखवितील, करतां आपण एकदम येथून जा कसे. मी आतां प्रेमानंद महाराजांच्या दरबारांत जाणार.

(जातो.)

अनंत०:—देव तुझें रक्षण करो. माझे जर प्रेमानंदमहाराजांच्या दरबारांत शत्रु नसते, तर मीं तेथें तुझी लवकरच भेट घेतली असती. काय होईल तें होवो, मी तुझी भेट घेणारच; तुझ्यावरील प्रेमापुढें मला असल्या संकटांची मुळींच भीति वाटत नाहीं.

(पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—रस्ता.

विजया प्र. क. आणि मदनसेन तिच्या पाठोपाठ येतो.

मदन०:—आपणच आतां आनंदीबाईसाहेबांकडे आलां होतांना ?

विजयाः—होय, नुकताच मी त्यांच्याकडे गेलों होतों. तेथून निघालों तो हळुहळू चालतां चालतां येथपर्यंत आलों आहें.

मदन०:—महाराज, त्यांनीं आपली ही आंगठी परत पाठविली आहे. आपणच जर ही घेऊन आलां असतां, तर मला आतां हे श्रम पडले नसते. त्यांनीं आपल्याला असें सांगितलें आहे कीं, आपण आपल्या धनीसाहेबांना त्यांच्यावर बाईसाहेबांचें मुळींच प्रेम नाहीं असें निश्चित सांगा. त्यांनीं आपल्याला असेंही सांगितलें आहे कीं आपण पुन्हा महाराजांतर्फे बोलण्याकरतां येण्याची तसदी घेऊं नये. महाराज या

निरोपाचा कसा काय स्वीकार करतात हें सांगण्याकरतां पाहिजे तर आपण बाईसाहेबांच्याकडे या. या आंगठीचा आपण स्वीकार करावा.

विजया:—त्यांनीं तर ही आंगठी मजजवळून घेतली; आतां कांहीं मी ती परत घेणार नाहीं.

मदन०:—ही तर आपण त्यांच्याकडे तिरसटपणानें टाकलीत, आणि बाईसाहेबांची इच्छाही अशा रीतीनें परत करावी अशी आहे. (ती तिच्या आंगावर फेंकतो.) उचलून घेण्याइतकी जर हिची योग्यता असेल तर वांका आणि घ्या; नाहींतर पडली राहूं द्या, ज्याला सांपडेल तो घेईल.

(जातो.)

विजया:—या बाईची ही काय इच्छा आहे तरी? मी तर तिला आंगठी दिली नव्हती. देव करो, आणि ती माझ्या बाह्यांगाला भुललेली नसो म्हणजे झालें. ती माझ्याकडे कशी टक लावून पहात होती, आणि पहातां पहातां तिचें सर्व लक्ष बघण्यांत गुंतल्यामुळें तिला बोलायचें-देखील भान नव्हतें, आणि म्हणूनच ती मधेंच थांबे, पुन्हां बोले असा प्रकार चालला होता. खरोखर तिचें माझ्यावर प्रेम जडलें असावें, आणि या प्रेमामुळेंच ती मला पुन्हां या विचित्र मनुष्याकरवीं बोलावीत आहे. बरें ही महाराजांची आंगठी आहे म्हणावें, तर मला पक्कें ठाऊक आहे कीं, त्यांनीं कांहीं तिला आंगठी पाठविली नाहीं. तिचें माझ्याचवर प्रेम असलें पाहिजे; आणि जर असें असेल तर गरीब बिचारीच्या प्रेमाच्या शेवटीं स्वप्नवत् होणार आहे. हे वेषांतरा! तूं किती तरी निष्ठुर आहेस! तुझ्या आश्रयानें लुच्चा मनुष्याला आपलें कौशल्य दाखविण्याला चांगलें फावतें. एखाद्या कावेबाज परंतु सुंदर मनुष्याला स्त्रियांच्या मृदु हृदयांत आपल्या मूर्तीची स्थापना करणें किती तरी सोपें असतें! पण याचा दोष

आपल्या कमकुवतपणावर आहे. आपल्याला देवानें जसें घडविलें तसे आपण आहोंत. बरें पण याचा शेवट कसा होणार ? महाराज तिच्यावर अतिशय प्रेम करतात, आणि ही अभागिनी पण त्यांच्यावर तशीच लोलुप झाली आहे, आणि मला पुरुष समजून तीही मजवर अनुरक्त आहे. याचा शेवट तरी काय होणार ? मी मनुष्यवेषांत असल्यामुळें महाराजांच्या प्रेमाबद्दल तर निराशाच झाली आहे, आणि खरी स्त्री असल्यामुळें बिचाऱ्या आनंदीला तर दुःखाचे सुस्कारेच टाकावे लागतील. पण जाऊं द्या ती गोष्ट. या गोष्टीचा उलगडा करण्याचें काम कालाधीन आहे. हें काम माझ्या आटोक्याबाहेरचें आहे.

(जाते.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—आनंदीचें घर.

वंचकराज आणि सदानंद प्रवेश करतात.

वंचक०:—या सदानंद सरदार. मध्यरात्रीपुढें आंथरुणावर पडून न राहणें म्हणजेच लवकर उठणें, आणि ‘ प्रातःकालीं उठावें ’ हें कविवचन तर तुम्हांला ठाऊकच आहे.

सदा०:—नाहीं बोवा, मला मुळींच माहीत नाहीं; पण उशिरां आंथरूण सोडणें म्हणजेच उशिरां उठणें हें मात्र मला पक्कें ठाऊक आहे.

वंचक०:—अगदींच खोटें अनुमान. दारूच्या रिकाम्या पिपाचा मला जितका तिटकारा आहे तितकाच असल्या अनुमानांचा मला

तिटकारा आहे. मध्यरात्रीपर्यंत जागणें, आणि लगेच झोंपी जाणें म्हणजेच लवकर निजणें होय. मध्यरात्रीनंतर निजावें हेंच योग्य वेळीं निजणें होय हाच याचा अर्थ आहे. आपलें जीवित पंचतत्त्वात्मक आहे ना ?

सदा०:—हो, असें म्हणतात खरें, पण माझें मत जर विचाराल, तर खाण्यापिण्याचेंच आपलें जीवित बनलें आहे.

वंचक०:—तुम्हीं तर विद्वानच आहां. चला तर आपण आतां खाण्यापिण्याची मजा करूं. मालती, अग मालती ! मदिरापात्र आण पाहूं.

(विनोद येतो.)

सदा०:—हा पहा एक गद्धा आला.

विनोद:—कसें काय दोस्त ! आपण तीन गद्धयांचें चित्र कधीं पाहिलें नाहींत का ?

वंचक०:—यावें फाल्गुनराज. बरें दोस्त एक गाणें तर म्हणा.

सदा०:—खरोखर विनोद तुझा आवाज तर फारच उत्तम आहे. तुझ्यासारखे चंचल पाय, आणि सुंदर आवाज यांची किंमत मी एक शंभर रुपयांहून जास्त समजतों. कालरात्रीचा तुझा विनोद तर फारच छान होता. सद्विचारानंदस्वामी, कन्या राशी आणि वर ग्रह आणि त्या गोष्टी फारच बहारीच्या. आपल्या प्रेमपात्राकरतां पाठविलेली रुपयांची पंचकडी पोंचली कीं नाहीं ?

विनोद:—हो हो. ती मी आपल्या खिशांत देखील ठेवली. मदनसेनाचें नाक तीक्ष्ण असलें तरी आपल्या ह्या संबंधाचा वास येण्याइतकें कांहीं तें तीक्ष्ण नाहीं. बाईसाहेब म्हणाल तर केवळ रतिच आहेत. आणि न्यायकचेऱ्या कांहीं अजून दारूचे गुत्ते झाले नाहींत.

सदा०:—वा ! सुरेख. खऱ्या विनोदाचा सर्व सांठा संपला म्हणजे मग हा असला विनोद देखील पसंत वाटतो. बरें पण आतां एक गाणें.

वंचक०:—हो, चल म्हण. ही घे एक पावली, पण लवकर म्हण.

सदा०:—चल, ही घे माझी एक पावली. एका सरदारानें दिल्यावर—

विनोद०:—कसलें गाणें म्हणूं ? प्रेमाचें कीं नीतीचें ?

वंचक०:—बस्स. प्रेमगीत. प्रेमगीत.

सदा०:—बस्स. मलाही तेंच आवडतें. नीतीबीती कांहीं नको.

विनोदः—(गातो.)

पद.

इंदुवदने ! कुठे रमसी, मला त्यजुनी । मला त्यजुनी ॥
तुझा प्रेमी हृदय दावी, ऐक गानीं । ऐक गानीं ॥
शमन करिगे प्रणयवणवा दर्शनांनीं । दर्शनांनीं ॥
प्रेमपात्रां भेटि होते अंति, ऐशी काव्यवाणी । काव्यवाणी १

सदा०:—बहोत उत्तम !

वंचक०:—सुरेख, सुरेख.

विनोदः—(गातो.)

पद.

तें प्रेम असे वद काय बरें ॥ ध्रु० ॥
[हा]स्याविनोदीं जीवित सुखकर, लोकिं वचन नच काय खरें १ ध्रु०
[क]ाय पुढें या प्राक्तनिं लिहिलें, आली घटका साध त्वरें ॥ २ ध्रु० ॥

हा प्रणयकोप कां रुचतो ॥ प्रियेग ॥
हा काळ आयु दवडीतो ॥ प्रियेग ॥
प्रणयदानिं नच विलंबबरवा, विद्ध-तरुण हा मदनशरें ॥ ३ ध्रु० ॥
प्रियरमणी ! आलिंगनिं चुंबनि, नयनिं थांबवी बाष्पझरे ४ ध्रु० ॥

सदा०:—किती तरी मधुर आवाज हा.

वंचक०:—कोमलही पण तसाच.

सदा०:—खरोखर बोवा, फारच सुंदर आणि सुकुमार.

वंचक०:—जिभेनें जर आपण याच्या आवाजाची परीक्षा करूं तर तो निरोगी असलेला आढळेल. आकाश भेदून जाईल एवढ्या मोठ्या आवाजांत आपण एखादें गाणें म्हणूं या. पंचप्राण बाहेर निघतील एवढ्या आवाजांत आपण गाऊं. कां तुमचें काय मत आहे ?

सदा०:—तुमची इच्छा असेल तर होऊं द्या. गाण्याच्या कामांत तर मी अगदीं गंधर्वच आहें.

विनोद:—देवाशपथ कांहीं लोक फारच हुशार असतात.

सदा०:—अगदीं बरोबर. बरें आपलें गाणें ‘ अरे लुच्च्या ’ हेंच असूं द्या.

विनोद:—‘ अरे गप्प, अरे लुच्च्या ’ सरदारसाहेब ? सरदारसाहेब, आपल्याला अरे लुच्च्या म्हणण्याला मला फार संकोच वाटतो बोवा.

सदा:—मला लुच्च्या म्हणण्याला लोकांना लावण्याचा हा कांहीं पहिला प्रसंग नाहीं. हं विनोदा, चल म्हण, ‘ अरे गप्प. ’

विनोद:—मी जर गप्प राहिलों तर मी गाणें कसें सुरू करणार ?



मदनसेन—अहो महाराज, तुम्ही वेडे आहांत, कीं आहांत तरी कोण ? [अं. २ प्र. ३ पृ. ४१.]

सदा०:—वा ! उत्तम. चला म्हणा. (गाणें म्हणतात.)

[मालती येते.]

मालतीः—हा कसला कल्ला करतां आहां ? मदनसेन कारभाऱ्याला बोलावून तुम्हांला जर बाईसाहेब घराबाहेर हांकलणार नाहींत, तर माझें नांव बदलून टाका.

वंचक०:—आनंदी जर एकपट हुशार तर मी दसपट आणि मदनसेन तर वैशाखनंदनच. मी आणि ती एका कुळांतलेच आहों हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ? (गातो.) ' दिल्लीमध्यें असे एक सरदार बाईगे । "

विनोदः—सरदारसाहेब तर आज खूप आनंदाच्या तारेंत आहेत.

सदा०:—वंचकराज जेव्हां आनंदांत असतात तेव्हां खूप मजा करतात, तशीच मी देखील करतों. त्यांच्या मजेंत शहाणपणा आणि विनोद असतो, तर माझी वेडगळ पण स्वाभाविक असते.

वंचक०:—(गातो.) ' ग्रीष्मऋतू युवयुवतींना तोष देतसे. '

मालतीः—अहो जरा गप्प बसा.

[मदनसेन प्रवेश करतो.]

मदन०:—अहो महाराज, तुम्ही वेडे आहांत, कीं आहांत तरी कोण? तुम्हांला कांहीं शहाणपणा, चालरीत, प्रामाणिकपणा कांहीं ठाऊक आहे का ? वेड्यासारखें अशा रात्रीच्या वेळीं असे ओरडत काय सुटतां ? मनसोक्त रीतीनें गर्दभ सुरांत वेडींवांकडीं गाणीं म्हणून हें घर म्हणजे दारूचा गुत्ता करतां कीं काय ? स्थळ, काळ, मनुष्यें यांचा कांहीं विचार शिवत नाहीं वाटतें तुम्हांला ?

वंचक०:—आम्ही गाणीं कशी तालसुरांत म्हणतों, आणि तुम्हीं त्याला नांवें ठेवतां ! चला चालते व्हा येथून.

मदन०:—अहो वंचकराज, मला आतां तुमच्याशीं सरळ आणि स्पष्टच बोललें पाहिजे. बाईसाहेबांचा असा निरोप आहे कीं आपण माझे काका आहांत तरी आपलें हें वर्तन मला मुळींच खपणार नाहीं. आपला हा उद्दामपणा जर आपण सोडून द्याल तर हें घर आपलेंच आहे, नाहीं तर तुम्ही हें घर सोडून चालते व्हा कसे. बाईसाहेबांना त्यांत फार आनंद होणार आहे.

वंचक०:—' हृदयदेवते ! निरोप घेतों जाणें जरि गे भाग मला । '

मालती:—असें म्हणून चालणार नाहीं वंचकराज.

विनोद:—' तन्नयन सुचविती वास तयाचा येथिल कीं सरला । '

मदन०:—असें आहे काय ?

वंचक०:—' परि मजपुढें न येई यमराजा । '

विनोद:—वंचकराज, तुम्हांला मरण हें येणारच .

मदन०:—वा ! फारच शहाणे आहांत !

वंचक०: —' काय कथूं तयाला जा, जा, जा. ? । '

विनोद:—' काय तयाचा फायदा ? । '

वंचक०:—' तया न माफी देऊं का ?। येथुन हांकुन लावूं का ?। '

विनोद:—' नका, नका, नका, असें करूं नका । '

वंचक०:—आपला सूर चुकला महाराज; आपण खोटें बोलतां. आपण कारभाऱ्यापेक्षां मोठ्या हृदयाचे गृहस्थ आहांत वाटतें ! आपण एक नीतीच्या

पार्यी मजा करण्याचें सोडलेंत म्हणून काय जगांतील रागरंग मजा नाहींशीं होणार आहे वाटतें ?

विनोद:—उत्तम बोललांत. देवाशपथ लोक मजाही मारणारच.

वंचक०:—अगदीं ठीक. जा, मदनसेन कारभारी, आपल्या कामाला लागा. मालती एक सुरापात्र भरून आण.

मदन०:—बाईसाहेबांच्या कृपेची जर तुम्हांला कांहीं किंमत वाटत असेल तर तुम्ही अशा रीतीनें वागून त्यांना राग आणूं नका. हा पहा मी चाललों, जाऊन सर्व हकीकत त्यांना सांगतों. [जातो.]

मालती:—जा माकडा.

सदा०:—एखाद्याला युद्धाला आव्हान करावें, वेळेवर वचनभंग करून त्याला फशी पाडावें हें जितकें चांगलें आहे तितकेंच भुकेच्या वेळीं दारू पिणें हेंही चांगलें म्हणतां येईल.

वंचक०:—खरेंच सरदारसाहेब, तुम्ही असें कराच. मी तुम्हांला आव्हानपत्र लिहून देतों, नाहीं तर मी तुमचा त्याच्यावरचा राग त्याला तोंडींच सांगतों.

मालती:—वंचकराजमहाराज, आजची रात्र तरी शांत रहा. राजेसाहेबांचा तो तरुण दूत आज बाईसाहेबांकडे आला होता, आणि तेव्हांपासून त्यांची वृत्ति कांहीं ठीक नाहीं. मदनसेनाबद्दल जर म्हणत असेल तर तें काम माझ्याकडे सोंपवा. मी जर त्याला आपल्या कृतीनें जाळ्यांत अडकवून फशी पाडून लोकांच्या थट्टेचा विषय करणार नाहीं, तर मग मला आपण अगदीं अक्कलशून्य म्हणा. माझी तर खात्री आहे कीं मी त्याला हंसण्याचा विषय करीन म्हणून.

वंचक०:—हं. आम्हांला तर कळीव तुझी युक्ति.

मालती:—तो कधीं कधीं अगदीं वैराग्यवृत्तीनें वागतो.

सदा॰:—मला हें जर ठाऊक असतें, तर मीं त्याला कुत्र्यासारखा बेदम मार दिला असता.

वंचक॰:—काय ? वैराग्यवृत्तीबद्दल मार ? वा ! सर्वोत्कृष्ट कारण सरदारसाहेब !

सदा॰:—याच्याबद्दल मला सर्वोत्कृष्ट कारण कांहीं देतां येत नाहीं, पण माझें कारण सबळ मात्र आहे.

मालती:—त्याचें वैराग्य का वैराग्य तितकेंच आहे म्हणा ! कशी तरी वेळ मारून नेतो झालें. अहंमन्य ! गद्धा नाहींतर; राजकारणाच्या पुष्कळशा गोष्टी तो तोंडपाठ करतो आणि म्हणत सुटतो भराभर. त्याला वाटतें कीं, सर्व गुण काय ते आपल्यांत भरले आहेत, आणि आपल्याला जे कोणी बघतात, ते सर्व आपल्यावर प्रेम करतात असेंच त्याला वाटतें. याच त्याच्या अवगुणावर माझ्या कार्याची भिस्त आहे.

वंचक॰:—पण तूं करणार तरी काय ?

मालती:—त्याच्या हातीं सांपडेल अशा बेतानें मी एक प्रणयपत्रिका लिहून टाकीन. त्यांत त्याचा सुंदर चेहरा, भव्य कपाळ, बघण्याची ऐट, चालण्याची ढब, पायाचा आकार, दाढीचा रंग वगैरेंची खूप स्तुति करीन. आठवण नसलेल्या एखाद्या पत्राचें अक्षर माझें कीं बाईसाहेबांचें हें ओळखण्याला देखील पंचाईत पडेल, इतकें हुबेहुब मला त्यांच्या अक्षरासारखें अक्षर काढतां येतें.

वंचक॰:—उत्तम ! आतां मला तुझ्या युक्तीची अंधुक कल्पना आली.

सदा॰:—माझ्याही पण डोक्यांत प्रकाश पडला.

वंचक०:—तुझ्या पत्रावरून त्याचा समज होईल कीं आनंदीचें त्याच्यावर प्रेम आहे, आणि हें तिचेंच पत्र आहे.

मालती:—माझा उद्देशही पण असाच आहे.

सदा०:—तुझ्या या उद्देशानें तो उल्लू मात्र होणार.

मालती:—उल्लू ! अगदीं खास.

सदा०:—ही तरी एक गम्मतच होईल म्हणायची.

मालती०:—अशी तशी गम्मत नाहीं व्हायची ही. अगदीं गमतींतला राजा समजा. माझी युक्ति सुरेख रीतीनें लागू पडणार. जिथें त्याला माझें पत्र सांपडेल, तिथें जवळच तुम्ही दोघे आणि विनोद तिसरा यांना लपवून बसवीन. तो त्याचा अर्थ कसा करतो तें नीट लक्ष देऊन पहा. आतां आजची रात्र स्वस्थ निजा, आणि याच गोष्टीच्या स्वप्नांचा सुखानुभव घ्या. मी जातें आतां. [जाते.]

वंचक०:—यावें हेडंबाबाई.

सदा०:—ईश्वरसाक्ष बोवा, ही मुलगी फारच सुरेख आहे.

वंचक०:—ही फारच तीक्ष्ण बुद्धीची आहे; नुसती लवंगी मिरची आहे समजा. तिला शिक्षणही चांगलें मिळालें आहे. मला तर देवाप्रमाणें पूज्य समजते. पण जाऊं द्या. त्याचें काय ?

सदा०:—मी देखील एके काळीं असाच पूज्य समजला जात होतों.

वंचक०:—चला आतां निजायला जाऊं. पण सरदारसाहेब, आणखी पैसा मागविला पाहिजे.

सदा०:—इतकेंही करून तुमच्या आनंदीची प्राप्ति जर न झाली तर माझ्या पैशाचें चांगलेंच सार्थक झालें म्हणायचें.

वंचक०:—पैसा तर मागवा. जर ती तुम्हांला प्राप्त न झाली तर मग मला चोर म्हणा.

सदा०:—अलबत्, म्हणणारच. मग तुम्हांला त्याचें कांहीं वाटलें तरी हरकत नाहीं.

वंचक०:—हं, चला सरदारसाहेब. थोडेंसें सुरासेवन करूं. आतां निजायला उशीर झाला आहे, तेव्हां हें झालेंच पाहिजे. हं, चला सरदार-साहेब. [जातात.]

प्रवेश चवथा.

स्थळ—राजवाडा.

प्रेमानंद, (पुरुषवेषांत) विजया, केशव व इतर कांहीं प्रवेश करतात.

प्रेमा०:—या मित्रांनो ! तुमचें स्वागत असो. मला थोडेंसें गाणें ऐकूं द्या. कुसुमसेन ! आतां तुझें तें काल रात्रीं म्हटलेलें जुनेंगाणें ऐकूं दे. या पदलालित्य, शब्दसौष्ठवयुक्त, उच्चसुरांत आणि ताना घेऊन म्हटलेल्या या नूतन गाण्यांनीं माझ्या प्रेमविकल मनाला जी शांति नाहीं, ती तुझ्या त्या गाण्यानें मिळते. हं, एखादें कडवें तरी म्हण.

केशव:—पण महाराज, काल ज्यानें तें म्हटलें तो आतां येथें नाहीं आहे.

प्रेमा०:—कोणीं गायलें तें ?

केशव:—खुषमस्कऱ्या विनोदानें, धनीसाहेब. याच मस्कऱ्यावर

आनंदीबाईच्या वडिलांची फार प्रीति होती. तो इथेंच कोठें तरी जवळपास असेल.

प्रेमा०:—जा, त्याला शोधून आणा. तोंपर्यंत तुम्ही कांहीं तरी वाद्य वाजवा. (केशव जातो. वाद्य वाजवितात.) कुसुमसेन, तूं कधीं कोणावर प्रेम करशील, व तुला प्रेमामुळें होणाऱ्या वेदना सहन करण्याचा प्रसंग येईल, त्या वेळेस माझी आठवण कर. प्रेमी मनुष्य आपल्या प्रेममूर्तीच्या ध्यानकर्मीं काय तो एकाग्र असतो. बाकीच्या त्याच्या सर्वक्रिया चंचल आणि लहरी असतात. कां हें गाणें तुला कसें काय आवडतें ?

विजया:—हें गाणें तर प्रेममय हृदयाचा प्रतिध्वनिच्च आहे.

प्रेमा०:—तूं फारच्च सुरेख बोलतोस बोवा. मला तर खात्रीपूर्वक वाटतें कीं, तुझें कोणावर तरी प्रेम बसलें असावें. तुझें मन प्रेमबद्ध असावें. कां हें खरें आहे ना ?

विजया:—आपल्याला राग येणार नाहीं तर सांगतों कीं हें आपलें म्हणणें थोडेंसें खरें आहे.

प्रेमा०:—तुझ्या प्रेमास पात्र झालेली स्त्री तरी कशी आहे.

विजया०:—आपल्यासारख्या स्वरूपाची एक आहे.

प्रेमा०:—तर मग ती तुझ्या प्रेमास योग्य नाहीं. बरें पण तिचें वय तरी किती आहे ?

विजया:—आपल्याच वयाची आहे.

प्रेमा०:—तर मग ती तुला फारच मोठी आहे. स्त्रियांनीं नेहमीं आपल्यापेक्षां मोठ्या मनुष्याशीं लग्न करावें, म्हणजे तिच्या वयमानाप्रमाणें तिचा नवराही मोठा होत जातो, व तिच्यावरील त्याचें प्रेमही सदोदित

सारखेंच राहतें. कारण कुसुमसेन, तूं असें पहा कीं, आपणां पुरुषांचें प्रेम चंचल, आतुर आणि लवकर विलयास जाणारें असें असतें. स्त्रियांच्या प्रेमाची गोष्ट मात्र अशी नसते.

विजया:—महाराजांचे म्हणणें मला अगदीं पटतें.

प्रेमा०:—तर मग तुझी प्रिया तुझ्यापेक्षां लहान असूं दे, नाहीं तर तुझें तिच्यावरील प्रेम फार वेळ टिकणार नाहीं. स्त्रिया या गुलाबाप्रमाणें आहेत. त्यांची सौंदर्य कलिका एकदां पूर्ण विकास पावून तिनें आपलें वैभव एकदां जगास दाखविलें कीं लगेच ती कोमेजावयास लागते.

विजया:—त्या अशा आहेत खऱ्या, आणि त्यांची सौंदर्यकलिका पूर्ण विकास होतांच कोमेजावयास लागावी याबद्दल मला फार वाईट वाटतें.

[केशव विनोदासह प्रवेश करतो.]

प्रेमा०:—यावें राव. काल रात्रीं आपण म्हटलेलें गाणें जुनें आणि साधें होतें. वृद्ध बाया कापूस वेटण्याच्या वेळीं आणि सूत कातण्याच्या वेळीं आणि तरुण मुली तें सूत गुंडाळण्याच्या वेळीं हें गाणें म्हणत असतात. प्राचीनकालाप्रमाणेंच हें प्रेमाचें गाणें साधें आहे.

विनोद:—करूं का सुरूं महाराज.

प्रेमा०:—हं, चल. कर सुरूं.

विनोद:—(गातो.)

पद.

त्वरित भेटि दे मजासि कृतांता, जगास या विटलों ॥ कृतांता ॥
आमिष देखुनि बद्ध जसा झष, तेविं भवीं फसलों ॥ कृतांता ॥

सुंदरि माझा प्रीतिविषय परि, तिज नच मी रुचलों ॥ कृतांता ॥
कंठावे दिन केवि लोकिं, जरि अनुरागा मुकलों ॥ कृतांता ॥
याचितों उदरिं मज घ्यावे ॥ कृतांता ॥
मृत्तिके शरीर अर्पावें ॥ कृतांता ॥
तत्त्वांत–तत्व मिळवावें ॥ कृतांता ॥
सागरिं गेले लवण त्या परीं मीही कुठें गेलों ॥ कृतांता ॥
थांग न लागो आप्तकामुकां ब्रह्मपदीं ठसलों ॥ कृतांता ॥

प्रेमा०:—हें घे तुझ्या श्रमांबद्दल बक्षीस.

विनोद:—यांत श्रम कसले ? मला तर गाण्यांत आनंद वाटतो.

प्रेमा०:—बरें तर तुझ्या आनंदाबद्दल बक्षीस.

विनोद:—खरोखर महाराज, आनंदाचें बक्षीस केव्हां तरी मिळायचेंच.

प्रेमा०:—जा तर, तुला आतां सुट्टी आहे.

विनोद:—उदास देवता शनीची आपल्यावर कृपा असो. आणि आपल्या लोलकाप्रमाणें अस्थिर मनाचे द्योतक अशा घटकोघटकीं रंग बदलणाऱ्या रेशमी कापडाचे आपले कपडे करण्याची शिंपीदादांना बुद्धि होवो. अशा चंचल मनाच्या लोकांनीं जहाजावर काम करावें असें मला वाटतें, म्हणजे सर्वदा बदलणाऱ्या समुद्राच्या चंचल लाटांचें निरीक्षण करण्यांत त्यांच्या वेळेचा सदुपयोग होईल, आणि त्यांचे विचारही सदोदित बदलत राहतील. कोणत्याही विशेष उद्देशाशिवाय हातीं घेतलेल्या समुद्रप्रवासाचें चीज या सदा होणाऱ्या स्थल, विचार व शोभा यांच्या पालटामुळेंच होतें. बरें आहे, घेतों तर आपली रजा. (जातो.)

प्रेमा०:—जारे, तुम्ही सर्वजण जा. (केशव व इतर लोक जातात.) कुसुमसेन, तुला आणखी एक गोष्ट सांगायची आहे. तूं पुन्हां एकदां त्या निर्दय सुंदरीकडे जा, आणि तिला सांग कीं, मला तिच्या क्षुल्लक संपत्तीची मुळींच इच्छा नाहीं, माझें तिच्यावर खरें प्रेम आहे. संपत्तीमुळें तिला प्राप्त झालेल्या वैभवाची मला मुळींच किंमत नाहीं; परंतु ब्रह्मदेवानें सर्व सौंदर्य एकत्र करून तिची जी मूर्ति घडविली आहे तिच्या-वर मी मोहून लोलुप झालों आहें, असें तिला सांग.

विजया:—पण ती आपल्यावर प्रेम करूं शकत नसली तर ?

प्रेमा०:—पण ती मला असें उत्तर देऊं शकणार नाहीं.

विजया:—कां बरें ? ती असेंच उत्तर देणार. समजा, आपलें आनंदीवर प्रेम आहे तसेंच एखाद्या स्त्रीचें आपल्यावर प्रेम जडून ती विव्हल झाली आहे; पण आपण कांहीं तिच्यावर प्रेम करूं शकत नाहीं, आणि आपण असें तिला उत्तर देणार, त्याचप्रमाणें आनंदीनें आपल्याला उत्तर कां देऊं नये ?

प्रेमा०:—माझ्या हृदयांत जसे प्रेमविकार आहेत, तशा प्रकारचें प्रेम कोणाही स्त्रीच्या हृदयांत असणें शक्य नाहीं. माझ्या प्रेमाइतकें प्रेम सांठ-वून ठेवण्यापुरतें कोणाही स्त्रीचें हृदय मोठें नाहीं. त्यांचें हृदय मोठें नसून क्षुद्र असतें. त्यांचें प्रेम म्हणजे शुद्ध हृदयांतून वाहणारा झरा नसून क्षणिक टिकणारें वेड असतें, कारण त्याला भरती आणि ओहोटी लव-करच होते, किंवा निदान त्याचें स्थान तरी बदलतें. माझें हृदय समुद्रा-प्रमाणें मोठें असून, त्याच मानानें त्यांत प्रेमही सांठविलेलें आहे. म्हणून म्हणतों कीं आनंदीवरच्या माझ्या प्रेमाची आणि माझ्यावरच्या दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमाची तुलना करूं नकोस.

विजयाः—पण मला माहित आहे की—

प्रेमा०:—तुला काय माहीत आहे ?

विजयाः—स्त्रियांचें पुरुषांवर किती प्रेम असतें तें. आमच्या प्रमाणेंच त्यांचेंही मन सत्यानें भरलेलें असतें. मी जर स्त्री असतों, तर मीं आपल्यावर जसें प्रेम केलें असतें, तसेंच माझ्या वडिलांना एक मुलगी होती तिचें एका गृहस्थावर प्रेम होतें.

प्रेमा०:—बरें पुढें तिचें काय झालें ?

विजयाः—कांहीं नाहीं महाराज. तिनें आपलें प्रेम कधीं शब्दांनीं व्यक्त केलें नाहीं. तिनें तें मनांत दाबून ठेवलें, आणि एखादी अळी पुष्पकलिकेचा आंतून खाऊन नाश करते, त्याप्रमाणेंच तिच्या गुलाबी गालांचा गोंडसपणा त्यानें नाहींसा झाला. तिच्या मनांत दुःखद विचार येऊन ती झुरणीस लागली, आणि तिचा चेहरा फिक्कट आणि पिवळसर दिसूं लागला. शोकानें तिच्या अंगीं धैर्य आलें, व ती दुःखाकडें एखाद्या धैर्याच्या पुतळीप्रमाणें निश्चल दृष्टीनें पाहूं लागली. हें प्रेम नव्हे तर काय ? आपण पुरुष प्रेमाच्या मोठमोठ्या गोष्टी सांगतो, शपथा वाहतो, आणि खऱ्या प्रेमापेक्षां त्याचा अविर्भावच मोठा दाखवितो, तितकें आपलें प्रेम कसोटीस उतरत नाहीं.

प्रेमा०:—तुझ्या बहिणीचा प्रेमांतच अंत झाला काय ?

विजयाः—माझ्या बापाला मुलगी आणि मुलगा काय तो आतां मीच आहें असें मला वाटतें. तरी पण खरी स्थिति मला माहीत नाहीं. बरें, मी आनंदीबाईकडे जाऊं काय ?

प्रेमा०:—हो. तेंच तर मुख्य काम आहे. तिच्याकडे लवकर जा,

तिला ही आंगठी दे, आणि मी आपलें तिजवरचें प्रेम आतां परत घेऊं शकत नाहीं आणि तिचें नकारार्थी उत्तरही साहूं शकत नाहीं असें तिला सांग. [जातात.]

प्रवेश पांचवा.

स्थळ—आनंदीचा बगीचा.

वंचकराज, सदानंद आणि फजीत्या प्रवेश करतात.

वंचक०:—फजीत्या, ये, असा ये.

फजीत्या:—हा पहा आलों. या गमतीचा मीं जर इतकासा देखील भाग घालविला, तर मीं मोठें पाप केलें असें समजेन.

वंचक०:—लोकांची मनसोक्त निंदा करणाऱ्या ह्या लुच्चाची चांगली फजीती झालेली पाहून तुला आनंद होणार नाहीं का ?

फजीत्या:—मी तर आनंदानें उड्या मारीन. यानेंच इथें परवां आस्वल माकडांचा खेळ करविण्याबद्दल बाईसाहेबांना कांहीं सांगून मला त्यांच्या मर्जीतून उतरविलेन.

वंचक०:—त्याला चिडविण्याकरितां आपण पुन्हां एकदां आस्वल-माकडांचा तमाशा करूं, आणि मग त्याची खूप फजीती करूं. कां सदा-नंद सरदार ! तुम्हांला पसंत आहे कीं नाहीं ही युक्ति ?

सदा०:—असें जर आपण करणार नाहीं तर मग आपली काय किंमत ?

वंचक०:—ही पहा युक्तिबाज बहुमूर्ति इकडेच येत आहे. (मालती येते.) कसें काय हिरकणी !

मालती:—हं चला, तुम्हीं तिघेजण त्या झाडाआड लपून बसा. मदनसेन इकडेच येत आहे. एक-अर्धा तास झाला असेल, तो पलीकडल्या पटांगणांत आपल्याच सावलीशीं चालण्याफिरण्याची तालीम करीत होता. या माझ्या पत्रानें त्याच्या मनांत विचारांचें काहूर माजून तो वेडा होईल अशी माझी खात्री आहे. तुम्हांला जर मौज पाहण्याची आवड असेल तर त्याची सर्व क्रिया लक्ष लावून पहा. हं चला. लपून बसा कसे. (पत्र टाकून) तूं इथें पडून रहा. हा पहा इकडून एक मासा येतो आहे. त्याला आपल्या जाळ्यांत पकड. [जाते.]

[मदनसेन येतो.]

मदन०:—हें सर्व दैवाधीन आहे. दैव अनुकूल असेल तर सर्व कांहीं होईल. तिचें मजवर प्रेम आहे असें मालती एक वेळ मजजवळ म्हणत होती. प्रेम करायला माझ्या स्वरूपाचाच एखादा मनुष्य योग्य आहे इतकें एक वेळ ती स्वत:देखील मजजवळ म्हणत होती. शिवाय आपल्या इतर नोकरांत तीं मलाच आदरानें वागविते. या सर्व गोष्टींवरून मी काय समजावें बरें ?

वंचक०:—हा पहा, एक अहंमन्य पाजी मनुष्य.

फजीत्याः—थांबा. विचार करतां करतां तो पहा तुर्की कबुतरासारखें करूं लागला. आपलीं पिसें पसरून कसा नाचतो आहे पहा.

सदा०:—मला त्याला खूप बेदम मारावेंसें वाटतें आहे.

वंचक०:—गप्प.

मदन०:—मी लवकरच मदनसेन सरदार होणार.

वंचक०:—अरे बदमाष !

सदा०:—मारा, ठार करा चोराला.

वंचक०:—अरे पण गप्प.

मदन०:—असें एक उदाहरणही घडलें होतें. लटपटपूरच्या कुंवर-बाईनें नाहीं का आपल्या जमादाराशीं लग्न लावलें ?

सदा०:—मूर्ख कुठला !

फजीत्या:—अहो गप्प. तो पहा आतां विचारांत कसा गढला आहे. कल्पनातरंगावर कसा हेलकावे खातो आहे.

मदन०:—तिच्याशीं माझें लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांनीं मी जरतारी पोशाख करून धन्यासारखा असून—

वंचक०:—दगड मारा बेरडाला.

मदन०:—आपल्या नोकरांना बोलावीन. आनंदीला शयनगृहांतच सोडून येईन, आणि—

वंचक०:—याच्यावर वज्रपात कां होत नाहीं ?

फजीत्या:—अहो गप्प.

मदन०:—मग मी आपल्या अधिकाराची ऐट आणीन, आणि आपल्या सर्व नोकर मंडळीवर दृष्टी फिरवून त्यांना मी आपली योग्यता जाणतों असें दाखवीन, आणि त्यांनाही आपली पायरी ओळखून वागण्यास सांगेन. नंतर आमचे श्वशुर वंचकराज यांना बोलावून आणण्याचा हुकूम करीन.

वंचक०:—याच्यावर वीज कडाडून पडेल तर बरें होईल.

फजीत्या:—अहो पण आतां गप्प रहा.

मदन०:—मग माझ्या चाकरांतून कांहीं जण अदबीनें उठून त्यांना शोधायला जातील. मग मी रागानें कपाळाला आठ्या घालीन, किंवा आपल्या मिशांना पीळ देत बसेन, नाहींतर आपल्या आंगठीशीं खेळत बसेन. इतक्यांत वंचकराज येऊन मला आदरानें मुजरा करतील.

वंचक०:—हा लुच्चा जिवंत तरी राहण्यास योग्य आहे का ?

फजीत्या:—मरण आलें तरी पत्करलें, पण जरा गप्पच बसा.

मदन०:—त्यांच्या हाताशीं मिळविण्याकरतां मी आपला हात असा त्यांच्यापुढें करीन, आणि माझ्या मोठेपणाला शोभेल इतकेंच हंसेन.

वंचक०:—आणि हा वंचक मग तुझ्या थोबाडींत नाहीं देणार ?

मदन०:—नंतर मी त्यांना म्हणेन कीं वंचकराज ! दैवयोगानें तुमच्या पुतणीशीं माझें लग्न झालें आहे, व त्यामुळें माझें एवढें तुम्हांला ऐकलेंच पाहिजे—

वंचक०:—काय ? काय ?

मदन०:—कीं तुम्ही आपलें दारू पिणें सोडून द्या.

वंचक०:—चल जा मूर्खा !

फजीत्या०:—हं, थांबा; नाहीं तर मग आपला सगळा डाव फसेल.

मदन०:—शिवाय तुम्ही आपला अमूल्य वेळ एका मूर्ख सरदाराच्या संगतींत व्यर्थ घालवितां—

सदा०:—खरोखर हें मलाच उद्देशून आहे.

मदन०—तोच तो सदानंद सरदार होय.

सदा०:—कां हें मलाच उद्देशून होतें कीं नाहीं ? पुष्कळ लोक मला मूर्ख म्हणतात.

मदन०:—हें येथें काय पडलें आहे बरें ? (पत्र उचलून घेतो.)

फजीत्या०:—आतां हें वेडें पाखरूं जाळ्यांत सांपडणार.

वंचक०:—अरे थांबा. देवाच्या दयेनें त्याला तें मोठ्यानें वाचण्याची बुद्धि होवो म्हणजे झालें.


मदन०:—खरोखर हें बाईसाहेबांचेंच अक्षर. हा 'अ' 'क' 'स' हें सर्व तिच्याच हातचें अक्षर. ती 'प्र' देखील असाच काढते. अगदीं निःसंशय हें तिच्याच हातचें अक्षर.

सदा०:—'अ', 'क', 'स' अगदीं तिच्याच हातचें अक्षर अं ?

मदन०:—(वाचतो) " माझ्या अज्ञात प्रियकराचें अभीष्ट चिंतून हें पत्र सादर करतें. ' अगदीं तिचीच वाक्यरचना. आतां ही याच्या-वरची मुद्रा फोडावी. अरे पण ही द्रौपदीचें चित्र असलेली मुद्रा बाईसाहेबांचीच. इचाच त्या नेहमीं उपयोग करतात. हें पत्र कोणाला बरें उद्देशून असावें ? "

फजीत्याः—या पत्राचा याच्यावर पूर्ण पगडा बसला अं !

मदन०:—(वाचतो) " माझें जडलेलें प्रेम देवाला ठाऊक आहे. पण तें कोणावर बरें जडलें आहे ? त्यांचें नांव घेण्याला माझे ओठ हालत नाहींत. तें कोणालाही कळूं नये हें बरें. " ' कोणालाही कळूं नये. '



बरें पुढें काय आहे ? ‘ कोणाला ही कळूं नये; ’ मदनसेना, कदाचित् हें तुझ्याबद्दलच असेल.

वंचक०:—फांशीं चढवा हरामखोराला.

मदन०:—(वाचतो) “ ज्याच्यावर मी प्रेम करतें, त्याला मी आज्ञा करूं शकेन; परंतु मौन रामबाणाप्रमाणें माझें हृदय विदारण करीत आहे. म—न—स—ह्यानेंच माझें मन हिरावून घेतलें आहे.

फजीत्याः—हें एक मजेदारच कोडें आहे.

वंचक०:—फारच हुशार पोरगी बरें.

मदन०:—“ ‘ म ’ ‘ न ’ ‘ स ’ ह्यानेंच माझें मन हिरावून घेतलें आहे. ” ठीक. पण मला आधीं पाहूं द्या, लक्षपूर्वक पाहूं द्या.

फजीत्याः—तिनें काय हें विषाचें ताट याच्यापुढें ठेवलें आहेन् !

वंचक०:—आणि हा वेडा तरी पहा त्याच्यावर कसा झडप घालतो आहे !

मदन०:—“ ज्याच्यावर मी प्रेम करतें, त्याला मी आज्ञा करूं शकेन. ” अगदीं योग्य. ती माझी मालकीण आहे, व मी तिचा चाकर आहें, अर्थात् ती मला आज्ञा करूं शकेल, हें अगदीं एखाद्या गांवढळाला देखील कळेल. यांत कांहीं गूढ नाहीं. बरें शेवटीं काय लिहिलें आहे ? या अक्षरांचा काय बरें अर्थ असावा ? यांचा माझ्या नांवाशीं तर संबंध नाहीं ? काय बरें—म—न—स—

वंचक०:—हं, कर, कर त्याचा अर्थ. वासानें शिकार शोधणाऱ्या कुत्र्याप्रमाणें हा त्याच्या अर्थाचा शोध करतो आहे.

फजीत्याः—कोल्ह्याच्या मस्त वासासारखा जरी याचा अर्थ स्पष्ट असला तरी याला कांहीं त्याचा सुगावा नाहीं.

मदन०:—म,—मदनसेन; असेंच, कारण म पासूनच माझ्या नांवाची सुरुवात होते.

फजीत्याः—कां ? हा त्याचा अर्थ लावील असें मीं नाहीं म्हटलें ? वासानें शिकार शोधणारा कुत्राच आहे समजा हा.

मदन०:—म,—पण पुढच्या अक्षरांशीं याची जुळणी कशी करावी ? संगती कांहीं जुळत नाहीं. ' म ' पुढें ' द ' आला पाहिजे, पण इथें तर ' न ' येतो.

फजीत्याः—आणि ' न ' कारांतच याचा शेवट होणार.

वंचक०:—अरे पण मी याला असा चोप देतों कीं, ' न '' न ' च करीत बसेल. ' नको ' देखील म्हणतां येणार नाहीं.

मदन०:—नंतर ' स ' येतो.

फजीत्याः—तुला जर डोळे असते तर तुझ्यापुढें वैभवाचें ताट वाढलेलें नसून दुःखाचें ताट मात्र वाढून येत असल्याचें तुला दिसलें असतें.

मदन०:—' म ', ' न ', ' स ', पत्राच्या सुरवातीशीं याची जोड नीट जमत नाहीं. पण हीं सर्व अक्षरें माझ्या नांवांत असल्यामुळें, जरा ओढाताण केली तर यांचें माझ्या नांवाशीं साम्य दिसून येईल. बरें, हें पुढें आणखी काय ? (वाचतो) ' हें जर तुमच्या हातीं लागेल, तर याचा विचार करा. मी जरी द्रव्यानें व मानानें तुमच्यापेक्षां मोठी आहें, तरी माझ्या मोठेपणाची भीति बाळगूं नका. कांहीं जन्मतांच मोठे

असतात, कांहीं प्रयत्नानें मोठेपणा मिळवितात, आणि कांहींवर अनायासानें मोठेपणा लादला जातो. तुमचें दैव या वेळीं अनुकूल आहे, तर धैर्यानें त्याचा फायदा करून घ्या. आपला आजपर्यंतचा लीनपणा टाकून द्या, आणि तुम्हांला प्राप्त होणाऱ्या पदाला साजेल अशी वागणूक करा. माझ्या काकाशीं तेढेपणानें वागा, नोकराचाकरांशीं कडकपणा ठेवा, नेहमीं मुत्सद्दीगिरीचीं भाषणें बोला, विक्षिप्तपणा अंगीं असूंद्या. जिचें मन तुमच्या-करतां तुटतें आहे तिचें हें तुम्हांला सांगणें आहे. तुमच्या पिवळ्या मोजां-बद्दल आवड कोणीं दाखविली आणि त्यांवर पट्टे बांधलेले बघण्याची इच्छा कोणीं दर्शविली याची आठवण ठेवा. जर तुमची इच्छा असेल, तर तुम्हांला मोठेपणाला चढविलें आहे असें समजा. नाहीं तर वैभवास स्पर्श करण्यास अयोग्य असे माझे कारभारी म्हणजे नोकरच रहा. इतकें पुरे. तुमच्याकडून चाकरी करून घेण्याऐवजीं तुमची चाकरी करण्यास उत्सुक, वैभवांत रुळणारी परंतु—दुःखी. '' हें तर अगदीं स्पष्टच आहे. सपाट मैदानांत सूर्य-प्रकाशानेंदेखील यापेक्षां स्पष्ट काय दिसणार आहे ? मी आतां ताठ्यानें वागेन, मोठमोठे ग्रंथ वाचीन, वंचकराजाचीं कृत्यें हाणून पाडीन, आणि गरीब लोकांची ओळख विसरून जाईन. यांत सांगितल्या-प्रमाणें अगदीं हुबेहुब बनेन. यांत कांहीं मी कल्पनेवर भिस्त ठेऊन मूर्ख बनत नाहीं आहें. कारण कसेंही पाहिलें तरी बाईसाहेब माझ्यावर प्रेम करतात असेंच दिसतें. नुकतीच त्यांनीं माझ्या पिवळ्या मोज्यांची स्तुति केली होती. त्यांवरच्या पट्ट्यांबद्दल पसंती दाखविली होती. आणि या पत्रांत तर त्यांनीं मजवरचें आपलें प्रेम स्पष्टच सांगितलें आहे, आणि त्यांना आवडणाऱ्या या गोष्टी करण्याबद्दल त्या मला सांगत आहेत. मला सुखी केल्याबद्दल दैवाचा मी फार अभारी आहें. आजपासून मी पिवळे मोजे घालीत जाईन, त्यावरून पट्टे बांधत जाईन, आणि तिरसटपणानें

चागत जाईन. ईश्वरा ! तुझी लीला अगाध आहे. अरे पण हा एक ताजा कलम आहे. (वाचतो.)

' मी कोण आहें हें तुम्हांला सहजच ओळखतां येईल. जर मजबद्दल तुमच्या मनांत प्रेम असेल तर तें तुम्ही हसून व्यक्त करा. तुमचें हंसणें तुम्हांला फारच शोभतें. म्हणून हे प्रियकरा ! माझ्यासमोर तुम्ही सदा हंसत जा अशी तुम्हांला माझी नम्र विनंती आहे ' फार उत्तम. मी आतां हंसत जाईन. तुला मी जें जें करावें असें वाटत असेल तें तें मी करीत जाईन. [जातो.]

फजीत्या:—महाराजांकडून हजार रुपयांचें वर्षासन मिळालें तरी तें या गमतीच्या पासंगाला देखील पुरणार नाहीं. ही गम्मत देऊन आपण तें वर्षासन कांहीं पत्करणार नाहीं.

वंचक०:—या युक्तीबद्दल आपण तर बोवा या पोरीशीं लग्नदेखील लावूं.

सदा०:—आपण देखील असेंच करूं.

वंचक०:—हुंड्याबद्दल अशीच आणखी एखादी मजा कर असें आपण तिला सांगूं.

सदा०:—आणि मी देखील तेंच सांगेन.

वंचक०:—ही पहा माझी युक्तिबाज शिकार करणारी आली.

[मालती येते.]

वंचक०:—कां ! माझ्या डोक्यावर नाचायची इच्छा आहे ?

सदा०:—कां माझ्या डोक्यावर नाचशील ?

वंचक०:—का मी आपली स्वतंत्रता पैजेंत हरून तुझा बंदा गुलाम होऊं !

सदा०:—का मी देखील तसेंच करूं ?

वंचक०:—तूं त्याला अशा कांहीं स्वप्नसुखांत दंग केला आहेस कीं जर तो त्यांतून जागा झाला तर शुद्ध वेडा होईल.

मालती:—नाहीं पण खरें सांगा कीं माझ्या युक्तीचा त्याच्यावर कांहीं परिणाम झाला का ?

वंचक०:—परिणाम ? वैद्याच्या हेमगर्भमात्रेचाच समज.

मालती:—आतां माझ्या गमतीला लवकरच फळें येतील. तो बाई-साहेबांकडे पहिल्यानें येईल तेव्हां लक्ष देऊन पहा. तो त्यांच्याकडे पिवळे मोजे घालून येईल, आणि त्याच रंगाची बाईसाहेबांना चीड आहे. त्यांना मोज्यावर पट्टे बांधणें मुळींच आवडत नाहीं, पण तो पट्टे बांधूनच येईल. त्या सध्यां दु:खी असल्यामुळें त्यांच्या स्वभावास अनुचित् अशा तऱ्हेनें तो त्यांच्या समोर हंसेल, आणि यामुळें तो बाईसाहेबांच्या मर्जींतून मात्र उतरेल. तुम्हांला हें पहायचें असेल तर माझ्याबरोबर चला.

वंचक०:—तुझ्याबरोबर मी वाटेल तिथें—पाहिजे तर नरकांत—देखील येईन.

सदा०:—मी देखील येईन.

[सर्व जातात.]

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—आनंदीचा बाग.

विजया आणि ढोलगें घेतलेला विनोद प्रवेश करतो.

विजया:—अहो राव ! रामराम. तुम्ही काय या ढोलग्यावरच राहतां ?

विनोद:—नाहीं महाराज, मी देवळाजवळ राहतों.

विजया:—तर मग तुम्ही पुजारी आहांत.

विनोद:—असें कांहीं नाहीं म्हणा. मी देवळाजवळ राहतों म्हणजे आपल्या घरीं राहतों, आणि माझें घर देवळाजवळ आहे.

विजया:—अशाच तऱ्हेनें राजाच्याजवळ एखादा भिकारी रहात असला तर त्या भिकाऱ्याजवळ राजा राहतो किंवा देवळाजवळ जर तुमचें ढोलगें पडलें असलें तर तें देऊळ तुमच्या ढोलग्याजवळ राहतें असें तुम्ही म्हणाल.

विनोद:—अगदीं खरें बोललांत. पहा, आजकाल लोक किती हुशार झाले आहेत तरी ! एखाद्या वाक्याच्या अर्थाची उलटापालट करून वाईट बाजू उघड करून दाखविण्यांत कसे अगदीं पटाईत. वाक्याचा वाटेल तसा अर्थ करणें म्हणजे त्यांचा एक खेळच.

विजया:—जे शब्दांचा वाटेल तसा छळ करतात ते त्यांचें सत्व हरण करतात हें अगदीं खरें.

विनोद:—म्हणून मला वाटतें माझ्या बहिणीला नांवच नसतें तर बरें होतें.

विजया:—कां बरें ?

विनोद:—कारण असें पहा, तिचें नांव म्हणजे एक शब्दच आहे कीं नाहीं: आणि त्या शब्दांचा कोणीं छल करून माझ्या बहिणीचें सत्व हरण करावयाचा. परंतु नियमबंधनांनीं बांधलेले शब्दच फार बदमाष असले पाहिजेत.

विजया:—याचें कांहीं कारण ?

विनोद:—याला कारण दाखविणें मोठें कठीण काम आहे. कारण शब्दांशिवाय तें दाखवितां येणें शक्य नाहीं, आणि शब्द तर फार खोटे झाले आहेत.

विजया:—मला वाटतें तुम्ही एक आनंदी प्राणी आहां. तुम्हांला काळजी म्हणून कशाची नाहीं.

विनोद:—असेंच केवळ नाहीं कांहीं. मलाही कशाची तरी काळजी आहेच. पण तुमच्या प्रातीची कांहीं मला काळजी नाहीं; आणि याचा अर्थ जर कशाची काळजी नसणें असा असेल तर मग तुम्हांला अदृश्यच झालें पाहिजे.

विजया:—तुम्ही आनंदीबाईचे खुषमस्करे आहां ना ?

विनोद:—नाहीं बोवा. खुषमस्करे म्हणजे वेडे लोक. लग्न होईपर्यंत वेडे बाळगण्याइतक्या कांहीं आनंदीबाई वेड्या नाहींत. असें कसें म्हणाल

तर सांगतों की नवरे आणि हे असले वेडे यांच्यांत फार साम्य असतें. फरक एवढाच की, नवरे हे मोठे वेडे असतात. तर मी कांहीं त्यांचा आश्रित वेडा नाहीं. मी एक आपला शब्दांवर कोट्या करणारा विनोदी गृहस्थ आहें.

विजया:—मी नुकतेंच तुम्हांला प्रेमानंदमहाराजांकडे पाहिलें.

विनोद:—सूर्य जसा मेघमंडळ आक्रमण करतो, व सर्वत्र प्रकाशतो, त्याचप्रमाणें आमची विनोदी स्वारी आनंदीबाईकडे असते, तशीच महाराजांकडेही असते. मला वाटतें पण तुमची ज्ञानमूर्ति ही मीं तिथेंच पाहिली.

विजया:—तुम्ही आतां माझी चेष्टा करूं लागला तेव्हां तुमच्याशीं बोलणें बंद करावें. हं, घ्या हें तुम्हांला बक्षीस.

विनोद:—ब्रह्मदेव जेव्हां आतां कंस उत्पन्न करील तेव्हां तो तुम्हांला दाढीमिशी देवो हीच त्याच्याजवळ प्रार्थना आहे.

विजया:—मी देखील त्यांच्याचकरतां उत्कंठित आहें. (एकीकडे) त्या माझ्या गालावर येण्याकरतां मात्र नाहीं हो. (उघड) तुमच्या बाईसाहेब घरांत आहेत काय ?

विनोद:—(नाणें दाखवून) याला जोड मिळाली तर याची वाढ नाहीं का होणार ?

विजया:—हो, न व्हायला काय झालें ? व्याजीं लावा म्हणजे झालें.

विनोद:—बरें तर या कृष्णाला रुक्मिणी मिळवून द्यायला मी आतां भटजीचें काम करतों.

विजया:—समजलें मी तुमचें म्हणणें. मागण्याची ही युक्ति उत्तम काढलीत बोवा.

विनोद:—हंः, ही कांहीं मोठीशी गोष्ट नाहीं. बाईसाहेब घरांतच आहेत. तुम्ही कोठून आलांत हें मी त्यांना सांगतों. तुम्ही कोण आहां आणि कशाकरतां आला आहांत हें मात्र मला सांगतां येणार नाहीं.

[जातो]

विजया:—मस्कऱ्याचें काम करायला तरी बुद्धि लागते, आणि त्या कामाला हा कसा अगदीं योग्य मनुष्य आहे. मस्कऱ्याला आपण मस्करी करतों त्यांचा स्वभाव, त्यांची योग्यता, काळ वगैरे त्याच्यापुढें असणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे लक्ष पुरवावें लागतें. शहाण्या मनुष्याच्या कामासारखेंच याचें कामही श्रमाचें आहे. आपल्या मूर्खपणाचा जर त्यानें शहाणपणानें उपयोग केला तर त्याची वाहवा होते, पण शहाण्यानें जर मूर्खपणा केला तर त्याची मात्र फजीती होते.

[वंचक आणि सदानंद येतात.]

वंचक०:—रामराम राव.

विजया:—रामराम.

सदा०:—स्वागतम्.

विजया:—तव तु मंगलमस्तु.

सदा०:—तथास्तु.

वंचक०:—तुम्हांला आंत जायचें आहे काय ? आनंदीकडे जर तुम्हांला जायचें असेल तर तिलाही तुम्हांला भेटण्याची फार इच्छा आहे.

विजया:—मी पण त्यांच्याकडेच जाण्याकरतां आलों आहें.

वंचक०:—हं तर मग आपल्या पायांची परीक्षा पहा.

विजयाः—पायांची काय परीक्षा पहायची आहे ?

वंचक०:—अहो ! म्हणजे चाला, आंत जा.

विजयाः—बरें तर, जातों. हें पहा पण मला आंत जाण्याचें कामच उरलें नाहीं बाईसाहेबच इकडे येत आहेत. (आनंदी व मालती येतात.) अहो सद्‌गुणसंपन्न सुंदरनयनाबाई ! स्वर्गांतून देव आपल्यावर पुष्पवृष्टि करोत.

सदा०:—हा तरुण एक अद्वितीय मनुष्य आहे बोवा. ' देव पुष्पवृष्टि करोत. ' ठीक.

विजयाः—मी बोलणार आहें तें आपल्या लक्षपूर्ण व ग्रहणसमर्थ कानावरच जावें असें आहे.

सदा०:—' पुष्पवृष्टि, ' ' लक्षपूर्ण ' आणि ' ग्रहणसमर्थ ' ! मी हे शब्द पाठ करून अगदीं आपलेसे करतों, म्हणजे प्रसंगीं उपयोगीं पडतील.

आनंदीः—बागेचा दरवाजा लावून घ्या. यांचें बोलणें ऐकून घ्यायला मला एकटीलाच राहूं द्या. (वंचक, सदानंद आणि मालती जातात.) हं, बोला आतां काय बोलायचें आहे तें. आपलें नांव काय ?

विजयाः—आपल्या सेवकाचें नांव कुसुमसेन आहे बाईसाहेब.

आनंदीः—तुम्ही माझे सेवक ? या जगांत खोटी नम्रता हीच जर मान देण्याची खूण असेल, तर धिक्कार असो या जगाला. तुम्ही तर प्रेमानंदमहाराजांचे सेवक आहां.

विजयाः—आणि ते तुमचे सेवक आहेत. अर्थात् त्यांचा सेवक

तो आपलाही सेवक असलाच पाहिजे. आपल्या सेवकाचा सेवक आपलाही सेवक असलाच पाहिजे बाईसाहेब.

आनंदीः—त्यांच्याबद्दल मी विचारच करीत नाहीं, आणि त्यांचें मन माझ्याबद्दलच्या विचारांनीं भरलेलें असण्यापेक्षां रिकामें असलें तर फार बरें असें मला वाटतें.

विजयाः—त्यांच्याकडे आपलें मन वेधावें यासाठींच मी आलें आहें.

आनंदीः—अहो त्यांच्याबद्दल मजजवळ बोलूं नका म्हणून मीं आपल्याला पूर्वींच विनंति केली आहे. यापेक्षां जर दुसऱ्या एखाद्याबद्दल तुम्ही शिष्टाई करीत असाल तर स्वर्गांतल्या गंधर्वगानापेक्षां देखील मी तें जास्त प्रेमानें ऐकेन.

विजयाः—अहो बाईसाहेब—

आनंदीः—अहो पण माझें म्हणणें तर ऐकून घ्या. मागच्या खेपेला आपण इथें येऊन मला जादूनें भारून टाकल्यानंतर मीं आपल्या पाठो-पाठ आपल्याकडे माझी आंगठी पाठविली. अशा लुच्चेगिरीनें आपलें प्रेम मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत मीं आपल्या स्वतःला, आपल्या नोकराला आणि आपल्यालाही वाईट रीतीनें वागविलें आहे. अशा लज्जास्पद तऱ्हेनें ती आपल्यावर लादण्यानें मी आपल्या अवकृपेस पात्र झालें असलें पाहिजे. ती आंगठी आपली नव्हती हें तर आपण जाणलेंच असेल, मग आपलें मजबद्दल काय बरें मत झालें असेल? आपण माझ्या अब्रूवर प्रसंग आणलात. आपल्या स्वैरविचारांनीं आपण माझ्या अब्रूची विटंबना केली नाहींत काय? आपल्यासारख्या बुद्धिवानाला मीं आपलें मन योग्य तितकें स्पष्ट करून दाखविलें आहे. माझें मन अस्थिमांसानें आच्छादित नसून ते पार-दर्शक प्रेमचिन्हांनीं आवृत आहे. तर मग आतां आपण बोला.

विजयाः—मला आपली कींव येते.

आनंदीः—ही एक प्रेमाची पायरीच आहे.

विजयाः—छे ! मुळींच नाहीं. आपण आपल्या शत्रूची देखील कित्येक वेळां कींव करतों हाच याचा स्पष्ट पुरावा आहे.

आनंदीः—असें असेल तर दुःख करण्याचें सोडून आनंदी होण्याला हीच योग्य वेळ आहे. या जगांत दरिद्री देखील गर्विष्ठ होतात आं ? जर कोणत्या तरी प्राण्याचें आपल्याला भक्ष्य व्हायचे असेल तर लांडग्याचें भक्ष होण्यापेक्षां सिंहाचें होणें किती तरी उत्तम ! (घड्याळाचे ठोके पडतात.) हे पहा, हें घड्याळ देखील मला वेळेच्या अपव्ययाबद्दल दोष देत आहे. भिऊं नका, मी कांहीं आपल्या प्रेमाची अपेक्षा करीत नाहीं. आपली बुद्धि आणि यौवन पक्क दशेस येईल तेव्हां आपल्या पत्नीला मात्र एका सुंदर पुरुषाची जोड मिळालीशी वाटेल. बरें असो; हा पहा आपला रस्ता.

विजयाः—हाच माझा रस्ता आं ? आपल्याला मानसिक शांति मिळो, व आपल्यावर देवाची कृपा असो. माझ्याबरोबर कांहीं निरोप पाठवीत नाहीं ना ?

आनंदीः—थांबा; मजबद्दल आपल्याला काय वाटतें तें मला सांगा.

विजयाः—आपण आहांत तशा नाहीं असें आपल्याला वाटतें.

आनंदीः—मी आपल्याबद्दल जर असें समजतें, तर आपल्याबद्दलही माझें तसेंच मत आहे; म्हणजे आपण दिसतां तसे नाहीं.

विजयाः—आपलें मत बरोबर आहे; मी दिसतों तसा नाहीं.

आनंदीः—माझ्या इच्छेप्रमाणें आपण असावेत अशी माझी इच्छा आहे.

विजया:—माझ्या सद्यःस्थितीपेक्षां ती स्थिति चांगली आहे काय? सध्यां मी आपल्या तिरस्कारास पात्र झाल्यामुळें यापेक्षां ती स्थिति बरी असेल अशी मला आशा आहे.

आनंदी:—(स्वगत) माझ्याबद्दल यांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला आहे तरी त्यामुळें, आणि रागामुळें यांचें हालणारे ओंठ किती तरी सुंदर दिसतात. प्रेम गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला तरी खुनाऱ्या गुन्ह्यापेक्षां देखील तें लवकर बाहेर दिसतें. गुप्त ठेवलेलें प्रेम हें मध्यान्हीच्या सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट दिसत असतें. (उघड) कुसुमसेन, ऋतूंमधील वसंत, कौमार्य, मान, सत्य आणि जी जी कांहीं उत्तम गोष्ट असेल त्यांची शपथ घेऊन सांगतें कीं, आपल्या गर्विष्ठ नकाराला न जुमानतां माझें आपल्यावरील प्रेम कितीही प्रयत्न केले तरी मला गुप्त ठेवतां येत नाहीं. माझें सर्व शहाणपण येथें व्यर्थ होतें. या माझ्या भाषणावरून आपण माझ्याबद्दल कुतर्क मात्र घेऊं नका. याचना करून मिळविलेलें प्रेम चांगलें खरें, पण अयाचित मिळालेलें प्रेम उत्तम, असें यावरून समजा.

विजया:—सात्विकता आणि माझें यौवन यांची शपथ घेऊन मी सांगतों कीं, माझें मन अजून माझेंच आहे. ते कोणाही स्त्रीला अजून मिळालें नाहीं, किंवा माझ्याशिवाय इतर कोणाही स्त्रीला त्यावर स्वामित्व मिळवितां येणार नाहीं. बरें तर, येतों मी आतां. आपल्या धन्याचे प्रेमविलाप आपल्यास सांगून त्यांच्याकरतां आपल्या प्रेमाची याचना करण्याकरतां मी अपल्याकडे यापुढें येणार नाहीं.

आनंदी:—नाहीं, नाहीं आपण पुन्हां याच. आपल्या धन्याच्या प्रेमानें न विरघळणाऱ्या माझ्या मनाला कदाचित् आपण अजूनही विरघळवूं शकाल. [जातात.]

प्रवेश दुसरा.

स्थल—आनंदीचें घर.

वंचकराज, सदानंद आणि फजीत्या प्रवेश करतात.

सदा०:—छे ! मी आतां येथें मुळींच राहणार नाहीं.

वंचक०:—अहो दुर्वास ऋषीचे अवतार ! असा त्रागा करण्याचें कांहीं कारण तर सांगा.

फजीत्याः—सदानंदमहाराज, आपण याचें कारण सांगितलेंच पाहिजे.

सदा०:—आनंदी माझ्यापेक्षां राजेसाहेबांच्या त्या नोकरावर ज्यास्त प्रेम करते हें मीं पाहिलें आहे. मीं तें मागच्या बागेंत पाहिलें.

वंचक०:—तिनें त्या वेळीं तुम्हांला पाहिलें कां तें मला आधीं सांगा.

सदा०:—मी तुम्हांला आतां जसें स्पष्टपणें पाहतों आहें, असेंच तिनें त्या वेळीं मला पाहिलें.

फजीत्याः—तुमच्यावर त्यांचें प्रेम आहे याचा हा एक सबळ पुरावाच्च आहे.

सदा०:—छत्. तुम्ही तर मला अगदीं गांवढळच ठरवूं पाहतां !

फजीत्याः—अहो महाराज ! न्याय आणि बुद्धि यांनीं मी आपलें म्हणणें खरें आहे असें सिद्ध करून दाखवीन.

वंचक०:—सृष्टीच्या उत्पत्तीपासून न्याय आणि बुद्धि यांच्याकडेच्च निवाडा करण्याचें काम आहे.

फजीत्या:—आपल्याला चेतना आणण्याकरतां, आपल्या निद्रिस्त शौर्याला जागें करण्याकरतां, आपलें मन घट्ट करण्याकरतां, आणि आपल्या हृदयांत धैर्याचा संचार करण्याकरतांच त्यांनीं आपल्या देखत त्या तरुणावर प्रेम करतें असें दाखविलें. त्याच वेळेस आपण त्यांची मनधरणी करायची आणि नवीन नवीन विनोदी कोटिक्रमानें त्या तरुणाचें तोंडच बंद करायचें असें आपण करावें अशी त्यांची अपेक्षा होती, पण आपण त्यांची निराशा केलीत. आलेली संधी घालविलीत आणि बाईसाहेबांच्या आपल्याबद्दलच्या प्रेमपूर्ण मनांत विरजण मात्र घातलेंत. कांहीं तरी मुत्सद्दीगिरीचें किंवा शौर्याचें कृत्य केल्याशिवाय त्यांच्या मनांत आपल्याबद्दल पुन्हा प्रेम उत्पन्न होण्याला दुसरा मार्ग नाहीं.

सदा०:—आनंदीचें प्रेम मिळविणें जर शक्य असेल, तर तें मला शौर्याच्या कृत्यानेंच मिळविलें पाहिजे. मुत्सद्दीगिरीचा मला तिरस्कार आहे. नास्तिक होण्याइतकेंच तें मला प्रिय आहे.

वंचक०:—ठीक आहे; तर मग तुम्ही आपल्या दैवाची इमारत शौर्याच्या पायावरच उभारा. त्या तरुणाला द्वंद्वयुद्धाला बोलावा, त्याला नखशिखांत घायाळ करा; माझ्या आनंदीला ही बातमी कळेल, आणि मग ती आपल्यावर प्रेम करूं लागेल. शौर्याच्या कृत्याच्या वार्तेइतका स्त्रियांच्या हृदयांत प्रेम उत्पन्न करणारा दुसरा कोणीही मध्यस्त कुशल नाहीं.

फजीत्या:—सदानंदमहाराज, बस्स हीच युक्ति बिनतोड आहे.

सदा०:—तुम्हां दोघांपैकीं कोणी तरी माझें द्वंद्वयुद्धाचें आव्हानपत्र त्याला पोंचतें कराल का ?

वंचक०:—जा तर मग वीराला शोभेल अशा अक्षरांनीं आपलें

आव्हानपत्र लिहा. तें थोडक्यांत पण कटुशब्दांनीं लिहा. त्यांत विनोद नसला तरी चालेल, पण शब्दरचना नवीन आणि भारदस्त असूं द्या. लिहिण्यांत तोंडसुख घेतां येईल तितकें घ्या. आपण त्याला जर एकेरी लिहाल तर तें केवळ व्यर्थच जाणार नाहीं. हातभर लांब कागद असला तरी तो देखील शिव्यांनीं भरून काढा. हं, जा. आपल्या कामास लागा. पिसाच्या नरम लेखणीनें लिहिलेंत तरी आपलें पत्र नरम असतां कामा नये; शक्य तितकें कडकच झालें पाहिजे. हं, चला, जा कसे.

सदा०:—पण तुम्ही मला कोठें भेटाल ?

वंचक०:—हें पहा, आम्ही तुमच्या पाठोपाठ तुमच्या दिवाणखान्यांत तुम्हांला येऊन भेटतों.

सदा०:—ठीक आहे तर. [जातो.]

फजीत्या:—वंचकराज, हा गृहस्थ तुम्हांला एक चांगलाच लाभला आहे म्हणायचा !

वंचक०:—माझ्या पायीं त्याला कांहीं नाहीं तरी दोन हजार रुपयांच्या खर्चाचा लाभ झाला आहे.

फजीत्या:—तो आतां एक मासलेवाईक पत्र लिहून आणील. पण तुम्ही तें त्याला पोंचवाल का ?

वंचक०:—असें मी करणार नाहीं तर मग माझ्यावर कधीं विश्वासच ठेवूं नकोस. नुसतें पत्र देईन एवढेंच नव्हे तर त्याच्याकडून जबाब आणीन. दोरीनें बांधून बैलांनीं ओढलें तरी देखील ते एका ठिकाणीं येणार नाहींत. कारण असें पहा कीं, सदानंदाचें हृदय उघडें केलें तर

त्यांत माशीचा पाय बुडण्याइतकें देखील रक्त सांपडणार नाहीं, मग तेथें धैर्य कोठून असणार ?

फजीत्या:—आणि तसेंच त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या चेहऱ्यावर तर पौरुषत्वाचें कांहींच चिन्ह दिसत नाहीं.

[मालती येते.)

वंचक०:—ही पहा वालखिल्य ऋषींच्या मेळ्यांतली माझी मालती आली.

मालती:—तुम्हांला गम्मत पहायची असेल, आणि पोट धरधरून हंसायचें असेल तर माझ्या बरोबर चला. वेडा मदनसेन केवळ धर्मभ्रष्ट झाला आहे. कारण असें पहा कीं, ज्याला मुक्ति पाहिजे असते असे धार्मिक लोक योग्य गोष्टींवर विश्वास ठेऊन चालतात; वेडगळ आणि असंभवनीय गोष्टीवर कधींही विश्वास ठेवीत नाहींत. पण त्यानें आज पिवळे मोजे घातले आहेत.

वंचक०:—आणि वर पट्टे बांधले आहेत कीं नाहीं ?

मालती:—हो, बांधले आहेत तर. खून करणारा आपल्या शिकारीवर लक्ष ठेवतो, त्याप्रमाणें मीं त्याच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवली आहे. त्याला फसवण्याकरतां टाकलेल्या माझ्या पत्रांतील प्रत्येक गोष्ट त्यानें पाळली आहे. तो हंसतो तेव्हां नकाशांतील रेघांप्रमाणें त्याच्या तोंडावर सुरकुत्या काय पडतात ! तुम्हीं अशी मूर्ति कधींच पाहिली नसेल ? मला तर या मूर्खाची थट्टा केल्याशिवाय मुळींच राहवत नाहीं. बाईसाहेब त्याला मारतील देखील; त्यांनीं मारलें तर ती त्यांची एक कृपाच समजून तो हंसेल मात्र.

वंचक०:—बरें, चल तर मग. तो असेल तेथें आम्हांला घेऊन चल.

[जातात.]

प्रवेश तिसरा.

स्थळ—रस्ता.

सत्यव्रत आणि अनंतसेन प्रवेश करतात.

सत्य०:—मीं आपखुषीनें कांहीं तुम्हांला त्रास दिला नसता. पण माझ्याबद्दल तुम्हांला जो त्रास पडतो त्यापासून तुम्हांला जर आनंदच वाटत असेल तर मग यापुढें मी तुमच्या विरुद्ध जाणार नाहीं.

अनंत०:—मला तुमच्या मागें राहणें शक्य नव्हतें. तुतारीपेक्षां तीक्ष्ण अशा माझ्या इच्छेनें मला बोंचून इथें आणलें. तुमच्यावर माझें जें प्रेम आहे, तेवढेंच प्रेम जरी यापेक्षां देखील लांबचा प्रवास करण्यास एखाद्यास उद्युक्त करण्यास पुरेसें आहे, तरी तेवढें प्रेमच कांहीं माझ्या येण्याचें कारण नाहीं. या प्रांताची तुम्हांला ओळख नसल्यामुळें व तुमच्यावर एखादें संकट येईल कीं काय या काळजीमुळेंच मी येथें आलों. एखाद्या मित्ररहित अनोळखी परस्थाशीं येथील लोकांची वर्तणूक फार तुसडेपणाची असल्यामुळें—तुमच्यावरील माझ्या प्रेमाला या विचारांचा दुजोरा मिळाल्यामुळें—मला तुमच्या पाठोपाठ यावें लागलें.

सत्य०:—अनंतसेन, याबद्दल तुमचे आभार मानण्यापेक्षां मला कांहीं एक ज्यास्त उत्तर देतां येत नाहीं. मी तुमचा निरंतर—पण बहुतेक वेळां अशा शुष्क व निरुपयोगी मोबदल्यानेंच अशा उपकाराची फेड करण्यांत येते. माझ्या मनाप्रमाणेंच माझी सांपत्तिक स्थिति जर श्रीमंतीची असती तर मग मीं यापेक्षां निराळ्याच तऱ्हेनें तुमच्या उप-

कारांची फेड केली असती. बरें पण आतां काय करायचें? येथील प्राचीन इमारतींचे अवशेष भाग पहायला जाऊं?

अनंत०:—अहो सत्यव्रतराव, हें काम आपण उद्यां करूं. अगोदर आपल्या बिऱ्हाडाची सोय पहायला चला.

सत्य०:—अजून दिवसही बराच आहे, आणि मी थकलोंही नाहीं, तेव्हां या प्रसिद्ध ठिकाणच्या प्रख्यात इमारती पाहून आपले डोळे तरी तृप्त करूं.

अनंत०:—तुम्ही मला माफ करा. एकदां एका दर्यायुद्धांत मीं येथल्या महाराजांच्या लढाऊ जहाजांचें बरेंच नुकसान केलें होतें. त्या नुकसानाकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं जर मला येथें आतां धरलें, तर त्याबद्दल मला चांगलीच शिक्षा भोगावी लागेल. तेव्हां या रस्त्यांतून उघडपणें फिरणें मला निर्धास्त वाटत नाहीं.

सत्य०:—मला वाटतें, तुम्हीं त्यांचे बरेच लोक मारले असतील.

अनंत०:—माझ्या हातून रक्तपात कांहीं विशेष झाला नाहीं. पण तें भांडण व ती वेळ अशा होती कीं, त्या वेळीं असा रक्तपात होणें कांहीं अशक्य नव्हतें. यांची लूट परत करून सलोखा करणें कांहीं कठीण नव्हतें, आणि व्यापाराला धक्का न बसावा म्हणून आमच्यापैकीं बहुतेकांनीं तसें केलेंही. पण मी मात्र वेगळा राहिलों म्हणून आतां जर मला धरलें, तर शिक्षा भोगल्याशिवाय कांहीं माझी सुटका होणार नाहीं.

सत्य०:—तर मग भर वस्तींतून असे उघडपणें हिंडूं नका कसे.

अनंत०:—पण मला तें शोभत नाहीं. बरें तर, ही पैशाची पिशवी तुम्ही आपल्याजवळ असूं द्या. या दक्षिणेच्या दिशेला हत्तीच्या कारंज्या जवळच्या खाणावळींत उतरण्याची चांगली सोय आहे. तिथेंच मी

तुम्हांला भेटेन. तुम्हीं या शहराची शोभा पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून या. मी तुमच्या जेवणाची सोय लावून ठेवतों.

सत्य०:—तुमची पैशांची थैली मला कशाला ?

अनंतः—शहरांत फिरतांना एखादी सुंदर वस्तु तुमच्या नजरेस पडून ती घ्यावीशी वाटली तर ती तुमच्या उपयोगीं पडेल. तुमच्या जवळ अशा चैनी वस्तु घेण्यापुरते पैसे कुठें आहेत बरें ?

सत्य०:—ठीक आहे. मी तुमची थैली सांभाळतों तर मग. तुम्ही आतां जा. मी एका तासानें येईन.

अनंत०:—सांगितल्या ठिकाणीं या बरें.

सत्य०:—अगदीं बरोबर येईन. [जातात.]

प्रवेश चवथा.

स्थळ—आनंदीचा बाग.

आनंदी आणि मालती प्रवेश करतात.

आनंदीः—मीं त्याला बोलावणें पाठविलें आहे. मी येतों म्हणून त्याचा निरोपही आला आहे. मी त्याचें कोणत्या तऱ्हेनें स्वागत करूं. मी त्याला नजर तरी काय करूं ? मनधरणीनें किंवा वचनांनीं तरुणांचें मन आपलेंसें करून घेतां येत नाहीं. तें देणग्यांनींच स्वाधीन करतां येतें. पण मी हें केवढ्या मोठ्यानें तरी बोलतें आहें ? (उघड) मदनसेन कोठें आहेत ? ते स्वभावानें गंभीर आणि वागण्यांत फार सभ्य आहेत.

माझ्यासारख्या स्त्रीच्या घरची व्यवस्था ठेवण्याच्या कामाला फार योग्य मनुष्य आहेत. पण ते आहेत तरी कोठें ?

मालती:—बाईसाहेब, ते पहा इकडेच येत आहेत. पण आजची त्यांची तऱ्हा कांहीं विचित्र दिसते आहे. खरोखर त्यांना भुतानें पछाडलें असलें पाहिजे.

आनंदी:—कां ? असें झालें आहे तरी काय ? वाटेल तें बडबडतात का अनावर धांवतात ?

मालती:—नाहीं, ते असलें कांहीं करीत नाहींत. ते फक्त हंसतात. त्यांची बुद्धि कांहीं ठिकाणावर नाहीं. तर आपण ते येथें येतील तेव्हां कोणी तरी सोबतीला असूं द्याव.

आनंदी:—जा, त्यांना घेऊन ये. (मालती जाते.) आनंदी असणें जर वेड असेल तर दुःखी असणें हेंही एक वेडच आहे. मग मीही त्यांच्याप्रमाणेंच वेडी ठरेन.

[मालती व मदनसेन प्रवेश करतात.]

कसें काय मदनसेन ?

मदन०:—काय विचारतां बाईसाहेब ? हः हः हः

आनंदी:—हें काय ? हंसतां काय म्हणून ? मीं तुम्हांला एका विचाराच्या कामाकरतां बोलाविलें आहे.

मदन०:—विचाराचें काम ? मी स्वभावतःच विचारी आहें. मीं हे पायाला पट्टे बांधले आहेत यांनीं रुधिराभिसरणाला अडथळा होत आहे. पण त्याचें काय ? "एका प्रणयदेवतेची खुषी म्हणजेच सर्वांची

खुषी " अशी जी एक म्हण आहे, त्याप्रमाणें पाहिलें तर एका प्राण्याला जर आनंद होईल तर मला त्यापुढें जगाचा आनंद तुच्छ वाटेल.

आनंदी:—कसें काय ? आज आपली प्रकृति कशी काय आहे ? आपलें मन ठिकाणावर आहे ना ?

मदन०:—मीं पिवळे मोजे घातले तरी माझें मन कांहीं काळें नाहीं. तें माझ्या हातीं पडलें आणि त्यांत सांगितल्याप्रमाणें मला वागलेंच पाहिजे. त्यांतील तें सुबक अक्षर माझ्या चांगल्या ओळखीचें आहे.

आनंदी:—तुम्ही आतां जरा निजाल तर बरें.

मदन०:—काय ? निजूं ! आपली तशी इच्छा असेल तर मला त्यांत आनंदच आहे.

आनंदी:—जा. ईश्वराच्या कृपेनें तुम्ही लवकर बरे व्हाल. तुम्ही असे हंसतां काय ? आणि आपल्या हाताचें चुंबन काय घेतां ?

मालती:—कसें काय मदनसेन ?

मदन०:—काय तुला उत्तर देऊं ? बरें पण देतों. कधीं कधीं बुलबुल पक्षी घुबडालाही उत्तर देतो.

मालती:—आपण आज बाईसाहेबांच्यापुढें अशा उद्धट रीतीनें कां वागतां ?

मदन०:—' मोठेपणाला भिऊं नका ' हें वाक्य फारच उत्तम आहे.

आनंदी:—मदनसेन ! यानें तुम्हीं कोणता अर्थ दर्शविलात ?

मदन०:—' कांहीं जन्मतःच मोठे असतात '—

आनंदी:—वा !

मदन०:—' कांहीं मोठेपणा मिळवितात '—

आनंदी:—हें तुम्ही काय बडबडतां आहां ?

मदन०:—' आणि कांहींच्या वर मोठेपणा लादला जातो. '

आनंदी:—देव करो आणि तुम्हांला लवकर आराम पडो.

मदन०:—' पिवळे मोजे घालण्याची सूचना कोण करीत आहे हें लक्षांत आणा. '—

आनंदी:—पिवळे मोजे ?

मदन०:—' तसेंच त्यावर पट्टे बांधण्याचेंही लक्षांत असूं द्या. '—

आनंदी:—पट्टे बांधायचे !

मदन०:—" जा. तुमची इच्छा असेल तर तुम्हांला मोठेपणाला चढविलें आहें. "

आनंदी:—मला मोठेपणाला चढविलें आहे ?

मदन०:—' तशी इच्छा नसेल तर आहांत तसेंच सेवक रहा. '

आनंदी:—हें तर शुद्ध वेड आहे.

[एक सेवक प्रवेश करतो.]

सेवक:—प्रेमानंदमहाराजांचे ते तरुण वकील परत आले आहेत. त्यांना परतविण्याकरतां अनेक कारणें सांगून पाहिलीं, पण ते आपली भेट घेण्याचा हट्टच घेऊन बसले आहेत.

आनंदी:—बरें, मीच त्यांच्याकडे येतें. (सेवक जातो.) मालती, यांची काळजी घे बरें. वंचकराज कोठें आहेत ? यांच्याकरतां माझी अर्धी

संपत्ति खर्च झाली तरी हरकत नाहीं. कोणाला तरी यांची काळजी घेण्यास सांगून यांना त्यांच्या आधीन कर.

[आनंदी व मालती जातात.]

मदन०:—वा आतां तूं इतकी सलगी करायला लागलीस का? वंचकराजापेक्षां हलक्या दर्जाचा मनुष्य माझ्या तैनातीला मुळींच योग्य नाहीं. हें सर्व त्या पत्रांतील मजकुराप्रमाणेंच आहे. मीं त्याच्याशीं बेमुर्वतीनें वागावें म्हणूनच ती त्याला मुद्दाम माझ्याकडे पाठवीत आहे. त्या पत्रांत तिची मला अशीच सूचना आहे. आपला नम्र स्वभाव सोडून द्या, नातेवाईकांशीं बेमुर्वतीनें वागा, नोकरांचाकरांशीं उद्दामपणाचें वर्तन असूं द्या, नेहमीं राजकीय गोष्टी बोलत जा, एकलकोंडेपणानें वागण्याची संवय ठेवा ' असें लिहून लगेच याकरतां कसें रहावें तेंही तिनें सांगितलें आहे. गंभीर चेहरा, मानीपणाचें चालणें, हळू बोलणें, सरदारी पोषाख वगैरे गोष्टी तिनें सुचविल्या आहेत. मीं तिला तर जाळयांत धरली आहे; परंतु हें देवानेंच केलें आहे आणि, त्याची इच्छा असेल तर हें माझें काम पूर्णही होईल. आतां जातांना ती काय म्हणाली बरें? ' यांची काळजी घ्या, ' असेंच कीं नाहीं? ' यांची ' ! तिनें माझें नांव कांहीं घेतलें नाहीं. मोघम ' यांची ' असेंच म्हणाली. बस्स सर्व ठीक जुळत चाललें आहे. रतीभर, नव्हे रतीच्या रतीभर देखील संशय उरला नाहीं; आतां कांहीं अडथळा उरला नाहीं. सर्व गोष्टी कशा अनुकूल—झालें. आणखी काय पाहिजे? आतां होणार तें सर्व मला आणि माझ्या कार्य, सिद्धीला विघातक कांहीं होणार नाहीं. पण याचें श्रेय कांहीं माझें नव्हे, सर्व देवाची करणी. त्यालाच शरण गेलें पाहिजे.

[वंचकराज आणि फजीत्यासह मालती येते.]

वंचक०:—तो कोठें आहे ? देवाला स्मरून सांगा. सर्व भूतांनीं एकत्र होऊन जरी त्याला पछाडलें असलें, तरी देखील मी त्याच्याशीं बोलेन.

फजीत्या:—हा पहा इथें आहे. कसें काय राव ? आपली तब्यत तर ठीक आहे ना ?

मदन०:—चला जा, चालते व्हा. मला एकांताचा सुखानुभव घेऊं द्या. जा म्हणतों ना ?

मालती:—पहा भूत कसें बोलतें आहे तें ! कां मीं असेंच म्हटलें होतें ना ? वंचकराज, यांची काळजी घेण्याचें काम बाईसाहेबांनीं आपल्यावर सोंपविलें आहे.

मदन०:—हः ! हः !! हः !!! खरेंच कीं काय ?

वंचक०:—तुम्ही जा कसे. इथें शांतता असूं द्या. त्यांच्याशीं कसें नीट वागलें पाहिजे. मला एकट्यालाच इथें राहूं द्या. मदनसेन, आपली प्रकृति नीट आहे ना ? आपली सर्व व्यवस्था नीट आहे ना ! गृहस्था ! या भूतांना कशाला आपल्याजवळ आश्रय दिलास ? आपणां मानवांचे तीं शत्रु आहेत.

मदन०:—आपण बोलतां आहांत याचा अर्थ आपल्याला तरी कळतो आहे का ?

मालती:—पाहिलेंत भूताच्या विरुद्ध बोलतांच त्याला कसें लागलें तें ! देव करो आणि तें चवताळो न म्हणजे झालें.

फजीत्या:—पंचाक्षऱ्याला तरी बोलव.

मालती:—मी जगलें वांचलें तर उद्यां सकाळीं त्याला बोलावून आणतें. बाईसाहेब यांची प्रकृति सुधारावी म्हणून वाटेल तो खर्च करतील.

मदन०:—अं ! काय ? (रागानें मालतीच्या आंगावर धांवतो.)

मालती:—अग बाई !

वंचक०:—जरा गप्प रहा पाहूं. ही कांहीं वागण्याची रीत नाहीं. त्यांना राग आला पाहिलास. इथें यांच्याजवळ मला आतां एकट्यालाच राहूं द्या.

फजीत्या:—यांच्याशीं जरा नरम वागलें पाहिजे. पिशाच्च जरा तेज आहे, तेव्हां गरमपणानें वागून कांहीं काम भागणार नाहीं. जरा त्याच्याच तंत्रानें घेतलें पाहिजे.

वंचक०:—कां दोस्त ! राग गेला ना ?

मदन०:—हं, जरा अदबीनें बोला.

वंचक०:—अहो जाऊं द्याहो. त्यांत काय आहे ! या पिशाच्चाच्या नादीं लागून अशा माकडचेष्टा करणें तुमच्या सारख्यांना शोभत नाहीं. घालवा हें वेड. घेऊं द्या त्याला मुक्ति.

मालती:—त्यांना जरा रामरक्षा म्हणायला सांगा, रामरक्षा.

मदन०:—तूं मला रामरक्षा म्हणायला सांगणार काय सटवे !

मालती:—मी तुम्हांला सांगतें ना कीं यांना हे देवभक्तीचे मार्ग कांहीं पसंत पडायचे नाहींत.

मदन०:—चला, तुम्ही सर्वजण नाहींसे व्हा येथून. मूर्ख नाहींतर. माझी आणि तुमची योग्यता कांहीं सारखी नाहीं. कळेल, कळेल, लवकरच कळेल खरी स्थिति ! [जातो.]

वंचक०:—इतका परिणाम होणें शक्य आहे का ?

फजीत्या:—हीच गोष्ट मीं नाटकांत पाहिली असती तर ती अगदीं अशक्य म्हणून नाक मुरडलें असतें.

वंचक०:—आपल्या युक्तीचा परिणाम त्याच्या मनावर अगदीं पक्का झाला आहे.

मालती:—जा, त्याच्या बरोबर असा. नाहीं तर आपली युक्ति फुटेल आणि मग सगळेंच ऑफस् होईल.

फजीत्या:—मला वाटतें आणखी कांहीं वेळानें आपण त्याला खरो-खरीच वेडा करूं.

मालती:—तो जर वेडा झाला तर मग आपल्या मागची एक पिडाच गेली.

वंचक०:—चला. त्याला बांधून एखाद्या अंधारकोठडींत कोंडून ठेवूं. तो वेडा झाल्याबद्दल आनंदीची तर पूर्ण खात्री आहे. आपल्याला यांत आनंद वाटेनासा झाला, आणि त्याला पूर्ण शिक्षा झाली असें आप-ल्याला वाटलें, म्हणजे मग आपण आपला हा खेळ बंद करून त्याच्यावर दया करूं. त्या वेळीं लोकमताच्या दरबारांत आपली युक्ति प्रसिद्ध करून वेड्यांची शोधयित्री म्हणून आपला बहुमान करूं पण हे पहा, आणखी हे एक राव इकडे येत आहेत.

[सदानंद येतो.]

फजीत्या:—आज काय आनंदाची पर्वणीच आहे. ही आणखी एक गंमत आली.

सदा०:—हें पहा, मीं आपलें जलाल आव्हानपत्र लिहून आणलें आहे. वाचा.

फजीत्याः—खरेंच का तें इतकें जलाल आहे ?

सदा०:—अगदीं निःसंशय. त्याला तर तें अगदीं झोंबेल वाचा म्हणजे कळेल.

वंचक०:—आणा इकडे (वाचतो.) " हे तरुणा ! तूं कोणत्याही उच्च कुळांतला असलास तरी अगदीं क्षुद्र प्राणी आहेस. "

फजीत्याः—वा ! उत्तम ! हिमतीनें लिहिलें आहे.

वंचक०:—(वाचतो.) " मी तुला असें कां म्हणतों याच्याबद्दल आश्चर्य वाटूं देऊं नको, पण याचें कारण कांहीं मी तुला सांगणार नाहीं ! "

फजीत्याः—सुरेख विधान ! अशा लिहिण्यानें कायद्याच्या कचाट्यांत सांपडण्याचीही भीति नाहीं.

वंचक०:—(वाचतो.) " तूं आनंदीबाईकडे येतोस आणि तीही तुमच्याशीं माझ्यादेखत सलगीनें वागते, परंतु तूं अगदीं खोटा आहेस. याचमुळें मी तुला द्वंद्वयुद्धाचें आव्हान करतों असें नाहीं. "

फजीत्याः—फारच थोडक्यांत; आणि इतकें स्पष्ट अर्थ- (हळूच) विहीन.

वंचक०:—(वाचतो.) " मी तुझ्या घरीं जाण्याच्या रस्त्यावर दबा धरून बसेन, आणि जर दैवयोगानें तूं मला मारलेंस—"

फजीत्याः—खूप !

वंचक०:—(वाचतो.) " तर तूं एखाद्या बदमाषासारखें किंवा चोरासारखें मला मारलेंस असें होईल. "

फजीत्याः—अजून कायद्याच्या भीतीपासून अलिप्त आहांत. सुरेख.

वंचक०:—(वाचतो.) " बस्स, इतकें पुरे; आपल्यापैकीं कोणा तरी एकाच्या आत्म्यावर ईश्वर कृपा करो ! कदाचित् माझ्याच आत्म्यावर त्याची पाळी येईल, परंतु माझी आशा निराळीच आहे, आणि म्हणून तूं सावध रहा असें तुला बजावून सांगतों. तुझ्या मतानें तुझा मित्र, पण खरोखर तुझा हाडवैरी—सदानंद. " या पत्रानें जर त्याला चेतना प्राप्त झाली नाहीं तर मग त्याला कशानेंच ती यावयाची नाहीं. मी हें त्याला देतों.

मालती:—तो आतां बाईसाहेबांशीं कांहीं खलबत करीत आहे. तो लवकरच परत जाईल, तेव्हां त्याला हें पत्र द्यायला तुम्हांला उत्तम संधी मिळेल.

वंचक०:—सदानंद ! जाऊन बगीचाच्या कोनाशीं हेराप्रमाणें त्याचा दबा धरून बसा, आणि त्याला वार करतांना त्याला खूप शिव्या द्या. कारण शूरत्वाच्या प्रत्यक्ष कृतीपेक्षां मोठ्यानें दिलेल्या शिव्यांनीं आणि बडबडीनेंच मनुष्याच्या धैर्याची परीक्षा होत असते. हं, चला, जलदी करा.

सदा०:—शिव्या देण्याबद्दल मुळींच काळजी करूं नका.

[जातो.]

वंचक०:—मी हें पत्र कांहीं त्याला देणार नाहीं. तो तरुण चांगला बुद्धिवान् आणि शिकलासवरलेला दिसतो. आणि राजेसाहेब आणि आनंदी यांच्यांत बोलणें करण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली आहे ह्यानेंही माझ्या म्हणण्याला बळकटी येते. तेव्हां हें मूर्खपणानें ओतप्रोत भरलेलें पत्र पाहून त्याला मुळींच भय वाटणार नाहीं. पण हें आव्हान मी त्याला तोंडींच सांगेन. त्यांत सदानंदाची खूप तारीफ करून त्याचा राग, कौशल्य, आणि लढण्यांत मागेंपुढें न पाहण्याचा त्याचा स्वभाव

यांचें वर्णन करून त्याच्या मनांत भीति उत्पन्न होईल असें करीन, आणि त्याच्या भयाकडे पाहिलें तर त्याच्या मनावर याचा परिणामही चांगला होईल अशी मला खात्री आहे. यानें हे दोघेही इतके भयभीत होतील कीं, अत्यंत विषारी सर्पाप्रमाणें हे केवळ दृष्टिपातानेंच एकमेकांना मारून टाकतील.

[आनंदी आणि विजया प्रवेश करतात.]

फजीत्या:—हा पहा, तो बाईसाहेबांच्या बरोबर इकडेच येत आहे. दूर होऊन त्यांना आतां वाट द्या आणि बाईसाहेबांना सोडून तो चालला कीं एकदम जाऊन गांठा.

वंचक०:—ठीक आहे. तोंपर्यंत हें आव्हान भयंकर रीतीनें सांगण्याची युक्ति योजीत बसतो.

[वंचक, फजीत्या व मालती जातात.]

आनंदी:—आपल्यासारख्या पाषाणहृदयापुढें आपलें मन उघडें केल्यामुळें मीं आपलें मन, धन मात्र निष्काळजीपणानें आपल्या स्वाधीन केलें आहे. या माझ्या अपराधाबद्दल माझें मन मला खात आहे. पण माझें प्रेम इतकें बलवत्तर आहे कीं ते मनाच्या टोंचणीला मुळींच जुमानीत नाहीं.

विजया:—ज्याप्रमाणें आपलें प्रेम बलवत्तर आहे त्याचप्रमाणें माझ्या धन्याचें दु:खही अनिवार आहे.

आनंदी:—ही माझी आंगठी आहे. इचा स्वीकार करा. यांत माझी प्रतिमा आहे. नाहीं म्हणूं नका. हिला वाचा नसल्यामुळें ती आपल्याला त्रास देणार नाहीं. आपण उद्यां पुन्हां येथें यावें अशी विनंति आहे.

माझ्या मानधनाला धक्का न बसतां देण्यासारखी कोणती गोष्ट आपण मागाल आणि मी ती आपल्यास देण्यास नाकारीन ?

विजया:—माझ्या धन्यावर आपण निर्मल प्रेम करा याशिवाय मी आणिक काय मागूं ?

आनंदी:—जें मीं आपल्याला अर्पण केलें तेंच त्यांना आपल्या सत्वाला धक्का न लावतां कसें देऊं शकेन बरें ?

विजया:—माझ्या ऐवजीं दुसऱ्यावर प्रेम करण्यास मी आपल्यास मुभा देतों.

आनंदी:—बरें उद्यां या. देवा ! तुझी यांच्यावर कृपादृष्टि असूं दे. आपण पिशाच्च असता तरी देखील आपल्याबरोबर मी नर्कवास पत्करिला असता. [जाते.]

[वंचक व फजीत्या प्रवेश करतात.]

वंचक०:—अहो महाराज, आपला सदा विजय असो.

विजया:—आपलाही पण तसाच असो.

वंचक०:—आपल्या तरवारीला हातीं धरून आपलें संरक्षण करण्यास तयार व्हा. या बागेच्या कोनावर दुष्ट व क्रूर शिकाऱ्याप्रमाणें आपला शत्रु दबा धरून बसला आहे. आपण त्याचा काय अपराध केला असेल कोण जाणे. म्यानांतून तरवार बाहेर काढा आणि हल्ला करण्यास तयार व्हा. आपला शत्रु चपल, क्रूर आणि युद्धकलेंत कुशल आहे तर सावध असा.

विजया:—माझ्याशीं कोणाचें भांडण नाहीं किंवा मीं कोणाचा अपराध केलेलाही मला आठवत नाहीं म्हणून मला वाटतें कीं, आपला कांहीं तरी गैरसमज झाला असला पाहिजे.

वंचक०:—पण याच्या उलट स्थिति आहे याबद्दल माझी खात्री आहे. आपल्या शत्रूंत तारुण्य, शक्ति, युद्धकौशल्य आणि संताप यांचें एकीकरण झालें आहे, म्हणून म्हणतों कीं, आपल्याला जर आपल्या जीवाची कांहीं किंमत असेल तर स्वसंरक्षणास तयार व्हा.

विजया:—पण असा माझा शत्रु आहे तरी कोण ?

वंचक०:—दरबारी महत्त्वाच्या कामगिरीबद्दल सरदारीचीं वस्त्रें मिळविलेला तो गृहस्थ आहे. म्हणून तो शांत आहे असें समजूं नका. खाजगी भांडणांत केवळ राक्षस आहे. अनेक वेळां त्यानें लढण्यांत आपल्या शत्रूंचे प्राण हरण केले आहेत, आणि सध्यांच्या वेळीं तर मृत्यूशिवाय शांत होणार नाहीं इतका त्याचा संताप अनावर झाला आहे. काय होईल तें होवो; एकानें कोणीं तरी मेलेंच पाहिजे असें त्याचें म्हणणें आहे.

विजया:—तर मग मी परत बाईसाहेबांकडे जाऊन संरक्षणाकरतां कांहीं लोक घेऊन येतों. मी कांहीं योद्धा नाहीं. लोकांच्या शौर्याची परीक्षा पाहण्याकरतां मुद्दाम भांडण उकरून काढणारे कांहीं लोक असतात, त्यांपैकींच हा गृहस्थ असावा असें वाटतें.

वंचक०:—नाहीं तशापैकीं तो नाहीं. कांहीं तसाच आपल्या हातून अपराध घडला असल्यामुळें त्याला इतका राग आला आहे. म्हणून म्हणतों कीं पुढें व्हा आणि त्याच्या इच्छेप्रमाणें होऊं द्या. त्याच्याशीं लढण्यांत तुम्हांला जो धोका आहे त्याप्रमाणेंच माझ्याशीं लढून तुम्हांला आपला जीव धोक्यांत घालावा लागेल आणि परत जाण्याची गोष्ट बोलाल तर त्याच्याऐवजीं तुम्हांला माझ्याशींच लढावें लागेल. म्हणून म्हणतों तरवार उपसून व्हा पुढें आणि काय ! तुम्हांला लढलें हें पाहिजेच नाहीं तर पुन्हां शस्त्र बाळगणार नाहीं अशी शपथ घेतली पाहिजे.

विजयाः—ही गोष्ट जितकी विचित्र आहे तितकीच उमेटपणाचीही आहे. माझ्या हातून कांहीं अपराध घडलाच असेल तर तो गैरसावधपणानें झाला असेल, मुद्दाम कांहीं मीं केला नाहीं. तर आपल्या त्या सरदार-साहेबांना माझा अपराध कोणता आहे हें विचारून मला कळवाल तर माझ्यावर फार उपकार होतील.

वंचक०:—ठीक आहे. आपल्या इच्छेप्रमाणें मी करतों. फजीत्या, मी परत येईपर्यंत तूं यांच्याजवळ रहा. [जातो.]

विजयाः—कांहो राव ! आपल्याला या प्रकरणाची कांहीं माहिती आहे का ?

फजीत्याः—ते सरदारसाहेब फार रागावले असून जीव देण्या किंवा घेण्यापर्यंत लढण्याचा विचार आहे. याचें कारण काय असेल तें कांहीं मला माहीत नाहीं.

विजयाः—हे तुमचे सरदार आहेत तरी कसे काय ?

फजीत्याः—ते लढण्यांत जितके शूर दिसतात तितके कांहीं ते दिस-ण्यांत शूर दिसत नाहींत. या सर्व इंद्रभुवनांत यांच्यासारखा युद्धकुशल, क्रूर, आणि जीव घेईपर्यंत लढणारा प्रतिस्पर्धी दुसरा कोणीही मिळणार नाहीं. आपण त्यांच्यापर्यंत चलतां का ? साधल्यास मी आपला दोघांचा समेट करून देतों.

विजयाः—हें जर आपण कराल, तर मी आपला फार आभारी होईन. मी युद्धापेक्षां समेटाचा ज्यास्त भोक्ता आहे. हा माझा स्वभाव इतरांना कळला तरी हरकत नाहीं.

[जातात.]

[सदानंद व वंचकराज प्रवेश करतो.]

वंचक०:—अहो राव ! तो तर केवळ राक्षस आहे. असा भांडखोर मनुष्य आपण तर कधींच पाहिला नाहीं. आम्ही सहज तरवारीचे दोन हात खेळलों, तरवारीचें म्यान देखील काढलें नव्हतें, पण त्यानें माझ्यावर अशा रीतीनें एक वार केला कीं तो चुकवितां येणें अगदीं अशक्य होतें. जमिनीला पाय लाविल्याशिवाय चालणें हें जसें शक्य नाहीं, तद्वतच त्याचा वार लागूं न देणें हेंही शक्य नाहीं. तो शहाचा वस्ताद होता असें म्हणतात.

सदा०:—असें आहे का ? मग मी नाहीं बोवा त्याच्याशीं सामना देणार.

वंचक०:—पण तो आतां कुठें ऐकणार आहे. फजीत्या कांहीं त्याला आतां थांबवूं शकणार नाहीं.

सदा०:—तो इतका शूर आणि तरवार फेरण्यांत वस्ताद आहे हें जर मला अगोदर कळलें असतें, तर मीं त्याला द्वंद्वाला आव्हानच केलें नसतें. तो जर आपला हेका सोडील तर मी त्याला आपला करडा घोडा बक्षीस देईन.

वंचक०:—बरें मी त्याच्याशीं हें बोलणें बोलतों तोंपर्यंत तुम्ही येथेंच उभे रहा, आणि रागाचा खूप अविर्भाव दाखवा. प्राणहानीशिवाय याचा शेवट लागेल असें मला वाटतें (एकीकडे) तुला ज्याप्रमाणें मीं आपल्या ताब्यांत ठेवला आहे, त्याप्रमाणेंच तुझ्या घोड्यावरही मी आतां आपला ताबा चालवीन.

[फजीत्या व विजया प्रवेश करतात.]

वंचक०:—(फजीत्यास) हें यांचें भांडण मिटविण्याबद्दल मीं हा

घोडा पटकाविला आहे. हा तरुण युद्धांत केवळ राक्षस आहे अशी मीं त्याची खात्री केली आहे.

फजीत्या:—त्याच्याही मनांत त्याच्याबद्दल अशीच भीति उत्पन्न झाली आहे–हा कसा फिका पडला आहे, आणि श्वास सोडतो आहे पहा. जसें काय ह्याच्यामागें एखादें वन्य श्वापदच लागलें आहे.

वंचक॰:—(विजयेस) देवाशपथ, त्यानें या भांडणाचा आतां नीट विचार केलान् तेव्हां इतक्या विकोपाला जाण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं असें त्यालाही वाटूं लागलें. पण आतां कांहीं उपाय राहिला नाहीं राव. एकदां शपथ घेतल्याप्रमाणें तुमच्याशीं लढलेंच पाहिजे असें तो म्हणतो. तेव्हां उपसा तरवार आणि होऊन जाऊं द्या दोन हात. तुम्हांला इजा करणार नाहीं. असें त्यानें सांगितलें आहे.

विजया:—(एकीकडे) देवा ! आतां तूंच माझें रक्षण करणार आहेस. आणखी थोडेंसें ज्यास्त भ्यालें तर आतां माझ्यांतील पुरुषत्वाची वाण उघड होईल.

फजीत्या:—जर ते चवताळले तर शस्त्र ठेवून शरण जा म्हणजे झालें.

वंचक॰:—सदानंदजी ! चला व्हा तयार. कांहीं उपाय उरला नाहीं. तो गृहस्थ आपल्या मानाकरतां तुमच्याशीं दोन हात केल्याशिवाय कांहीं रहात नाहीं. द्वंद्वयुद्धाच्या नियमाप्रमाणें त्याला तसें केलेंच पाहिजे. पण शिपायाच्या बाण्याला आणि सभ्यतेला अनुसरून त्यानें तुम्हांला इजा करणार नाहीं असें मला वचन दिलें आहे. चला, या तर.

सदा॰:—ईश्वर करो आणि तो आपल्या वचनाला जागो.

विजयाः—हें माझ्या इच्छेविरुद्ध हें मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतों.

[दोघेही तरवारी उपसतात.]

[अनंतसेन प्रवेश करतो.]

अनंत०:—चल, आपली तरवार खालीं ठेव. जर या गृहस्थानें तुझी कांहीं आगळीक केली असेल तर ती माझ्या हातून झाली आहे असें समज. जर तूं त्याला त्रास देशील तर माझ्याशीं प्रसंग येईल हें लक्षांत असूं दे.

वंचक०:—कांहो राव ! तुम्ही कोण ?

अनंत०:—लोक प्रेमाकरतां वाटेल तें करतात असें आपण ऐकलें असेल, पण यांच्यावर माझें जें प्रेम आहे त्याकरतां त्यांच्यापेक्षां ज्यास्त महत्त्वाचें व धोक्याचें असें वाटेल तें काम करण्यास तयार असलेला मी एक आहें.

वंचक०:—जर लोकांचें भांडण उचलणारा असशील तर मग माझ्याशीं दोन हात कर. मी तुझ्याशीं लढण्याला तयार आहें.

[तरवारी उपसतात.]


[कोतवाल शिपायांसह प्रवेश करतो.]

फजीत्याः—वंचकराज ! थांबा, ते पहा कोतवालसाहेब येत आहेत.

वंचक०:—हे गेले कीं मी तुमच्याशीं लढतों.

विजयाः—आपणही इच्छा असेल तर आपल्या तरवारीला म्यान चढवा.

सदा०:—आनंदानें तसें करतों. आणि आपल्या देणगीबद्दल मी



अनंतसेन--चल, आपली तरवार खालीं ठेव.　　　[अं. २ प्र. ४ पृ. १२]

आपला शब्द खरा करीन. तुम्ही त्याच्यावर छान स्वारी करूं शकाल, आणि वागायला तो फार चांगला आहे.

कोतवाल:—हाच तो मनुष्य. चला पकडा याला.

जमादार:—अनंतसेन ! प्रेमानंदमहाराजांच्या हुकुमाप्रमाणें मी तुम्हांला कैद करतों.

अनंत०:—तुम्ही चुकतां आहांत. तो मनुष्य मी नसेन.

कोतवाल:—नाहीं, मुळींच चुकत नाहीं. आतां जरी तुमच्या अंगावर दर्यावर्दी पोषाख नाहीं तरी तुमचा चेहरा माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. चला यांना घेऊन. मी यांना ओळखतों हें त्यांना ठाऊक आहे.

अनंत०:—ठीक आहे. मला तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. (विजयेस) तुमच्या शोधाकरितां निघालों तों हा प्रसंग आला, निरुपाय आहे. मी तो सहन करण्यास तयार आहें. या प्रसंगामुळें मला तुमच्या-जवळून आपली पैशाची पिशवी मागावी लागत आहे याला माझा नाइलाज आहे. माझ्यावर आलेल्या या संकटापेक्षां मला आतां तुमच्या उपयोगीं पडतां येणार नाहीं. याबद्दल मला फार वाईट वाटतें. तुम्हांला आश्चर्य वाटतें आहे. पण वाईट वाटूं देऊं नका.

जमादार:—चला लवकर.

अनंत०:—मला थोडीशी तरी रक्कम परत द्या.

विजया:—कोणती रक्कम महाराज ? आतां तुम्हीं माझ्याबद्दल जी दया दाखविलीत त्याबद्दल व तुमच्यावर आलेला प्रसंग पाहून मी आपल्या अल्प ऐपतीप्रमाणें ही थोडीशी रक्कम तुम्हांला देतों. मजजवळ कांहीं फार रक्कम नाहीं, तरी आहे त्यांतील ही अर्धी तुम्ही घ्या.

अनंत०:—काय ? अशा वेळीं तुम्ही माझी रक्कम नाहीं म्हणतां ? मीं तुमची जी कामगिरी केली, व तुम्हांला जी मदत केली तिचा तुमच्या मनावर कांहींच परिणाम होत नाहीं काय ? माझ्या संकटांत भर टाकूं नका. असें कराल तर केलेल्या उपकारांची अशा कृतघ्नपणानें फेड केल्याबद्दल तुम्हांला शिव्या देण्याइतकें माझें मन बेताल होईल.

विजया:—मी तुमचे पैसेही जाणत नाहीं, आणि तुम्हांलाही ओळखत नाहीं. खोटें बोलणें, बढाई मारणें, नालस्त्या करणें, दारू पिणें किंवा मनुष्यांत आढळणाऱ्या कोणत्याही दुर्गुणापेक्षां मला कृतघ्नपणाचा ज्यास्त तिटकारा आहे.

अनंत०:—हर ! हर ! !

जमादार:—चला महाराज, चला आतां.

अनंत:—थांबा; मला थोडेंसें बोलूं द्या. हा जो तरुण आहे याला मीं मृत्यूच्या दाढेंतून केवळ प्रेमाच्या प्रेरणेनें सोडविलें आहे, आणि याच्या चेहऱ्यावरून हा फार थोर मनाचा असेल असें समजून मी याच्यावर निस्सीम प्रेम करीत होतों.

कोतवाल:—मग हें आम्हांला काय सांगतोस ? चल लवकर उशीर होतो.

अनंत:—हा मृगवेषधारी मारीचच ठरावाना ? सत्यव्रता ! देवानें दिलेल्या सौंदर्याला काळिमा लावलास. ईश्वरानें तुला मनाशिवाय सर्व गोष्टी चांगल्या दिल्या आहेत. दुष्टपणा हीच कुरूपता, आणि सद्गुण हेंच सौंदर्य; परंतु सुंदर असून दुष्ट असेल तर त्याला उपमा म्हणजे नक्षी केलेल्या कुजक्या लांकडाचीच.

कोतवाल:—ह्याला आतां वेड लागलें. चला याला घेऊन.

अनंत०:—चला तर मग.

[कोतवाल, जमादार यांसह जातो.]

विजया:—त्याच्या बोलण्यावरून तो अगदीं मनापासून बोलत होता असें वाटतें. पण त्यावर विश्वास बसूं शकत नाहीं. मला तो दादाच समजला असेल अशी माझी कल्पना होते. देव करो आणि ही माझी कल्पना खरी ठरो.

वंचक०:—सरदारसाहेब, इकडे या, फजीत्या तूंही ये. आपणही शिष्टसंमतनीतितत्त्वावर बोलूं.

विजया:—(एकीकडे) त्यानें सत्यव्रतदादाचें नांव घेतलें नाहीं ? मी आरशांत पाहूं लागलें कीं मी दादालाच बघतें आहें असें मला अजून वाटतें. चेहेऱ्यांत आणि आंगाच्या ठेवणींत अगदीं असाच; आणि त्याचा पोषाखही याच रंगाचा आणि याच तऱ्हेचा असे. जर त्यांचा समज खरा ठरला तर वादळें सुखावह आणि समुद्र दयार्द्र आहे असेंच म्हटलें पाहिजे. (जाते.)

वंचक०:—अगदींच क्षुद्र मनाचा आणि सशापेक्षांदेखील भित्रा पोरगा. आपल्या मित्राची ओळखदेखील विसरून त्याला संकटसमयीं सोडून देणारा नीच मनुष्य तो. त्याच्या भित्रेपणाबद्दल फजीत्याला विचारा.

फजीत्या:—त्याचा भित्रेपणा तर विचारूंच नका. अगदीं उघड उघड दिसतो, आणि तो भित्रेपणा हा एक गुणच समजतो.

सदा०:—ठीक आहे, तर मग मी आतां पुन्हां त्याच्या पाठोपाठ जातों आणि त्याला चांगला मार देतों.

वंचक०:—चांगला ठेंचा त्याला. पण तरवार काढण्याचें धैर्य मात्र करूं नका.

सदा०:—पहा काढतों कीं, नाहीं तें.

[जातो.]

फजीत्या:—चला आपण मजा पाहूं.

वंचक०:—कांहींसुद्धां मजा होणार नाहीं हें मी अगदीं पैजेवर सांगतों.

[जातात.]

अंक तिसरा समाप्त.

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

स्थळ—आनंदीच्या घरासमोर.

विनोद आणि सत्यव्रत येतात.

विनोद:—तुम्हांला घेऊन येण्याकरितां मला पाठविलें नाहीं, अशी माझी खात्री कराल काय ?

सत्य०:—चल जा. मूर्ख मनुष्य कोठला ! जा, माझ्यापासून दूर हो.

विनोद:—वा ! छान चालविलें आहे ! मी तुम्हांला ओळखीत नाहीं. बाईसाहेबांनीं आपल्याशीं बोलण्याकरतां, तुम्हांला घेऊन येण्याकरतां, कांहीं मला पाठविलें नाहीं, तुमचें नांवही कुसुमसेन नाहीं आणि हें (आपलें नाक दाखवून) नाकही पण माझें नाहीं. एवंच प्रत्येक वस्तु दिसते तशी कांहीं नाहीं.

सत्य०:—कृपा करून आपल्या शहाणपणाचें प्रदर्शन दुसरीकडे करा. मी कांहीं तुला ओळखीत नाहीं.

विनोद:—शहाणपणाचें प्रदर्शन ! आपण हे शब्द कोणातरी मोठ्या मनुष्याला लावलेले ऐकले असून ते आज मला वेड्याला लावीत आहां. शहाणपणाचें प्रदर्शन ! हें सारें जग आतां मूर्खच झालें म्हणायचें. कृपा

करून आपलें वेड टाका, आणि बाईसाहेबांना निरोप काय सांगूं तें मला कळवा. आपण येता म्हणून सांगूं ?

सत्य०:—अरे मूर्खा, येथून जा कसा. हे रुपये तुला बक्षीस घे. जर का आतां येथें रेंगाळलास तर मग मात्र निराळेंच बक्षीस द्यावें लागेल.

विनोद०:—खरोखरच आपण फार उदार दिसतां. आमच्यासारख्या विनोदी मस्कऱ्यांना जे पैसे देतात त्यांची कीर्ति होते. पण तिला किंमतही तशीच पडते.

[सदानंद, वंचक आणि फजीत्या प्रवेश करतात.]

सदा०:—अहो राव ! मीं तुम्हांला पुन्हां गांठलें आहे. हें घ्या बक्षीस. (मारतो.)

सत्य०:—(मारीत) आणि हें घ्या तुमचें बक्षीस. एक, दोन, तीन. काय इथले सर्वच लोक वेडे झाले आहेत कीं काय ?


वंचक०:—बस्स. जर तुम्ही आतां थांबणार नाहीं तर तुमची तरवार हिसकून घ्यावी लागेल.

विनोद:—मी आतां हें एकदम जाऊन बाईसाहेबांना सांगतों. मला एखाद्यानें मोठी थोरली रक्कम देऊं करून सांगितलें कीं " तूं वंचकराज किंवा सदानंदमहाराज हो " म्हणून तर मी तें मुळींच कबूल करणार नाहीं.

[जातो.]

वंचक०:—बस्स, पुरे करा महाराज.

सदा०:—नसेल ऐकत तर लढूं दे त्याला एकट्याला. या इंद्र-भुवनाच्या राज्यांत जर कांहीं कायद्याची सत्ता असेल तर मी आतां



आनंदी—काका थांबा; देवाची शपथ आहे तुम्हांला. [अं. ४ प्र. १ पृ. ११]

जाऊन याच्यावर फिर्याद करतों. मीं जरी त्याला अगोदर मारलें तरी तो कांहीं महत्वाचा मुद्दा नाहीं.

सत्य०:—चल सोड मला.

वंचक०:—नाहीं. मी नाहीं तुला सोडीत. अहो बडे योद्धे ठेवा ही आपली तरवार. आपण लढण्याला फार हापापलेले आहां तें आम्हांला ठाऊक आहे.

सत्य०:—मी तुमच्या हातून सुटणारच. (सोडवून) आतां तुम्ही काय करणार ? आतां जर का मला पुन्हां चिडवाल तर या माझ्या तरवारीशींच प्रसंग आहे लक्षांत ठेवा.

वंचक०:—काय ? असें आहे काय ? असें असेल तर मला तुमच्याशीं लढून तुमचें उसळणारें रक्त जमिनीवर पाडलेंच पाहिजे.

[आनंदी येते.]

आनंदी:—काका, थांबा. देवाची शपथ आहे तुम्हांला.

वंचक०:—आनंदी.

आनंदी:—तुमचें हें सदा असेंच चालणार वाटतें. रीतभात मुळींच माहीत नाहीं. अगदीं रानटी मनुष्यासारखे कींहो तुम्ही वागतां ! चला, व्हा माझ्या दृष्टीआड. (सत्यव्रतास) महाराज, आपण हें मनावर घेऊं नका. (वंचकराजास) तुम्हांला इथून जा म्हणतेंना ! (वंचक, सदानंद आणि फजीत्या जातात) (सत्यव्रतास) महाराज, आपण सुज्ञ आहां, तेव्हां मनोवृत्तींच्या स्वाधीन होऊन या यांच्या उद्दाम आणि अन्यायाच्या वर्तनानें आपले मनाची शांति कांहीं ढळूं देऊं नका. माझ्याबरोबर घरांत

चला, म्हणजे यांच्या निरर्थक भांडणांच्या गोष्टी आपल्याला सांगतें, त्या ऐकल्यात म्हणजे हें भांडण कांहींच नाहीं असें आपल्याला वाटेल. आढेवेढे घेण्याचें कांहीं कारण नाहीं चलाच. नाहीं म्हणूं नका. आपल्याशीं भांडण करून त्यांनीं माझें मन कसें अगदीं भयभीत करून सोडलें आहे.

सत्य०:—(स्वगत) याचा अर्थ तरी काय ? हा ओघ वाहतो आहे तरी कोणीकडे ? का मी वेडा झालों, कीं स्वप्नांत आहें ? असाच अनुभव मिळायचा असेल तर देवा ! मला असाच वेडा राहूं दे. अशींच सुखस्वप्नें पडणार असतील तर मला सदाच झोंप लागूं दे.

आनंदी:—महाराज आपण माझ्या मनाप्रमाणें वागाल का ? मला एकदां कळूं द्या.

सत्य०:—होय वागेन.

आनंदी:—ठीक आहे. आपल्या शब्दाप्रमाणें वागा तर मग.

(जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—आनंदीचें घर.

मालती:—मी म्हणतें कीं, ही शालजोडी पांघरा, आणि ही दाढी लावा म्हणजे मग मी तुम्हांला तपोनिधि वीरतत्त्व शास्त्रीच समजेन. हं, करा लवकर, तोंपर्यंत मी वंचकराजांना घेऊन येतें.

[जाते.]

विनोद:—ठीक आहे. मी हें सोंग घेतों, आणि त्याची वतावणी पण करतों. या जगांत शास्त्रीबोवांचें सोंग मीच पहिल्यानें घेत असतों तर किती चांगलें झालें असतें ! मी चांगला शास्त्री दिसण्यासारखा भव्य नाहीं, किंवा उत्तम पढीक विद्यार्थी शोभण्यासारखा किडकिडीतही नाहीं. परंतु विद्वान् आणि व्यवस्थित मनुष्य म्हणवून घेण्याइतकेंच, मी सचोटीचा आणि संसारदक्ष म्हणून घेणें मानाचें समजतों. पण तें असो. हे माझे सहाकारी आले.

वंचक व मालती प्रवेश करतात.

वंचक॰:—अहो वीरतत्त्वशास्त्री ! नमस्कार.

विनोद:—स्वस्त्यस्तु ते वंचकराज. वाराणशी क्षेत्रांतले प्राचीन अक्षरशत्रु प्रसिद्ध विष्णुपदाचार्य हे एक वेळ वंगराज प्रतापसेनमहाराज यांस म्हणाले कीं ‘ जें आहे तें आहे ’ याच नियमाप्रमाणें मी वीरतत्त्वशास्त्री आहें म्हणून वीरतत्त्वशास्त्री आहें, कारण ‘ जें ’ म्हणजे ‘ तें ’ ‘ आहे ’ म्हणजे ‘ आहे ’ कां असेंच कीं नाहीं ?

वंचक॰:—बरें पण शास्त्रीबोवा त्यांच्याकडे चला.

विनोद:—कोण आहे इथें या अंधारकोठडींत ? शांतिरस्तु अस्मिन् स्थाने.

वंचक॰:—बेट्यानें सोंग पण सोंग घेतलें आहे !

मदन॰:—(आंतून) कोण हांक मारतो आहे ?

विनोद:—बुद्धिभ्रष्ट मदनसेनाला भेटण्याकरतां मी वीरतत्त्वशास्त्री आलों आहें.

मदन॰:—शास्त्रीबोवा ! आपण आलांत ठीक झालें. आपण आधीं माझ्या बाईसाहेबांकडे जा.

विनोद:—अरे बदमाष पिशाच्चा ! सोड याला. या मनुष्याला तूं विनाकारण कां छळतोस ? स्त्रियांच्या शिवाय तुला बोलण्याला विषयच नाहीं वाटतें ?

वंचक०:—योग्य बोललांत शास्त्रीबोवा.

मदन०:—शास्त्रीबोवा ! कोण्याही मनुष्याला असें वाईट रीतीनें वागविलें नसेल. आपण मला वेडा समजूं नका. या सर्व मंडळींनीं मिळून मला या अंधारकोडींत कोंडून ठेवलें आहे.

विनोद:—अरे दुष्ट पिशाच्चा ! मीं प्रत्यक्ष सैतानाशीं देखील सभ्य रीतीनें वागावें अशा मताचा असल्यामुळें तुझ्याशीं इतक्या मऊ शब्दांनीं बोलतों आहें, समजलास. काय तुझें म्हणणें, ही कोठडी अंधारी आहे म्हणून ?


मदन०:—केवळ नरककुंड !

विनोद:—काय ? हे काळे पडदे लावलेल्या छपराजवळील झरोक्यांतून प्रकाश येत असून तूं इथें अंधार आहे म्हणतोस ?

मदन०:—शास्त्रीबोवा ! मला कांहीं वेड नाहीं लागलें. खरोखरच ही खोली अंधकारमय आहे.

विनोद:—वेड्या ! तूं चुकतोस. इथें अंधार असून अज्ञान भरलें आहे. हिमालयांतील लोक बर्फांत गुरफटतात त्यापेक्षां देखील तूं या अज्ञानांत गुरफटला आहेस.

मदन०:—अज्ञानासारखा अंधकार दुसरा कोणताच नाहीं, आणि आज्ञानांधकार म्हणजे केवळ नरकच. आज्ञानामुळेंच मला हा नरकवास प्राप्त झाला आहे. आपल्या व माझ्या बुद्धींत मुळींच फरक नाहीं. एखाद्या गहन विषयावर वाद करून खात्री करून घ्या हवी तर.



वंचक--वा शास्त्रीबोवा ! खूप मजा केलीत ! [अं. ४ प्र. २ पृ. १०३.]

विनोदः—पुनर्जन्मवादी तत्त्ववेत्त्यांचा घुबडाबद्दल काय अभिप्राय आहे.

मदन०:—त्यांच्या मतें मानवी आत्मा देखील कारणपरत्वें अशा नीच योनींत जन्म पावतो.

विनोदः—हें मत तुला कसें काय पटतें ?

मदन०:—मानवी आत्मा उच्च कोटींतून अशा नीच योनींत जाणें अशक्य व म्हणून हें मत ग्राह्य नाहीं असें माझें मत आहे.

विनोदः—ठीक आहे. तुला अजून या अंधकारांतच राहिलें पाहिजे. हें पुनर्जन्माचें तत्त्व तूं ग्राह्य समजशील तेव्हांच तूं शुद्धीवर आहेस असें म्हणतां येईल. नाहीं तर तूं या पक्ष्यांची शिकार—मानवी आत्मा दुखावशील तर अजून कांहीं वेळ तूं इथेंच रहा. मी जातों आतां.

मदन०:—शास्त्रीबोवा ! अहो शास्त्रीबोवा !

वंचक०:—वा शास्त्रीबोवा ! खूप मजा केलीत !

विनोदः—माझें काय हो ! जें काम सांगाल तें अगदीं हुबेहुब !

मालती:—तूं तर हें काम या दाढी-शालजोडीशिवाय देखील केलें असतेंस. त्याला कांहीं तूं दिसला नाहींस.

वंचक०:—आतां तूं त्याच्याकडे जाऊन आपल्या खऱ्या आवाजानें बोल, आणि तो तुझ्याशीं कसा काय वागतो तें मला कळीव. या प्रकरणां-तून आपण कसे नीट निभावूं असें मला झालें आहे. आनंदीच्या मर्जीतून मी इतका उतरलों आहें कीं, हें प्रकरण शेवटपर्यंत न चालविणें मला मोठें धोक्याचें आहे म्हणून आपल्यावर हें प्रकरण न उलटतां त्याला

जर सोडतां येईल तर फार चांगलें होईल असें मला वाटतें. चल तर माझ्याबरोबर आतां.

[वंचक व मालती जातात.]

विनोदः—(गात)' मित्रा मदना ! तव दयिता कैसी वागवितें तुजला ? '

मदन०:—कोण आहे ? विनोद.

विनोदः—' अतिनिर्घृणतेनें, ईश्वर साक्षीला. '

मदन०:—विनोद !

विनोदः—' ती असें कशास्तव करी ? '

मदन०:—विनोदा ! अरे विनोदा !

विनोदः—' ती मनें दुजाला वरी '—कोण हांका मारतो आहे ?

मदन०:—विनोदा कृपा करून मला एक दिवा, दऊत, लेखणी आणि कागद एवढें सामान आणून दे. मी तुझे हे उपकार विसरणार नाहीं. तुझ्यावर पूर्वीप्रमाणेंच प्रेम करीन.

विनोदः—कोण ? मदनसेन ?

मदन०:—होय; तोच मी.

विनोदः—आपली बुद्धि हो कशी एकदम नाहींशी झाली ?

मदन०:—विनोदा ! मला दुष्टपणानें वागवितात तसें कोणालाच वागवलें नसेल. तुझी बुद्धि जशी स्थिर आहे तशीच माझीही पण आहे.

विनोदः—माझ्यासारखीच तुमची बुद्धि ! मूर्खांच्या नि तुमच्या बुद्धींत फरक नाहीं म्हणतां ? तर मग तुम्ही खास वेडे आहां.

मदन०:—त्या गाढवांनीं मला या अंधारांत कोंडून ठेवलें, माझ्या वेडावर कांहीं उपचार करण्याकरतां शास्त्रीबोवांना आणलें आणि इतर सर्व तऱ्हेनें मला वेड लावण्याची वेळ आणली. एखाद्या निर्जीव वस्तूप्रमाणें त्यांनीं माझे हाल मांडले आहेत.

विनोद:—तुम्ही काय बोलतां आहां याचा विचार करा. शास्त्रीबोवा येथेंच आहेत. (शास्त्र्याच्या आवाजांत) मदनसेना ! ईश्वर तुझी भ्रष्ट बुद्धि पुनरपि ताळ्यावर आणो ! आपली ही व्यर्थ बडबड बंद कर, आणि जरा नीज म्हणजे तुला बरें वाटेल.

मदन०:—शास्त्रीबोवा !

विनोद:—(शास्त्री) अरे त्याच्याशीं आतां बोलूं नकोस (विनोद) कोण मी ? ठीक आहे, नाहीं बोलत. मदनसेन ! देव तुमच्यावर दया करो ! (शास्त्री) तथास्तु ! (विनोद) ठीक आपल्या सूचनेप्रमाणें वागतों.

मदन०:—विनोदा ! अरे विनोदा !

विनोद:—काय म्हणतां महाराज. जरा शांत व्हा. काय म्हणतां आपण ? आपल्याशीं बोलल्याबद्दल शास्त्रीबोवा माझ्यावर रागावले.

मदन०:—विनोदा ! मला दिवा आणि कागद तर आणून दे. मी या इंद्रभुवनांतल्या लोकांइतकाच शुद्धीवर आहें.

विनोद:—महाराज असें असतें तर किती तरी चांगलें झालें असतें.

मदन०:—वाटेल ती शपथ घेऊन सांगतों कीं मी शुद्धीवर आहें. मित्रा विनोदा ! दिवा, कागद आणि शाई घेऊन ये, आणि मी लिहून देतों तें बाईसाहेबांकडे घेऊन जा, आजपर्यंत तूं पुष्कळ पत्रांची नेआण केली असशील पण हें माझें पोंचवशील तर तुझें कोटकल्याण होईल.

विनोद:—बरें, मी हें सामान घेऊन येतों. पण तुम्ही खरोखरच वेडे नाहींत का ? मग काय हें तुम्हीं वेड पांघरलें होतेंत ?

मदन०:—मी तुला जीव तोडून सांगतों कीं मी वेडा नाहीं. माझ्या शब्दांवर विश्वास ठेव.

विनोद:—मी तुमच्याकरतां दौत, लेखणी, कागद वगैरे सामान घेऊन येतों. पण पत्रांत तुम्ही बुद्धिकौशल्य दाखविलेंत म्हणजे मग मी तुमच्या शब्दावर विश्वास ठेवीन. तोंपर्यंत नाहीं.

मदन०:—मी तुला याबद्दल चांगलें बक्षीस देईन. जा तर मग लौकर.

विनोद:—(गातो.)

पद.

अतां मी जातों । सत्वरीं परतुनी येतों ॥ ध्रु० ॥

ह्याच विदूषक अभिनय गानीं । रंगदेवता प्रसन्न करुनी ।
हास्यवादनीं छुमछुम नर्तनीं । जनमनें हरुनि बघ नेतो ॥१॥
डोईवर निंबाचा पाला । घेउनि म्हणतो मुकुट लाभला ।
स्वानंदीं जो पूर्ण रंगला । ही ही विकट हास्य करितो ॥ २ ॥
वेड्यापरि तूं तोंवरि राहीं । दुःखभार शिरिं पळभर वाहीं ।
उपाय याला उरला नाहीं । लवकरीं मुक्तता करितों ॥ ३ ॥

[पडदा पडतो.]

प्रवेश तिसरा.

स्थळ—आनंदीचा बाग.

सत्यव्रत प्रवेश करतो.

सत्य०:—हा वारा वाहतो आहे. दैदीप्यमान सूर्य प्रकाशत आहे. हीच आंगठी तिनें मला दिली आहे. मी तिला स्पर्श करूं शकतों. मी आश्चर्यानें चकित झालों असलों तरी वेडा कांहीं नाहीं. बरें पण अनंतसेन कोठें आहे ? तो मला बिऱ्हाडीं भेटला नाहीं. पण तो तेथें गेला होता आणि तो शोधण्याकरतां गांवांत फिरायला गेला असेंही मला तेथेंच कळलें. अशा वेळीं त्याचा सल्ला माझ्या फार उपयोगीं पडला असता. मी अनुभवतों आहें हें वेडेपणांत कांहीं नाहीं. ही कांहीं तरी चूक असावी असें माझें मन मला सांगतें आहे. असें आहे तरी हा अनुभव आणि दैवाचें वारें कल्पनातीत आहे याची तोड सांपडणार नाहीं. ही बाई तरी वेडी असावी किंवा मला तरी वेड लागलें असावें असें मला वाटतें, आणि खरा स्थिति याच्या उलट आहे तरी तिच्यावर माझा विश्वास बसणें कठिण दिसतें. जर तिला वेडी म्हणावें तर ती आपला गृहकृत्यभार कसा नीट रीतीनें वाहते, नोकराचाकरांवर दरारा ठेवते, आणि एकंदर कारभार ऐकून घेऊन त्यांवर शांत रीतीनें आणि शहाणपणानें हुकूम चालविते असें जें मीं पाहिलें तें शक्य कसें झालें असतें ? यांत कांहीं तरी गौडबंगाल आहे. बरें, पण ती बाईच इकडे येत आहे.

(आनंदी व एक भटजी प्रवेश करतो.)

आनंदी:—माझ्या घाईबद्दल मला दोष देऊं नका. आपल्या मनांत

खरोखरच माझें पाणिग्रहण करावयाचें असेल तर माझें मन विश्वास पटून शांत रहावें याकरतां माझ्या बरोबर शिवालयांत चला. तेथें या भटजींच्या व देवाच्या समक्ष आपण शपथा घेऊं. माझ्या योग्यतेला साजेल अशा रीतीनें मग आपलें लग्न होईल. तोंपर्यंत ही गोष्ट अगदीं गुप्त ठेवतील याबद्दल निःशंक असा. आपलें मत काय आहे ?

सत्य०:—तुमच्या इच्छेप्रमाणें मी यांच्याबरोबर चलतों व देवासमक्ष शपथ घेतों, आणि शपथेप्रमाणें सदोदित वागेन असें तुम्हांला आश्वासन देतों.

आनंदी:—भटजी चला. ईश्वरा ! आम्हांकडे कृपादृष्टीनें पहा.

(पडदा पडतो.)

अंक चवथा समाप्त.

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळ—आनंदीच्या घरासमोर.

फजीत्या व विनोद प्रवेश करितात.

फजीत्या:—तूं माझा दोस्त आहेस ना ? मग मला त्याचें पत्र पाहूं दे.

विनोद:—फजीतराव ! माझी एक विनंती ऐकतोस का ?

फजीत्या:—वाटेल ती.

विनोद:—मग हें पत्र पहायला मागूं नकोस.

फजीत्या:—वा ! खूप ! दिलेलें दान परत मागण्यापैकींच हा प्रकार.

(प्रेमानंद, विजया, केशव व इतर सरदार प्र. क.).

प्रेमा०:—तुम्ही आनंदीबाईच्या लोकांपैकीं आहांत काय ?

विनोद:—होय महाराज ! आम्ही त्यांचे सेवक आहोंत.

प्रेमा०:—अरे ! मी तर तुला चांगला ओळखतों. कसें काय चाललें आहे ?

विनोद:—वा ! उत्तम. शत्रूंशीं मित्राप्रमाणें आणि मित्रांशीं शत्रू-प्रमाणें चालतों.

प्रेमा०:—छे ! उलट बोललास. मित्रांशीं गोड रीतीनें वागतोस.

विनोद:—अगदींच नाहीं. मित्रांशीं तर हाडवैऱ्याप्रमाणें वागतों.

प्रेमा०:—तें कारे बोवा ?

विनोद:—महाराज याचें कारण असें आहे कीं, जे माझे मित्र असतात ते माझी स्तुति करून मला गाढव बनवितात, आणि शत्रु जे आहेत ते मी गाढव आहें म्हणून सांगतात, आणि त्यामुळें मला माझें खरें ज्ञान होतें आणि मी शहाणा होतों. मित्र ते शत्रु आणि शत्रु ते मित्र असा जर शास्त्रसिद्धांत आहे तर मित्रांशीं शत्रूंप्रमाणें आणि शत्रूंशीं मित्रांप्रमाणें वागतों हें ठीक करतों कीं नाहीं ?

प्रेमा०:—वा ! फार योग्य !

विनोद:—आपण माझे मित्र होणार असलां तर तें मला मुळींच पसंत नाहीं.

प्रेमा०:—मी मित्र झालों तरी तूं माझ्याशीं वाईट रीतीनें वागणार नाहींस अशी मला खात्री आहे. हें घे तुला बक्षीस.

[बक्षीस देतो.]

विनोद०:—माझ्या वर्तनाला जर आपण दुटप्पी म्हणणार नाहीं तर ही रक्कम दुप्पट करा असें मी म्हणेन.

प्रेमा०:—हा तुझा उपदेश फार अहितकारक आहे.

विनोद:—आपलें सदयहृदय उचंबळूं द्या, आणि आपल्या हातांना खिशांत जाण्याची आज्ञा करा.

प्रेमा०:—हे घे आणखी. ह्यालाच जर लोक नांवें ठेवीत असतील तर तेवढें पातक मी करतों.

विनोदः—एक, दोन, तीन हे खेळांत देखील उपयोगांत आणतात. कोणतीही गोष्ट तीनदां झाली म्हणजे ती पक्की होते म्हणतात. कोणत्याही गोष्टीचा त्रिवार उच्चार झाला म्हणजे ती सत्य समजली जाते. म्हणून म्हणतों आपणही इकडे लक्ष पुरवा. एक, दोन, तीन.

प्रेमा०:—अशा मस्करीनें माझ्यापासून तुला आतां कांहीं ज्यास्त मिळणार नाहीं. घरांत जाऊन आपल्या धनिणीला मीं तिच्याशीं बोलावें म्हणून आलों आहें असें सांगून जर तूं तिला आपल्याबरोबर घेऊन येशील तर मग तुला कांहीं मिळण्याचा संभव आहे.

विनोदः—महाराज ! मी परत येईपर्यंत आपल्या औदार्याला अंगाई करूं द्या. मी आपल्याला इनाम मागतों तें लोभानें मागून पातक करतों आहें असें मात्र आपण समजूं नका. मी येईपर्यंत आपल्या दातृत्वाला निद्रासुखानुभव घेऊं द्या, मी आलों कीं त्याला जागें करतों.

[जातो.]

विजयाः—मला ज्यानें सोडविलें तोच इकडे येतो आहे.

(अनंतसेन व कोतवाल प्र० क०).

प्रेमा०:—अरे, हा मनुष्य तर माझ्या चांगल्या ओळखीचा आहे. पण मागें जेव्हां मीं याला पाहिला तेव्हां हा लढाईतल्या धुरानें अगदीं यमासारखा काळा दिसत होता. तेव्हां हा एका जहाजाचा अधिपति होता, पण त्या वेळीं आपल्या त्या छोटेखानी जहाजानें यानें आमच्या आरामारांतील सर्वांत मोठ्या जहाजावर असा हल्ला केला कीं, त्या वेळीं याच्या हातून पराभूत झालेले आणि याच्या शौर्यामुळें असूया उत्पन्न

झालेले आमचे सरदार देखील याची कीर्ति गाऊं लागले. बरें पण आतांचा हा काय खटला आहे ?

कोतवाल:—महाराज ! आपल्या दर्याशूर नांवाच्या जहाजाचा पाडाव करून त्यावरील सर्व माल ज्यानें लुटला, आणि आपल्या 'शार्दुल' जहाजावर हल्ला करून आपले पुतणे जयवंत सरदारांना ज्यानें घायाळ केलें तोच हा अनंतसेन. हा लाजलज्जा सोडून आणि कायद्याला न जुमानतां कांहीं खाजगी कारणावरून भररस्त्यावर भांडत असतांना आम्हीं याला कैद करून आणलें आहे.

विजया०:—यांनीं आज माझ्या संरक्षणाकरितां तरवारीस हात घालून माझ्यावर दया केली. पण शेवटीं हे माझ्याशीं कांहीं विचित्र बोलूं लागले. मला त्याचा अर्थच समजेना. मला तें वेडच वाटलें.

प्रेमा०:—अरे बदमाष चांच्या ! लुटारू ! भयंकर आगळीक करून आणि रक्तपात करून ज्यांचें तूं शत्रुत्व संपादन केलेंस, त्यांच्या तावडींत आज तूं कसा सांपडलास ?

अनंत०:—महाराज ! आपण मला जीं नांवें दिलींत तीं अगदीं अनाठायीं आणि व्यर्थ दिलींत असें मला वाटतें. मी आपला शत्रु आहें हें जरी खरें आहे तरी पण मी चांच्याचें अथवा लुटारूंचें काम आजपर्यंत कधींच केलें नाहीं. आपल्याजवळ उभ्या असलेल्या कृतघ्न मुलाला मीं बेफाम झालेल्या समुद्राच्या भयंकर फेंसाळ लाटांच्या तडाख्यांतून सोडविलें आहे, आणि याच्याच मोहिनीनें मोहित करून मला इथें आणलें. याची आशा सुटली होती तेथून काढून याला मीं जीवदान दिलें, आणि मीं आपलें प्रेमसर्वस्व याला अर्पण केलें. केवळ याच्यावरील

प्रेमामुळेंच मीं या शत्रूच्या नगरांत फिरून आपला जीव धोक्यांत घातला याच्यावर लोकांनीं हल्ला केला तेव्हां याच्याच रक्षणाकरितां मीं तरवारीला हात घातला. त्या वेळीं मला कैद केलें. माझ्या संकटाचा भागीदार न होण्याच्या दुष्ट बुद्धीनें याला माझी ओळख देखील विसरावयाला लाविलें आणि एका क्षणांत ह्याची माझी ओळख कित्येक वर्षांची जुनी होऊन नाहींशी झाली. याच्या उपयोगीं पडावें म्हणून थोड्या वेळापूर्वीं याच्या स्वाधीन केलेले माझेच पैसे या वेळीं देण्यास नाकबूल झाला.

विजया:—हें शक्य तरी आहे का ?

प्रेमा०:—हा या शहरांत केव्हां आला ?

अनंत०:—आजच महाराज. पण गेल्या तीन महिन्यांपासून रात्रं-दिवस आम्ही एकत्र रहात होतों. एक क्षणभर देखील एकमेकांस विसंबलों नाहीं.

[आनंदी व तिचे नोकर प्र० क०].

प्रेमानंद:—ही आनंदी येत आहे पहा. या पृथ्वीतलावर ही कोणी देवताच चालत येत आहे ! तुझे शब्द अगदीं मूर्खपणाचे आहेत. हा गेल्या तीन महिन्यांपासून माझ्याजवळ आहे. बरें, तुझें आणखी कांहीं म्हणणें असेल तर तें मग ऐकूं. चला याला बाजूला घेऊन जा.

आनंदी:—महाराजांची काय आज्ञा आहे ? मी आपली कोणती कामगिरी करूं ? कुसुमसेन ! आपण मला दिलेलें वचन पाळलें नाहींत !

विजया:—कोणतें वचन बाईसाहेब ?

प्रेमा०:—आनंदी !

आनंदीः—(कुसुमसेनास) आपण काय म्हणतां ? (प्रेमानंदास) आपली काय आज्ञा आहे.

विजयाः—महाराजच आधीं बोलतील. मीं मागून बोलावें हेंच माझ्या योग्यतेला योग्य.

आनंदीः—महाराज ! आपण पूर्वीच्याच गोष्टीबद्दल बोलणार असाल तर व्यर्थ श्रम घेऊं नका. उत्तम गाण्यानंतर भेसुर आवाज ज्याप्रमाणें कर्णकटु भासतो त्याप्रमाणेंच त्या गोष्टीबद्दल बोलण्याचा मला कंटाळा आहे.

प्रेमा०:—अजूनही निष्ठुरच आहेसना ?

आनंदीः—आपणही आपला आग्रह सोडीत नाहीं ना ?

प्रेमा०:—काय ? तुझ्या निष्ठुरपणाचा अतिरेक झाला तरी हरकत नाहीं ? हे कृतघ्न निर्दयदेवते, तुझ्या चरणावर आजपर्यंत प्रेमाला देण्यासारख्या सर्व उत्तम गोष्टी मीं अर्पण केल्या तरी त्याचें तुला कांहींच नाहींना आतां आणखी काय करूं तें तरी सांग.

आनंदीः—आपल्यास जे आवडेल व योग्य दिसेल तें करण्यास आपण समर्थ आहां.

प्रेमा०:—मला तुझ्या मनांतील प्रेमस्थानापासून दूर करण्यास कोण कारण आहे हेंही मला थोडेंसें कळलें आहे प्राचीन रजपुतांसारखें माझें मन कठोर असतें तर मरणसमयीं मी देखील आपल्या प्रेमविषयाचा जोहार करून ज्या निष्ठुर कृत्याला लोक उदात्त म्हणतात तें केलें असतें परंतु ज्या अर्थी तूं माझ्या प्रेमाला तुच्छ समजतेस त्या अर्थी तूं अशीच दगडाप्रमाणें कठोरच जिवंत रहा. हा तुझा प्रेमविषय आहे, यावर तूं प्रेम करतेस आणि माझेंही याच्यावर प्रेम आहे हें मी शपथपूर्वक

सांगतों. हा तुझ्या हृदयाचा अधिष्ठाता झाल्यामुळें मला फार दुःख होत आहे, आणि म्हणून मी याला तुझ्या दृष्टीआड करतों. 'चल, कुसुमसेना ये. दुष्टपणा करण्यास माझें मन कसें अगदीं उत्सुक झालें आहे. या सुंदर रूपधारी दुष्ट राक्षसीला त्रास न व्हावा. म्हणून मी या माझ्या लाडक्या बालकाचा नाश करतों.

विजया:—आपल्याला सुख व्हावें म्हणून मी मोठ्या आनंदानें एकदांच काय पण हजारदां देखील मरण्यास तयार होईन.

आनंदी:—(कुसुमसेनास) महाराज, आपण कोणीकडे चाललां ?

विजया:—या तुझ्या प्रेमपूर्ण नमनापेक्षां ज्यांच्यावर माझें ज्यास्त प्रेम आहे, इतकेंच काय पण प्रत्यक्ष माझ्या पत्नीवरदेखील माझें प्रेम असूं शकणार नाहीं, इतकें माझें ज्याच्यावर प्रेम आहे त्यांच्यावरोवर मी जात आहें. माझे हे शब्द जर असत्य असतील तर या माझ्या प्रेमवचनांबद्दल हे आकाशस्थ देवतांनो मला वाटेल ती शिक्षा करा.

आनंदी:—हे हतभागिनी ! तूं कशी फसलीस ?

विजया:—तुला कोणीं फसविलें ? तुला दुःख कोणीं दिलें ?

आनंदी:—आपण स्वतांची कृतीच विसरतां काय ? फार वेळ झाला कां तिला ? भटजींना बोलावूं का ?

प्रेमा०:—कुसुमसेना चल.

आनंदी:—या आपल्या भावी पत्नीला सोडून कुठें जातां महाराज ?

प्रेमा०:—भावी पत्नी !

आनंदी:—होय महाराज. ते तरी नाकबूल जातील काय ?

प्रेमा०:—काय तूं इचा पति होणार ?

विजया:—नाहीं महाराज; मुळींच नाहीं.

आनंदी:—आपण आपली खरी स्थिति प्रकट करण्यास भितां हा आपला कमकुवतपणा आहे. आपण मुळींच भिऊं नका. आपल्याला प्राप्त होणाऱ्या वैभवाचा स्वीकार करा. आपण आहांत तसे दाखवा म्हणजे ज्यांना आपण भीत आहां, त्यांच्याच बरोबरीचे आपण आहां असें आपणांस दिसेल.

[भटजी येतात.]

यावें भटजी. यांच्या आणि माझ्यामधें नुकत्याच झालेल्या आणा शपथा योग्य समय प्राप्त होईपर्यंत जरी प्रकट करावयाच्या नव्हत्या, व अजूनही जरी त्यांची प्रकट होण्याची वेळ आली नाहीं तरी पण आपण त्या या वेळीं सांगा. आपल्यास त्या ठाऊकच आहेत. आपल्यास आपल्या थोरपणाची आठवण देऊन त्या या वेळीं सांगण्याची मी विनंती करतें.

भटजी:—अखंड प्रेमाची खूणगांठ म्हणून आपण परस्परांनीं आपले हात मिळविलेत व आपल्या आंगठ्यांची अदलाबदल करून त्या गांठीला बळकटी आणलीत. या सर्व गोष्टी देवद्विजांसमक्ष झाल्या असून त्याचा शास्त्रोक्तविधि मींच केला आहे. या गोष्टीला फार वेळ झाला नसून, तेव्हांपासून माझ्या आयुष्य क्रमणाच्या फक्त दोनच घटका गेल्या आहेत.

प्रेमा०:—हा दुष्टा ! आतांच जर तूं इतका लुच्चा आहेस तर तुझे केस पांढरे होतील तेव्हां वयोमानाप्रमाणें तुझा लुच्चेपणाही वाढेल का ? पण मला वाटतें तूं वृद्ध होण्यापूर्वींच दुसऱ्यांशीं केलेल्या दुष्टपणाला

स्वतांच बळी पडशील. जा; तिचा स्वीकार कर; पण पुनरपि माझी आणि तुझी भेट होणार नाहीं अशा दूर प्रदेशीं चालता हो.

विजया:—महाराज ! मी शपथपूर्वक—

आनंदी:—हं शपथ घेऊं नका. आपल्याला भीतीनें पछाडलें असलें तरी सत्य सोडूं नका.

[सदानंद येतो.]

सदा०:—वंचकराजाकडे लवकर एकादा वैद्य धाडा.

आनंदी:—काय, झालें तरी काय असें ?

सदा०:—काय, काय ? त्यानें माझ्या डोक्याचीं दोन शकलें केलीन् आणि त्यांचे मस्तक तर अगदीं रक्तबंबाळ करून सोडलेन, म्हणून म्हणतों शस्त्रवैद्याला लवकर बोलावा. अशा संकटांत पडण्यापेक्षां घरीं जर सुखरूप असतों तर लाख रुपयांची गोष्ट झाली असती.

आनंदी:—पण हें केलें कुणी ? तो कोण ?

सदा०:—तो राजेसाहेबांचा आश्रित कुसुमसेन त्यानें. आम्हांला तो अगदीं भित्रा असेल असें वाटलें होतें पण तो तर साक्षात् सैतानच दिसला.

प्रेमा०:—माझा कुसुमसेन ?

सदा०:—अरे बापरे ! तो तर इथेंच आहे. तुम्हींच माझें विनाकारण डोकें फोडलेंत. मीं तुमच्यावर हल्ला केला, पण तो केवळ वंचकराजांच्या सांगीवरून.

विजया:—तुम्ही मला कां म्हणतां ? मीं कांहीं तुम्हांला दुखापत केली नाहीं. तुम्हींच विनाकारण माझ्यावर तरवार उपसलीत, पण मी

तुमच्याशीं गोड बोलून भांडण विकोपाला नेलें नाहीं, आणि तुमच्यावर वारही केला नाहीं.

सदा०:—डोकें फोडणें हें तुमच्या दृष्टीनें कांहींच नव्हे असें वाटतें. डोकें फोडणें म्हणजे जखम करणें असेल तर तुम्हीं मला जखम केलीत हें खास.

[वंचक व विनोद प्रवेश करतो.]

हे पहा, वंचकराज लंगडतच इकडे येत आहेत ते आतां इत्थंभूत हकीकत सांगतील. ते जर दारूच्या धुंदींत नसते, तर त्यांनीं तुम्हांला चांगलाच हात दाखविला असता.

प्रेमा०:—कसें काय वंचकराज ? आतां आपली प्रकृति काय म्हणते ?

वंचक०:—ठीक आहे. त्यानें मला दुखापत केली आणि तिथेंच त्या गोष्टीचा शेवट झाला. ए गध्या ! वैद्याकडे गेला होतास का ?

विनोद:—होय महाराज ! पण ते दारू पिऊन पडले होते. सकाळचे आठ वाजले तरी देखील त्यांचे डोळे उघडत ना.

वंचक०:—पक्का बदमाष आहे म्हणायचा. दारूबाज चोर ! मला या दारूबाज लोकांचा फार तिटकारा आहे.

आनंदी:—जा यांना घेऊन. हा भयंकर प्रकार कोणीं केला ?

सदा०:—चला वंचकराज ! आपल्या दोघांच्या जखमा बरोबरच बांधायच्या आहेत, तर चला आपण एकदमच जाऊं. हा घ्या मी तुम्हांला हात देतों.



अनंतसेन--सत्यव्रत कोण? हा कीं तूं? [अं. ५ प्र. १ पृ. ११९]

वंचक०:—ए गध्द्या ! मूर्ख, पाजी, दारूबाज, पाप्याचें पितर ! तूं का मला हात देणार ?

आनंदीः—जा, त्यांच्या जखमा बांधण्याची व्यवस्था करा. जरा त्यांना नेऊन निजवा म्हणजे त्यांना बरें वाटेल.

[वंचक, सदानंद, विनोद व फजीत्या जातात. सत्यव्रत येतो.]

सत्य०:—(आनंदीस) आनंदी, तुझ्या काकांना माझ्या हातून दुखापत झाली याबद्दल मला फार वाईट वाटतें. माझा सख्खा भाऊ असता तरी देखील स्वसंरक्षणाकरतां अशा प्रसंगीं याशिवाय अन्यमार्गच नव्हता, पण तूं माझ्याकडे अशी तिरस्कार दृष्टीनें कां बघतेस ? आपण कनुत्याच घेतलेल्या शपथांना स्मरून तरी मला तूं क्षमा कर.

प्रेमा०:—चेहरा हुबेहुब. आवाज एक, पोषाख सारखा आणि पुरुष मात्र दोन ! दोघे एकच दिसतात, पण भिन्न आहेत. एकाच्याच दोन प्रातिमा, दोन म्हणावे कीं एक ?

सत्य०:—अनंतराव ! अहो प्रिय अनंतराव ! (भेटतात.) तुमची माझी चुकामुक झाल्यापासून माझ्यावर काय काय प्रसंग आले, आणि कसे कसे माझे हाल झाले म्हणून सांगूं !

अनंत०:—काय तूंच सत्यव्रत आहेस ?

सत्य०:—अजूनही तुम्हांला संशयच काय ?

अनंत०:—अरे तूं आपले दोन भाग अगदीं बरोबर करून एका सत्यव्रताचे दोन सत्यव्रत कसे केलेस ? एका सफरदळाचे बरोबर दोन भाग केले तरी ते देखील या दोन गृहस्थांइतके सारखे असणार नाहींत. सत्यव्रत कोण हा कीं तूं ?

आनंदीः—काय हा चमत्कार !

सत्य०ः—काय मी तेथेंही उभा आहें ? मला भाऊ नाहीं, किंवा एकाच वेळीं अनेक रूपें घेण्याचें दैवी सामर्थ्यही माझ्यांत नाहीं. मला एक बहीण होती. पण ती भयंकर तुफानाच्या भक्ष्यस्थानीं पडली. आपलें माझें कांहीं नातें असल्यास कृपा करून तें मला सांगाल काय ? आपला देश कोणता ? आपलें नांव काय ? आपण कोणत्या भाग्यवानाच्या पोटीं जन्म घेतलात ? हें मला कृपा करून सांगाल तर फार मेहेरबानी होईल.

विजयाः—मलंग हा माझा देश. सत्यशील हें माझ्या वडिलांचें नांव. सत्यव्रत नांवाचा मला एक भाऊ होता. तो असाच पोषाख घालीत असे, आणि अशा पोषाखांत असतांनाच तो समुद्रांत बुडला. मृत प्राण्याला जर नष्ट देह व पोषाख पुन्हां घेतां येत असतील तर आपणच माझ्या भावाच्या रूपानें आम्हांस भेवडावयास आलां असलां पाहिजे.

सत्य०ः—मी देहधारी पिशाच्च नसून मनुष्यच्च आहे. हा देह मला माझ्या आईकडून मिळाला आहे. सर्व गोष्टी जुळतात त्याप्रमाणें जर आपण स्त्री असतां मी आपल्याला माझी समुद्रभक्षित विजयाताईच्च मिळाली असें समजून प्रेमानें भेटलों असतों, व प्रेमाश्रूंनीं आपल्याला न्हाऊं घातलें असतें.

विजयाः—माझ्या बाबांच्या उजव्याभिवईवर एक तीळ होता.

सत्य०ः—तसाच माझ्या बाबांच्याही पण होता.

विजयाः—आणि विजयेच्या वयाचीं तेरा वर्षें भरलीं त्याच दिवशीं त्यांनीं स्वर्गलोकीं प्रयाण केलें.

सत्य०ः—तो प्रसंग अजून देखील मूर्तिमंत माझ्या दृष्टीसमोर आहे

माझ्या बहिणीचें तेरावें वर्ष संपलें त्याच दिवशीं त्यांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली.

विजयाः—माझें हें वेषांतरच जर आपल्या दोघांच्या सुखाच्या आड येत असेल तर काल, वेळ व अनुकूल दैव यांचा संयोग होऊन मी विजयाच आहें असें ठरेपर्यंत तुम्ही भेटूं नका. माझा स्त्री-वेष मीं येथीलच एका नौकापतीजवळ ठेवला आहे त्या[illegible] घेऊन येतें म्हणजे सर्व शंका निवारण होऊन मी स्त्रीच असल्याबद्दल खात्री होईल. या नौकापती-च्याच मदतीनें मी महाराजांची सेवा करण्यास जगलें. तेव्हांपासून माझा आयुष्यक्रम यांची व या बाईची सेवा करण्यांतच गेला आहे.

सत्य०:—(आनंदीस) आनंदी, तुझी ही अशी चूक झाली पहा. पण देवानेंच ही केली. नाहीं तर एका कुमारिकेबरोबर तुझें लग्न लागलें असतें. पण आतांही तुझें कांहीं नुकसान झालें आहे असें नाहीं. कारण एका कुमाराबरोबर तुझें आतां लग्न ठरलें आहे.

प्रेमा०:—वाईट वाटण्याचें यांत कांहींच कारण नाहीं. हाही कुलीन आहे. हे दोघे खरोखरच जर भिन्न असतील तर या एकंदर सुखपरिणामी वादळापासून मलाही सुखाचा अंश प्राप्त होणार आहे. (विजयेस) मुला! माझ्यावर तुझें प्रेम आहे तसें कोणत्याही स्त्रीवर तूं करूं शकणार नाहींस असें मला तूं हजारदां सांगितलें आहेस.

विजयाः—होय. आणखीदेखील तेंच सांगतें. रात्र आणि दिवस असे कालाचे भाग करणाऱ्या भगवान् सूर्यनारायणाप्रमाणें मी देखील आपले शब्द खरे करण्यांत स्थिर राहीन.

प्रेमा०:—तर मग मला तुझें पाणिग्रहण करूं दे. आतां एकदां तुला आपल्या स्त्रीवेषांत मला पाहूं दे.

विजया:—ज्या नौकापतीनें माझे प्राण वांचवून माझे पाय भुईला लावले त्याच्याजवळ माझा स्त्रीवेष आहे. आनंदीबाईचे कारभारी मदनसेन यांच्या बरोबर त्यांचें भांडण झालें व त्याबद्दल मदनसेन यांनीं फिर्याद केल्यावरून ते सध्यां बंदिवासांत आहेत.

आनंदी:—मदनसेन आपली फिर्याद काढून घेऊन त्यांना मुक्त करतील.

प्रेमा०:—(विजयेस) तूं आतां हा वेष टाकून आपला खरा वेष घेऊन ये पाहूं.

[विजया जाते.]

आनंदी:—जा, मदनसेनांना इकडे घेऊन या. अरेरे! गरीब विचारा! वेडा झाला आहे असें लोक म्हणतात.

[फजीत्या आणि पत्र घेतलेला विनोद प्रवेश करतो.]

माझ्या स्वतांच्या प्रेमविचारांतच माझें सर्व मन गुंतून गेल्यामुळें मला त्यांची मुळींच आठवण राहिली नाहीं. कारे बाबा! मदनसेनांची प्रकृति कशी काय आहे?

विनोद:—त्यांच्या स्थितींतल्या कोणाही शहाण्या मनुष्याप्रमाणें ते भूतबाधेपासून अलिप्त आहेत. हें पहा त्यांनीं आपल्याला पत्र पाठविलें आहे. हें मीं आपल्याला आज मघांच द्यायला पाहिजे होतें, पण वेड्याचें पत्र असुकच वेळेला दिलें पाहिजे असें नसल्यामुळें तें केव्हांही दिलें तरी त्यांत कांहीं बिघडत नाहीं.

आनंदी:—उघड आणि वाच पाहूं तें.

विनोद:—वेड्याचें मनोगत मूर्खाच्या तोंडून ऐकून आपल्या शहाण-

पणांत भर पडेल हें खास समजा. (वाचतो) ' ईश्वरस्मरणपूर्वक बाई-साहेबांस—

आनंदीः—हें काय ? तुलाही वेड लागलें कीं काय ?

विनोदः—नाहीं बाईसाहेब. मी वेड्याचे विचार वेड्याप्रमाणें फक्त वाचून दाखवीत आहें. वेड्यानें लिहिलेलें पत्र योग्य तऱ्हेनें वाचून ऐकावयाचें असेल तर हें असें मोठ्यानें वाचण्याची आपण परवानगी दिलीच पाहिजे.

आनंदीः—बाबा ! शहाण्याप्रमाणें वाच जरा.

विनोदः—हे देवी ! मी तरी तसेंच करतों आहें. परंतु त्याचें हृद्गत समजून घ्यायचें म्हटलें म्हणजे हें असेंच वाचलें पाहिजे. म्हणून म्हणतों आपण आतां कृपा करून लक्ष द्या.

आनंदीः—(फजीत्यास) तूं वाच रे आतां.

फजीत्याः—(वाचतो) " ईश्वरस्मरणपूर्वक बाईसाहेबांस कळवितों कीं, आपण मला फार वाईट रीतीनें वागवीत आहां, आणि हें जगाला कळल्याशिवाय राहणार नाहीं. आपण मला अंधार कोठडींत कोंडून ठेवलें आहे व दारूच्या धुंदींत असणाऱ्या आपल्या काकासाहेबांस माझ्या-वर देखरेख ठेवण्यास सांगितलें आहे, तरी मी आपल्याइतकाच शुद्धींत आहें. मीं पोषाख केला होता त्याला कारण आपलेंच पत्र; व त्या पत्रानें मला आपलें कल्याण करून घेतां येईल किंवा आपली फजीति तरी करतां येईल याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. माझ्याबद्दल वाटेल तें समजा. मला आपण इतकें दुखविलें असल्यामुळेंच मला आपली कर्त-व्याची मर्यादा सोडून असें स्पष्ट लिहावें लागत आहे.

आपण वेड्याप्रमाणें वागविलेला—**मदनसेन.**

आनंदीः—हें त्यांनींच लिहिलें काय ?

विनोदः—होय, बाईसाहेब !

प्रेमा०:—यांत वेडेपणाची झांक देखील नाहीं.

आनंदीः—फजीत्या ! जा. त्यांना मोकळें कर आणि इकडे घेऊन ये. (फजीत्या जातो.) महाराज ! या आतांपर्यंत घडलेल्या एकंदर गोष्टींचा विचार केला असतां आपण माझ्यावर पत्नी समजून प्रेम करणार होतां तेंच प्रेम आतां मला आपली बहीण समजून कराल अशी आशा आहे. आणि हें नवीन नातें आपल्या इच्छेप्रमाणें शास्त्रोक्त रीतीनें लवकरच दृढ करूं.

प्रेमा०:—आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास मी मोठ्या प्रेमानें तयार आहें.

(मदनसेनाला घेऊन फजीत्या येतो.)

हाच का तो वेडा ?

आनंदीः—होय, हाच तो. आतां कसें काय आहे मदनसेन ?

मदन०:—बाईसाहेब, आपण मला फार दुखविलें आहे.

आनंदीः—खरेंच का ? मला नाहीं वाटत मीं तुम्हांला दुखविलें आहे असं.

मदन०:—होय. दुखविलें आहे आपण. आपण हें पत्र वाचा. हें आपलें अक्षर नाहीं असें कांहीं आपण म्हणूं शकणार नाहीं. यांतल्या अक्षरापेक्षां किंवा भाषासरणीपेक्षां निराळ्या तऱ्हेनें लिहा, किंवा हा शिक्का किंवा हा मजकूर आपला नाहीं असें म्हणा. आपण यापैकीं कांहीं देखील

म्हणूं शकणार नाहीं. जर आपल्याला हें सर्व कबूल आहे तर मग आपण आपल्या प्रेमाची अशी स्पष्ट खूण कशी दिलीत, हंसत राहण्याची, पिवळे मोजे घालून त्यांवर पट्टे बांधण्याची, आणि वंचकराज व इतर हलक्या लोकांशीं कुऱ्यानें वागण्याला आपण मला कां सांगितलेंत आणि मग आपल्या प्रेमाबद्दल आशापूर्ण मनानें मी त्याप्रमाणें वागूं लागलों असतां आपण मला बंदींत टाकलेंत, अंधार कोठडींत ठेवलात, आणि कल्पनेच्या आटोक्यांत न येणाऱ्या अनेक अन्यप्रकारांनीं मला वेडा ठरविण्याचा प्रयत्न कां केलात तें, आपल्या सौजन्याला स्मरून सांगा.

आनंदी:—मदनसेन ! हें अक्षर जरी माझ्या अक्षरासारखें आहे तरी हें पत्र कांहीं मीं लिहिलें नाहीं. परंतु हें काम खास मालतीचें आहे. आणि तिनेंच तुम्हांला वेड लागल्याचें मला प्रथम सांगितल्याचें मला आतां स्मरतें. तुम्ही हंसत येत असल्याचें, आणि या पत्रांत लिहिल्याप्रमाणें तुम्ही करीत असलेले इतर चाळे तिनेंच मला सांगितलेन. बरें पण आतां राग सोडा. शांत व्हा. या कृत्याचे कर्ते आणि कारणें सांपडलीं म्हणजे तुम्हीच फिर्यादी आणि न्यायाधीश होऊन आपणच आपल्या फिर्यादीचा निकाल लावा म्हणजे झालें.

फजीत्या:—बाईसाहेब ! मी सर्व सांगतों तें ऐका म्हणजे आतांपर्यंत ज्या गोष्टीकडे आपण आश्चर्यचकित दृष्टीनें पाहत आलों तिचा निकाल लागेल, आणि या आनंदाच्या प्रसंगांत भांडणतंटा होऊन यांत विरजण पडणार नाहीं. असें कांहीं होऊं नये म्हणून मी सर्व उघडपणें कबूल करतों कीं, मी आणि वंचकराज यांनींच, मदनसेन यांनीं आमच्याशीं उद्दाम आणि अपमानकारक वर्तणूक केल्याबरून, त्यांच्याविरुद्ध हा व्यूह रचला. वंचकराजांनीं आग्रह केल्यावरून मालतीनेंच हें

पत्र लिहिलें आणि यांचा मोबदला म्हणून त्यांनीं तिच्याशीं लग्न करण्याचें कबूल केलें आहे. दोन्ही बाजूंनीं एकमेकांची केलेली आगळीक लक्षांत घेतली व हा एकंदर व्यूह किती छान तऱ्हेनें पार पडला आणि त्यानें किती मजा उडाली याची हकीकत ऐकून सूड घेण्याची इच्छा उत्पन्न न होतां हंशाच पिकेल.

आनंदीः—अरेरे ! मदनसेन ! तुमची यांनीं काय हो अवस्था केली!

विनोदः—कां राव ! ' कांहीं जन्मतांच मोठे असतात, कांहीं मोठेपणा मिळवितात, आणि कांहींच्यावर तो लादला जातो. ' या व्यूहांत मीही एक होतों. शास्त्रीबोवा तो मीच. पण आतां काय त्याचें ! ' मस्कऱ्या ! देवाशपथ मी वेडा नाहीं ' असें कोण म्हणालें आठवतें का ? बाईसाहेब, आपण या मूर्खांच्या बोलण्याला का हंसता ? आपल्या हंसण्यानेंच त्याच्या मूर्खपणाला उत्तेजन मिळतें ' नाहीं का? कालचक्राच्या गतीनें यांचा चांगलाच सूड घेतला.

मदन०ः—थांबा. तुमच्या कंपूंतील सगळ्यांचा चांगला समाचार घेतों.

(जातो.)

आनंदीः—त्यांना तुम्हीं फार वाईट रीतीनें वागविलेंत.

प्रेमा०ः—त्याच्या पाठोपाठ जाऊन त्याला शांत करा. त्यानें आपल्याला त्या नौकापतीची कांहींच हकीकत सांगितली नाहीं. त्याच्याकडून ती हकीकत ऐकूं, आणि मग सुमुहूर्तावर आपल्या प्रेमबद्धजीवांना शास्त्रोक्त रीतीनें बांधून टाकूं. (स्त्रीवेष घेऊन विजया येते तीस) तुझा धनी तुला सेवेंतून मुक्त करतो आहे. आणि आपल्या स्त्रीत्वाला, कोमलत्वाला, आणि उच्च कुलाला न झेपणारी अशी आजपर्यंत जी तूं माझी चाकरी

केलीस त्याबद्दल हें माझें मन मी तुला अर्पण करतों. आजपासून तूं आपल्या धन्याची धनीण झालीस समज. आनंदीबाई! हीं आपलीं लग्नें होईपर्यंत आपण सर्वजण एकत्रच राहूं.

विजया:—(आनंदीस) आपण आजपासून माझ्या वन्सें झालांत.

प्रेमा०:—(विजयेस) आतां तूं स्त्री-वेष घेतला आहेस तेव्हां आतां तूं या प्रेमानंदाची स्वामिनी आणि याच्या प्रेमाची अधिष्ठात्री देवता झालीस म्हणून समज. (विनोदाशिवाय सर्व जातात).

विनोदः—(गातो).

पद.

वाहवा खूप मजेदार । गाजविली लइ तरवार ॥ ध्रु० ॥
बाळपणीं कौतुक होत ।
जेव्हां आलों जवानींत ।
चोर जगीं मी विख्यात ।
छी थू होत जनीं फार ॥ १ ॥ ध्रु० ॥
विवाहास मग मी वटलों ।
नवरीविण अगदीं अडलों ।
दारूबाज मग मी बनलों ।
गमे जनां मी सरदार ॥ २ ॥ ध्रु० ॥
व्यर्थ असे ही सर्वकथा ।
नाटक झालें पूर्ण अतां ।
रंजविण्यासी जनचित्ता ।
समर्थ तो प्रभु करणार ॥ ३ ॥ ध्रु० ॥

समाप्त.

कृ. प्र. खाडिलकर यांचीं नाटकें.

संगीत मानापमान.

या नाटकांत 'किर्लोस्कर संगीत मंडळीं' तील नटांच्या त्या त्या प्रसंगाच्या फोटोवरून तयार केलेलीं अकरा चित्रें घातलीं असून पदांची स्वरमाला (नोटेशन) ही प्रत्येक पदाखालीं दिली आहे. अशा रितीनें छापलेलें हें **पहिलेंच नाटक** होय. किंमत एक रुपया. शिवाय टपालहंशील.

भाऊबंदकी, बायकांचें बंड, सवाई माधवराव यांचा मृत्यु, कांचनगडची मोहना, प्रेमध्वज.

हीं गद्य नाटकें 'महाराष्ट्र नाटक मंडळीं' तील नटांच्या त्या त्या प्रसंगाच्या फोटोवरून तयार केलेल्या सुंदर चित्रांसह छापिलीं असून प्रत्येकी किंमत बारा आणे आहे. शिवाय टपालहंशील.

संगीत विद्याहरण—१२ सुबक चित्रांसह विक्रीस तयार आहे. किं. ०१२.

सत्त्वपरीक्षा—हें नाटक लवकरच छापावयास घेण्यांत येईल.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—चित्रशाळा प्रेस, पुणें; चित्रशाळा दुकान मुंबई; 'महाराष्ट्र नाटक मंडळी,' व 'किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी.'

चित्रशाळा-प्रेस, पुणें.